**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी.व मु.शी.** : तोंडी उत्तरे

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांच्या विरूध्द 307 खाली गुन्हा दाखल झालेला असतानाही त्यांना अटक झालेली नाही. ते मंत्रीमंडळामध्ये असताना त्यांना फरार दाखविलेले आहे... ..

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**मौजे बनीजा (तालुका कोपरना, जिल्हा चंद्रपूर) येथे वैनगंगा नदीवर बांधण्यात आलेला पूल पिलरसह वाहून गेल्याबाबत**

**(1) * 24381 श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. संजय दत्त , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री.सागर मेघे , श्री.केशवराव मानकर** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) वणी-अंतरगाव-गडचांदूर-देवाडा या राज्य महामार्गावर पैनगंगेवरील पूलाचे उद्घाटन दिनांक 20 डिसेंबर, 2005 रोजी झाल्यानंतर एक वर्षाच्या आत चार कोटी रुपयाचा पूल वाहून गेला, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त पूलाचे बांधकाम अत्यंत निकृष्ठ दर्जाचे असल्यामुळे एक वर्षाच्या आत दिनांक 7 ऑगस्ट, 2006 रोजी पूल वाहून गेल्याप्रकरणी शासनाने एक समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, सदरहू समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व सदरहू अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ?

**श्री.रविशेठ पाटील,श्री. छगन भुजबळ यांच्याकरिता**: (1) होय,

(2) होय, दिनांक 30/08/2006 चे शासन निर्णयान्वये समितीची नियुक्ती केली आहे,

(3) व (4) सदर समितीचा अहवाल प्राप्त झाला असून, अहवाल तपासून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24381 (पुढे सुरू.....

.. ..(अडथळा)...

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलत असतात.)

...(अडथळा).....

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, शिक्षकांच्या बिलाच्या संदर्भात....

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासानंतर सन्माननीय सदस्यांना मी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून बोलण्याची संधी देईन. कृपया सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

....(अडथळा)...

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, शासनाने नेमलेल्या समितीच्या अहवालामध्ये कोणत्या कारणास्तव पूल वाहून गेल्याचे निदर्शनास आणून दिलेले आहे ? प्राप्त अहवालानंतर संबंधित ठेकेदारांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

....(अडथळा).....

(विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांकडून घोषणा देण्यात येतात.)

....(अडथळा)....

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, वणी-अंतरगाव-गडचांदूर-देवाडा या राज्य महामार्गावरील पैनगंगेवरील हा पूल असून ऑगस्ट 2006 रोजी नदीच्या पाणलोट क्षेत्रात धरणाचे पाणी सोडले. त्याचबरोबर अतिवृष्टीमुळे पुलाच्या उच्चतम पूर पातळी साडेतीन मिटरपेक्षा जास्त ओलांडल्यामुळे पूल वाहू गेला, पुलाचे स्ट्रक्चर वाहून गेले. या संदर्भात चौकशी करण्यासाठी समिती स्थापन केली होती. त्या समितीचा अहवाल आलेला आहे. त्यामध्ये अतिवृष्टीमुळे पूल वाहून गेल्याचे म्हटलेले आहे. फाऊंडेशन आणि पिलर्स तुटल्यामुळे हा पूल वाहून गेला आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य "वेल"मध्ये येतात.)

......(घोषणा देण्यात येतात.)....

---

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

**जळगाव शहरातील पोलनपेठ येथे पोलीसांनी धाड टाकून बनावट व अश्लिल सी.डी.जप्त करुन सात व्यक्तिंना केलेली अटक**

**(२) * २८६७७ श्री. गुरुमुख जगवानी , श्री. जगदीश गुप्ता , श्री. श्रीकांत जोशी , श्री.सय्यद पाशा पटेल :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलनपेठ (जिल्हा जळगांव) जळगांव शहर येथे पोलीसांनी एल.सी.बी. च्या पथकाने दिनांक ०२ फेब्रुवारी, २००७ रोजी वा त्या सुमारास टाकलेल्या धाडीमध्ये ६ लाख ५० हजार रुपयांच्या बनावट व अश्लील सी.डी. जप्त करण्यात येऊन ७ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली आहे काय, असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत त्यानुसार दोषी व्यक्ती विरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय,

**श्री.आर.आर.पाटील** : (१) होय.

(२) व (३) दिनांक ०२ फेब्रुवारी, २००७ रोजी पोलनपेठ जळगांव या भागात तीन वेगवेगळ्या ठिकाणी छापे घालून रस्त्यावर विविध चित्रपटांच्या, नाटकांच्या व गाण्यांच्या हिंदी, इंग्रजी व मराठी भाषेच्या रु.६,६१,६००/- किंमतीच्या पायरेटेड सीडी, डीव्हीडी जप्त करुन एकूण ७ व्यक्तींना अटक केलेली आहे.

सदर प्रकरणी तपास पूर्ण करुन न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

(उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

---

**सभापती** : मी सभागृहाची बैठक 20 मिनिटाकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक 12-03 ते 12-23 पर्यन्त स्थगित झाली.)

----

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर )

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. भास्कर जाधव )**

**तालिका सभापती** : मी सभागृहाची बैठक प्रश्नोत्तराचा तास संपेपर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.23 ते 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

-----

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अरविंद सावंत )**

**तालिका सभापती** : मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.01 ते 1.16 पर्यन्त स्थगित झाली.)

-----

....नंतर श्री. भोगले......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भोगले) 13.15

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**रामटेक लोकसभा पोटनिवडणुकीच्या प्रचाराच्या वेळी निर्माण झालेल्या कायदा व सुव्यवस्थेसंबंधी**

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

**उपसभापती** : कृपा करुन एका वेळी एकाच सन्माननीय सदस्याने बोलावे ,म्हणजे त्यांना काय मुद्दा मांडावयाचा आहे हे सभागृहाला कळेल. एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्यांनी बोलण्याचा प्रयत्न केला तर काय मुद्दा मांडावयाचा आहे हे कळणार नाही. सन्माननीय सदस्यांनी कृपया जागेवर बसावे.

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय सभापती महोदय, मी विषय मांडतो. सुरुवातीला भूमिका समजावून घ्यावी आणि शासनाची प्रतिक्रिया काय आहे ती कळावी आणि त्यानंतर सभागृहाचे पुढील कामकाज विचारात घ्यावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, काल जो प्रश्न या सभागृहात उपस्थित झाला होता, तो प्रश्न महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भातील होता. सुदैवाने या सभागृहाचे नेते आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, जे गृहखाते सांभाळतात, ज्यांच्याकडे कायदा व सुव्यवस्थेचे रक्षण करण्याची जबाबदारी आहे ते सन्माननीय श्री.आर.आर.पाटील या सभागृहात उपस्थित आहेत. काल आम्ही जो विषय उपस्थित केला होता तो विषय रामटेक येथील लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीच्या संदर्भातील होता. निवडणूक शांततेने पार पाडण्याची जबाबदारी ही जशी जनतेची आहे तशी ती शासनाची पण आहे. शासनाकडून अशी अपेक्षा नाही की, शासनाच्याच प्रतिनिधींनी प्रचार फेरी काढायची आणि विरोधी पक्षाच्या कार्यालयाजवळ जाऊन गुंडगिरी करायची, शस्त्रास्त्रांचा धाक दाखवायचा, वाहनांमध्ये दगडधोंडे, लाठ्याकाठ्या घेऊन फिरायचे, शस्त्रे घेऊन फिरायचे. प्रचार फेरी काढल्याबद्दल कोणतीही चौकशी पोलीस अधिकारी करीत नाहीत. कार्यकर्त्यांकडे साधी एखादी काठी सापडली तरी त्यांच्यावर गुन्हा दाखल केला जाऊन त्यांना ताबडतोब अटक केली जाते. आमचा जो प्रश्न आहे तो विरोधी पक्षात बसलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या दृष्टीने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आहे. रामटेक लोकसभा मतदारसंघात जी

..2..



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

भोगले) 13.15

श्री.मधुकर सरपोतदार..........

पोटनिवडणूक घेण्यात आली ती काँग्रेस पक्षाने आमच्यावर लादलेली पोटनिवडणूक आहे. दुसऱ्या पक्षातील ताकद खेचून घेऊन आपला पक्ष मजबूत करायचा, जनतेच्या उरावर पोटनिवडणुकीचा खर्च टाकायचा आणि जनतेला वेठीस धरायचे असा प्रकार सर्रास सुरु झालेला आहे. हे जे दलबदलू राजकारण चालले आहे ते सत्ताधारी पक्षाकडून केले जात आहे, त्याला आमचा विरोध आहे. ज्या ज्या इसमांना अशा प्रकारे आपला पक्ष सोडून दुसऱ्या पक्षात जायचे असेल त्याला आमची बंदी नाही. सार्वत्रिक निवडणूक होते त्यावेळी त्यांनी त्यांच्या मनाची तयारी करावी आणि ज्या पक्षात जायचे आहे त्या पक्षात खुशाल जावे, त्याला आमचा विरोध नाही. एकदा एखाद्या पक्षाच्या चिन्हावर निवडून यायचे, त्या पक्षातील कार्यकर्त्यांच्या परिश्रमावर, त्यांच्या घामावर निवडून यायचे आणि स्वतःच्या राजकारणासाठी, स्वतःच्या फायद्यासाठी, स्वतःच्या पोटासाठी, स्वतःच्या पोझीशनसाठी पक्षबदल करायचा हे योग्य नाही. हे लोकशाहीला मारक आहे. म्हणून आज देशात निरनिराळे कायदे तयार होत आहेत. भविष्यात आणखी कायदे तयार होतील. काल रामटेक लोकसभा मतदारसंघात जी पोटनिवडणूक झाली त्या पोटनिवडणुकीविषयी माझे हेच म्हणणे आहे. मला आठवते, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी देखील त्यावेळी उपस्थित होते. रामटेक या लोकसभा मतदारसंघात श्री.सुबोध मोहिते निवडून यावेत म्हणून त्या संपूर्ण मतदारसंघात एका दिवशी पाच-पाच सभा आम्ही पण घेतल्या. तहानभूक विसरुन मेहनत घेतली होती. प्रत्येक सैनिकांनी, प्रत्येक कार्यकर्त्यांनी अशा पध्दतीने अहोरात्र कष्ट करुन जेव्हा एखादा उमेदवार निवडून येतो, त्यानंतर तो पक्ष सोडून जातो, दुसऱ्या पक्षात जाताना त्या मतदारसंघातील मतदारांवर पोटनिवडणूक लादतो या संदर्भात या सदनात मी भूमिका मांडली होती. सामान्य प्रशासन विभागाच्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना मी सूचना केली होती की, ज्या पक्षाचे लोक अशी माणसे फोडून घेऊन जातात आणि पोटनिवडणूक लादतात, त्यावेळी ज्या पक्षात ती व्यक्ती जाईल त्या पक्षाकडून लादल्या गेलेल्या पोटनिवडणुकीचा खर्च वसूल करावा. नाही तर भविष्यात हा धंदा चालूच राहील. लोकशाहीचे विचार धोक्यात येतील. आपली विचारधारा संपून जाईल.

सभापती महोदय, त्या दिवशी 7 एप्रिल, 2007 रोजी अशी घटना घडली.

(नंतर श्री.जुन्नरे........

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ...

सभापती महोदय, निवडणूका म्हटल्या की, प्रचार फेरी काढणे, रोड शो करणे हे स्वाभाविक आहे, त्याला आमचा विरोध नाही. परंतु गुंडानी आमच्या कार्यालयावर हल्ला केला, हल्ल्यामध्ये हत्यारांचा वापर करण्यात आला, अर्वाच्च शिवीगाळ करण्यात आली अशा प्रकारे जर रोड शो काढला जात असेल तर तो या लोकशाहीला मारक आहे. या भागात मिरवणूक काढण्याची परवानगी पोलिसांनी दिलेली नव्हती, असे असतांनाही त्या ठिकाणी मिरवणूक काढली गेली आणि शिवसेना कार्यालयासमोर येऊन गोंधळ घातला गेला. कोणाला कोणाचा चेहरा आवडत नसेल तर ती गोष्ट वेगळी आहे. प्रचार फेरी काढून, प्रचार फेरी शिवसेना कार्यालयासमोर आल्यानंतर गाडी थांबवून कार्यालयातील लोंकांना धमकावण्यात आले, याला बाहेर काढा, त्याला बाहेर काढा, त्याला मारा, तुमचे येथे काय काम आहे ? अशा प्रकारे शिवसेना कार्यालयातील कार्यकर्त्यांना धमकावण्यात आले. अशा पध्दतीने कोणाचे जीवन उद्ध्वस्त करावयाचे, सूड बुध्दीने वागावयाचे हे आम्ही कदापिही सहन करणार नाही. काटोलमध्ये प्रचार फेरी काढून कायदा आणि सुव्यवस्था पायदळी तुडवण्याचे काम झालेले आहे, झुंडशाहीचे काम या ठिकाणी झालेले आहे. या भागातील अधीक्षक श्री. यादव हे त्यांच्या दबावाला बळी पडले नाही. काटोलमध्ये दहशतीचा जो प्रकार घडला त्याचे छायाचित्रण निवडणूक आयोगाच्या कॅमे-याने केलेले आहे. निवडणूक आयोगाने छायाचित्रण केलेली सीडी विधानसभेच्या विरोधी पक्ष नेत्यांनी विधानसभेत सादर केलेली आहे. ही सीडी मी पाहिलेली नाही. या ठिकाणी सभागृहाचे नेते माननीय आर.आर.पाटील बसलेले आहेत त्यांनी ती सीडी जरुर पहावी आणि त्यातून काही तरी बोध घ्यावा. सभापती महोदय, आपल्याला माहिती आहे की, संबंधीत व्यक्तीवर 307,395,506,324,147149 अशा प्रकारची निरनिराळी कलमे लावून गुन्हे दाखल केलेले असून अशी व्यक्ती या विधान परिषदेत येते परंतु ही व्यक्ती पोलिसांना सापडत नाही, ही व्यक्ती फरार आहे, असे पोलीस घोषित करतात. या ठिकाणी महाराष्ट्राच्या सर्व विभागातील पोलीस अधिकारी येत असतात. सध्या विधानंडळाचे बजेट सेशन सुरु आहे असे असतांना संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित राहत असतील तर ते योग्य नाही. सभापती महोदय, कायद्यापेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही असे असतांना संबंधितांपर्यंत पोलिसांचे हात पोहचत नसेल तर ते योग्य नाही.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार.....

संबंधितांविरुध्द पोलिसांकडून कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही. काल या सभागृहात संबंधितमंत्री आले आणि त्यांनी सांगितले की, माझ्यावर 307 कलम लावले आहे, तुम्हाला कायदा कळत नाही, मला कायद्याची माहिती आहे, एफआयआर आणि गुन्हा यामध्ये काय फरक आहे हे तुम्हाला कळत नाही. बरोबर आहे, आम्हाला एफआयआर, गुन्हे कसे कळणार? कारण आम्ही गुन्हे करीत नाही. सभापती महोदय, आपण सुध्दा या घटनेला साक्षीदार आहात. कोणी धमकी दिली, गोंधळ घातला तर त्याच्या कंबरेवर लाथ मारली जाते. या ठिकाणी माननीय गृहमंत्री उपस्थित आहेत, त्यांच्यावर संपूर्ण राज्याची कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्याची जबाबदारी आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, काटोलमध्ये ही घटना 7 एप्रिल, 2007 रोजी घडली, आज 10 तारीख आहे. घटना घडून 3 दिवस उलटून गेलेले आहेत. या घटनेच्या संदर्भात पोलीस खात्याकडून संपूर्ण डिटेल रिपोर्ट यावयास पाहिजे होता. अधिवेशनाच्या निमित्ताने जे अधिकारी या ठिकाणी आलेले असतील त्यांच्याकडून या प्रकरणाच्या संदर्भातील संपूर्ण माहिती घ्या. माहिती देण्यामध्ये आमच्याकडून सुध्दा चूक होण्याची शक्यता आहे. आमच्याकडून सदनामध्ये चुकीचे शब्द वापरले गेले तर आम्ही आमचे शब्द मागे घेतो. आम्ही कोणावरही विनाकारण आरोप करीत नाही किंवा आम्हाला कोणावरही चुकीचे आरोप करावयाचे नाहीत. परंतु काटोलमध्ये मिरवणूक काढण्याची परवानगी नसतांना अशा प्रकारे दहशत घडविणे योग्य नाही. त्यांनी काटोलमध्ये निवडणुकीच्या वेळी दहशत निर्माण केली असे नव्हे तर ज्या ज्या ठिकाणी पोटनिवडणुका झाल्या त्या त्या ठिकाणी त्यांनी दहशत पसरवलेली आहे. सिंधुदुर्ग, कुलाबा येथे सुध्दा अशाच प्रकारचे वातावरण त्यांनी तयार केले होते. अशी सर्व परिस्थिती असतांना संबंधितांविरुध्द कारवाई न होणे, त्याची नोंद न घेणे योग्य नाही. काटोलमध्ये त्यांच्या गाडयांमध्ये काठया, लाठया, शस्त्रे, तलवारी होत्या असे असतांना त्यांच्यावर कोणत्या प्रकारची कारवाई झालेली आहे? सभापती महोदय, अशा प्रकारची घटना घडल्यानंतर काही दिवसानंतर लोक ही घटना विसरुन जात असतात. महाराष्ट्राचे मंत्रिमंडळ समर्थ लोकांचे असावे, महाराष्ट्राचे मंत्रिमंडळ जनकल्याण करणा-या लोकांचे असावे, या सदनातील लोकप्रतिनिधींनी कोणतेही प्रश्न उपस्थित केले तर त्या प्रश्नांना न्याय देणारे मंत्री येथे

...3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MHM/ KGS/ प्रथम श्री. भोगले.. 12:20

श्री. मधुकर सरपोतदार.....

असले पाहिजेत, त्या प्रश्नांना मंत्री महोदयांनी साधकबाधक उत्तरे देऊन लोकप्रतिनिधींचे समाधान केले पाहिजे. ही सर्व जबाबदारी शासनाची आहे. शासनाची जी जबाबदारी आहे ती शासनाने पार पाडली पाहिजे. सभापती महोदय, मी माननीय गृहमंत्र्यांना गेल्या 15-20 वर्षापासून ओळखतो आहे. ते विरोधी पक्षात होते तेव्हा त्यांनी सत्ताधारी पक्षावर कशा प्रकारे हल्ले चढविले होते याची मला कल्पना आहे. राज्यकारभार सुरळीत चालावा, राज्याची कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती चांगली राखावी ही राज्य शासनाची प्रमुख जबाबदारी आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार..........

कोणावरही अन्याय होता कामा नये. सात-आठ लोकांजवळ रिव्हॉल्व्हर होती, ही रिव्हॉल्व्हर त्यांच्याकडे कोठून आली ? रिव्हॉल्व्हर बाळगण्याचे परवाने त्यांच्याकडे होते काय ? भर दिवसा सूर्य माथ्यावर आलेला असताना रिव्हॉल्व्हरचा धाक दाखविण्यात आला. कार्यकर्त्यांची डोकी फोडण्यात आली. गाड्यांमध्ये शस्त्र बाळगून, खंडणी गोळा करुन पैशाच्या सामर्थ्यांवर जे प्रतिज्ञा करतात अशा लोकांचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी शासनावर आहे. त्यांना शासनामध्ये स्थान देणे हे महाराष्ट्राला भूषणावह नाही. कोणत्या विचारसरणींच्या लोकांना बरोबर घेऊन जायचे याचा विचार झाला पाहिजे होता. Whether this is directly connected with the criminal psychology हे तपासून पाहण्याची आवश्यता आहे. तेव्हा अशा गोष्टींची तपासणी केली नाही तर भविष्यात त्याची पुनरावृत्ती होईल. जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होईल. सभापती महोदय, मंत्रिमंडळातील एक मंत्री गुंडगिरी करीत आहे त्यांचा बंदोबस्त करुन, प्रथम त्यांना अटक केली पाहिजे. त्यांच्यावर कोणती कलमे लावण्यात आली याची उपमुख्यमंत्र्यांना कल्पना आहे. त्यांच्यावर कलम 307, 395, 506, 149 आणि 147 ही सर्व कलमे नॉन-बेलेबल आहेत. तेव्हा त्यांना प्रथम अटक करुन कोर्टात उभे करायला हवे. अशा व्यक्तीस मंत्रिमंडळात कोणतेही स्थान असता कामा नये अशा निर्णय उभय पक्षांनी घेतला पाहिजे. महाराष्ट्रात गुंडाराज चालणार नाही अशाप्रकारचा संदेश माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या कृतीतून जाण्याची आवश्यकता आहे. गुंडगिरी कशा पध्दतीने हाताळावी याचे ज्ञान पोलिसांना चांगले आहे.परंतु त्यांच्यावर दबाव येतो. मंत्र्यांपर्यंत कायदा पोहोचत नाही असा दुर्दैवी मेसेज महाराष्ट्रात गेला आहे. तेव्हा काटोल येथे जे घडले त्यांची इत्यंभूत माहिती माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहाला देणे आवश्यक आहे.याठिकाणी मला त्यांना सन्माननीय मंत्री असे नाईलाजाने म्हणावे लागत आहे. अशाप्रकारची घटना महाराष्ट्राला भूषणावह नाही. सन्माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांच्यावर जी कलमे लावण्यात आलेली आहेत त्याची माहिती सभागृहाला मिळणे आवश्यक आहे. काटोल येथे जे काही घडले त्याचे चित्रण झालेले आहे ते लोकांसमोर सादर करण्याची जबाबदारी शासनाची आहे.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार..........

सभापती महोदय, दुसरी एक गोष्ट म्हणजे भारतीय जनता पक्षाच्या एका कार्यकर्त्यांच्या पार्श्वभागावर मंत्रिमहोदय लाथ मारतात त्याबाबतही विचार होण्याची आवश्यकता आहे. तेव्हा या सर्व घटनांसंबंधी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहात निवेदन करावे अशी माझी विनंती आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री यशवंतराव गडाख, उल्हास पवार, माय लर्नेड फ्रेंड श्री.गुरुनाथ कुलकर्णी हे सुसंस्कृत नेते आहेत. परंतु, भाजपाचे एक कार्यकर्ते श्री.अण्णा चंपतराव यांच्या पार्श्वभागावर मंत्र्यांनी लाथ मारली ही गोष्ट बरोबर नाही. तुमच्याजवळ दांडुके आहेत तर आमच्याजवळ तलवारी आहेत असे दोन मंत्र्यांमध्ये वक्तव्य झाले होते, त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. काटोल येथे जी घटना घडली त्याचे व्हिडिओ चित्रण आणि फोटो आहेत.

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

परंतु कोणी कायदा हातात घेऊन वागत असेल तर....माननीय उल्हासदादांना वाटत असेल की, आपण कुठून या पक्षात आलो ? त्यांच्या मनात याबाबतची अस्वस्थता चालली आहे. मी त्यांचा चांगला मित्र असल्यामुळे त्यांचा स्वभाव मला माहीत आहे. त्यांच्या मनात फारच अस्वस्थता चालू आहे. माननीय गोविंदराव आदिक यांच्या मनातही अस्वस्थता चालू आहे. ते काही काळ काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष होते. परंतु हे जे काही घडत आहे...

**उपसभापती** : आपल्याला वाईट वाटत असेल तर आपण त्या पक्षात या.

श्री.नितीन गडकरी : मी विहिरीत जाऊन जीव देईन पण काँग्रेस पक्षात जाणार नाही. मी आपल्या बरोबर आहे. सभापती महोदय, हे जे प्रकरण घडले आहे, ते अतिशय वाईट आहे. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे....(अडथळा) माननीय उपसभापती महोदय हे प्रमाचे संबंध जोपासतात. सर्वच पक्षातील लोक त्यांच्यावर प्रेम करतात, हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्ठये आहे. त्यामुळेच माननीय उपसभापती हे खरे उपसभापती आहेत.

**उपसभापती** : आपण माझ्या निरोप समारंभाचे भाषण करीत आहात का ?

श्री.नितीन गडकरी : नाही. सौजन्याने कसे वागावे हे आपल्याकडून त्यांनी शिकले पाहिजे. माननीय गृहमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, या प्रकरणाच्या बाबतीत महाराष्ट्रातील सुसंस्कृत जनता अतिशय गंभीरतेने पाहत आहे. हा अतिशय गंभीर विषय आहे. याठिकाणी मी माननीय गृहमंत्र्यांना विचारु इच्छितो की, "दादा नंबर एक", "मंत्री नंबर एक", म्हणजे काय ? हे नंबर एक कशामुळे आहेत ? याचा खुलासा होणे आवश्यक आहे. यामुळे जनतेमध्ये वाईट मेसेज जात आहे. त्यामुळे याबाबतीत खुलासा होणे अपेक्षित असून त्याबाबतीत कारवाई व्हावी, अशी माझी माननीय गृहमंत्र्यांना विनंती आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी मला माननीय गृहमंत्र्यांच्या हे लक्षात आणून द्यावयाचे आहे की, सिंधुदुर्गमध्ये निवडणुका चालू असताना शिवसेना पक्षातील कार्यकर्त्यांची झडती घेण्यात आली. श्री.सुहास सामंत यांच्याकडे अधिकृत रिव्हॉल्व्हर असतानाही पोलिसांनी ते जप्त केले. श्री.प्रसन्ना, पोलीस अधीक्षक यांनी त्यांचे रिव्हॉल्व्हर जप्त करुन ताब्यात घेतले. याबाबतीत मी स्वत: त्याठिकाणी जाऊन पोलीस अधीक्षकांना विचारले होते की, श्री.सामंत

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

यांच्याकडे अधिकृत रिव्हॉल्व्हर असतानाही आपण ते जप्त केले व श्री.नारायण राणे यांच्याबरोबर असणाऱ्या लोकांकडील रिव्हॉल्व्हर आपण काढून का घेत नाही, याबाबत त्यांनी मला उत्तर दिले नाही. याठिकाणी मला माननीय गृहमंत्र्यांच्या हेच लक्षात आणून द्यावयाचे आहे की, काल काटोलमध्ये कॉंग्रेस पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांच्यासमोर 8-10 रिव्हॉलहर काढून ट्रीगर ओढण्यात आले असतानाही आपण त्याबाबतीत काय केले ? हे सर्व त्यांच्यासमोरच चालू होते. ज्यावेळी सिंधुदुर्गमध्ये आपल्या एस.पीं.नी कायदा राबविला, त्याप्रमाणे आपण कायदा काटोलमध्ये का राबविला नाही ? एवढाच माझा माननीय गृहमंत्र्यांना प्रश्न आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकर सरपोतदार आणि सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जे मुद्दे मांडले त्याचे रिपिटेशन मी करणार नाही. 7 तारखेला ही घटना घडत असताना त्याठिकाणी मिरवणूक निघाली होती, त्यावेळी कॉंग्रेस पक्षाच्या प्रदेशाध्यक्षा माननीय श्रीमती प्रभाताई राव त्याठिकाणी होत्या. त्यांच्यासमोर मंत्री चुकीची वर्तणूक करीत असताना, आपल्या पक्षाचे मंत्री कायद्याचे उल्लंघन करीत असताना, आचारसंहितेचा भंग करीत असताना व तेही त्यांच्यासमोर असे करीत असतानाही त्यांनी मंत्र्यांना रोखले नाही. याठिकाणी लोकमत आणि सामना वर्तमानपत्रामध्ये असा उल्लेख आहे की,

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ......

"श्रीमती प्रभा राव यांच्या विरुद्ध पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे" आपणाकडून आम्हाला न्यायाची अपेक्षा आहे कारण आपण कर्तव्यदक्ष गृहमंत्री आहात. कायद्यासमोर सर्वजण समान आहेत मग एखाद्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष असो, किंवा राज्याचे मंत्री असो किंवा एखादा उमेदवार असो हे सर्वजण कायदयासमोर समान आहेत. सभापती महोदय मी येथे एवढीच विनंती करणार आहे की, या घटनेची चौकशी करीत असताना या ज्या निवडणुकीच्या संदर्भात ज्यांच्या विरुध्द काही तक्रारी असतील त्या सर्व तक्रारींची चौकशी करावी व त्यांच्या विरुध्द ताबडतोब कारवाई व्हावी, अशी आमची मागणी आहे.

श्री आर.आर. पाटील (गृह मंत्री) : सभापती महोदय, काल पासून या सदनामध्ये नागपूर येथील रामटेकच्या लोकसभा निवडणुकीत प्रचार करीत असताना काटोलमध्ये प्रचारादरम्यान घडलेल्या घटनेचा पडसाद उमटत आहे. मी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना या ठिकाणी धन्यवाद देऊ इच्छितो की, त्यांनी सभागृहाचे कामकाज शांतपणे चालावे या करिता सरकारने काही प्रश्नाबाबत खुलासा करावा, अशी मागणी करुन कामकाजास सुरुवात केली.

सभापती महोदय, निवडणुकांमध्ये आरोप प्रत्यारोप अनेक वेळा होत असतात. दिनांक 7 एप्रिल 2007 हा निवडणुकीच्या प्रचाराचा शेवटचा दिवस होता आणि त्यावेळी विविध राजकीय पक्षाच्या सदस्यांनी आपापल्या निवडणुका प्रचार निवडणुका आयोजित केल्या होत्या. काटोलमध्ये भाजप शिवसेना प्पक्षाच्या कार्यालयासमोरुन मिरवणुक जात असताना काही अनुचित प्रकार घडला. या घटनेची तक्रार पोलीस स्टेशनमध्ये दाखल झालेली आहे. ही घटना एक वाजून पंचेचाळीस मिनिटांनी काटोलमध्ये घडली आणि तीन वाजून वीस मिनिटांनी पहिला एफ.आय.आर.ची नोंद काटोल पोलीस स्टेशनमध्ये नोंद झाला आहे. दुसरा एफ.आय.आर. साधारणत: रात्री दहा वाजता नोंदवण्यात आला. या दोन्ही परस्परविरोधी तक्रार काटोल पोलीस स्टेशनला नोंदविण्यात आल्या होत्या. अशा घटनेवर कारवाई अत्यंत तातडीने झाली पाहिज असे सर्वांना वाटते. परंतु आपण पोलिसांसमोरील अमाप काम पाहिले तर काही प्रमाणात त्या परिसरामध्ये तणाव होता. निवडणुका शांततेच्या वातावरणामध्ये पार पाडणे आवश्यक होते.

2..

श्री. आर.आर. पाटील.......

लोकसभेच्या पोट निवडणुकीची प्रक्रिया काल पूर्ण झाली आहे. पोलिसांनी आपल्या कामामध्ये दक्ष राहणे, ही गरज होती. या घटनेतील तक्रारींचे स्वरुप लक्षात घेऊन पहिल्या घटनेमध्ये श्री. पुरुषोत्तम रघुनाथ घोटे, वय वर्ष 52, तालुका सेना प्रमुख ,काटोल यांनी, महसूलमंत्री श्री. नारायण राणे, श्री. सुबोध माहिते यांच्या विरुध्द अशी तक्रार केली होती की, पक्ष कार्यालयात मारहाण केली व त्यांच्या खिशातील सुमारे 1200 रुपये काढून घेतले. अशा स्वरुपाची पहिली तक्रार काटोल येथे पोलीस स्टेशनमध्ये नोंदविण्यात आली आहे. या घटनेमधील तक्रारीचे स्वरुप लक्षात घेता कलम 143, 147,149,448, 295, 323, 336, 427, 294, 506 व 109 अंतर्गत गुन्हयांची नोंद करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांचे स्टेटमेंट बघितले तर त्यांनी सुध्दा म्हंटले आहे की, पोलिसांनी पुढील अनुचित प्रकार टाळण्यासाठी व दोन्ही पक्षांच्या समोरासमोरील जमावापुढे बफरची भूमिका घेऊन जमावाला पाठीमागे सारण्यात व जास्तीचा प्रसंग घडणार नाही याची दक्षता घेतलेली आहे. पोलिसांनी आपली कारवाई नीट पार पाडली याबद्यल विरोधी पक्ष नेत्यांनी समाधान व्यक्त केलेले आहे. सभापती महोदय, दुसऱ्या घटनेच्या एफ.आय.आर. ची नोंदही झालेली आहे. त्यामध्ये श्री. उध्दव ठाकरे, सन्माननीय सदस्य सर्वश्री. रामदास कदम , चंद्रकांत खैरे , देवेंद्र साटम, एकनाथ शिंदे, किशोर लुमेरिया व इतर असे एकूण 100 ते 150 कार्यकर्ते होते. दुसऱ्या घटनेत साधारणत: 300 कार्यकर्ते होते

यानंतर श्री. रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..........

दुसरी घटना 2.00 वाजता घडली आहे व दिनांक 7/4/2007 रोजी रात्रौ 22.00 वाजता एफ.आय.आर.नोंद झाला आहे. या घटनेची उपलब्ध होणारी सी.डी., कार्यकर्त्यांचे जबाब यावरुन नि:पक्षपातीपणे संपूर्ण चौकशी केली जाईल, याची मी सदनाला ग्वाही देतो. राज्यामध्ये कायद्यासमोर सर्व समान आहेत. निश्चितपणे कुणालाही गुन्हा करण्याचे वा कायदा हातात घेण्याचे अधिकार नाहीत. जर कोणी चुकला असेल तर कायदा आपले कर्तव्य चोखपणे पार पाडून दाखविल, याची मी ग्वाही देतो. या घटनेमधील सर्व लोकांचे जबाब घेणे, चौकशी करणे, निष्कर्शाप्रत येणे यासाठी पोलिसांना कालावधी दिला पाहिजे. तपासामध्ये जर काही नवी माहिती उपलब्ध झाली, आपण सांगता ती माहिती प्रुव्ह झाली, परिस्थितीजन्य पुरावा आढळून आला तर जास्तीची कलमे लावण्याची मुभा चार्जशीट दाखल करेपर्यन्त पोलिसांना असते. कुणालाही वाचविण्याचा प्रयत्न केला जाणार नाही. या घटनेमध्ये दोन एफ.आय.आर.पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाले आहेत. जे खरे दोषी आहेत, कुणाचे चुकले आहे, त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

----------------

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>गुजराथचे मुख्यमंत्री, श्री.नरेंद्र मोदी यांचा फोटो सभागृहामध्ये फाडण्याचा घडलेला प्रकार</u>**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार यांनी काल नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता. त्यावर ते बोलत असतांना या सभागृहाचे सन्माननीय सदस्य, श्री.जितेंद्र आव्हाड यांनी गुजराथ राज्याने वीज देण्यास बंदी केली, असा मुद्दा मांडून गुजराथचे सन्माननीय मुख्यमंत्री, श्री.नरेंद्र मोदी यांचे फोटो बाहेर काढले आणि ते सभागृहात वाटण्यात आले तसेच ते फाडण्यात आले. माननीय सभापतींची परवानगी न घेता अशा प्रकारचे वर्तन सभागृहात करणे बरोबर नाही. हे वरिष्ठ सभागृह आहे, या सभागृहाचे काही संकेत आहेत. एखाद्या व्यक्तिबद्दल बोलावयाचे असेल, काही सांगावयाचे असेल तर माननीय सभापतींची परवानगी घेऊन बोलले पाहिजे. कुठल्याही राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा फोटो, नेत्यांचा फोटो फाडण्याची प्रथा या सभागृहात पडली तर इकडच्या बाजूनेही फोटो फाडले जाऊ शकतात. गुजराथचे मुख्यमंत्री, सन्माननीय श्री.नरेंद्र मोदी यांनी जे वक्तव्य केले ते लोकसत्तेमध्ये मोडूनतोडून प्रकाशित करण्यात आले आहे, परंतु सत्य घटना वेगळी आहे. कालच मी गुजराथच्या उर्जा मंत्र्यांशी दूरध्वनीवरुन बोलणे केले. त्यामुळे वर्तमानपत्रात जे छापून आले आहे ते आणि वस्तुस्थिती वेगळी आहे. असे असतांना गुजराथच्या मुख्यमंत्र्यांचा फोटो फाडून त्यांना बदनाम करण्याचा जो प्रयत्न या सभागृहामध्ये झाला तो निंदनीय आहे व सभागृहाची शान बिघडवणारा आहे. मी या घडलेल्या प्रकाराचा निषेध करतो आणि सन्माननीय सदस्य, श्री.जितेंद्र आव्हाड यांना सांगू इच्छितो की, ज्याप्रमाणे आपण फोटो फाडण्याचा प्रकार केला त्याप्रमाणे आमच्याही सन्माननीय सदस्यांनी फोटो आणलेले आहेत व तेही फोटो फाडू शकतात. पण आपल्याला अशी पद्धत सभागृहात सुरु करायची आहे का ? म्हणून माननीय सभापतींनी निदेश दिले पाहिजे तसेच सन्माननीय सदस्य, श्री.जितेंद्र आव्हाड यांनी सभागृहाची माफी मागितली पाहिजे, दिलगिरी व्यक्त केली पाहिजे अन्यथा आम्हाला देखील असाच प्रकार करावा लागणार आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, दोन गोष्टींचा खुलासा झाला पाहिजे.........

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, काल सदनामध्ये जो फोटो फाडण्याचा प्रकार घडला त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा राहिलेलो नाही. हे वरिष्ठ सभागृह आहे. त्यामुळे या सभागृहाचे पावित्र्य आणि महत्व आपण सगळयांनी लक्षात घेण्याची आवश्यकता आहे.

..3...........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील............

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य फोटो दाखवितात.)

कालच्या प्रकाराचे मी समर्थन करीत नाही, असे मी म्हणत असल्यामुळे विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनीही फोटो दाखविण्याची आवश्यकता नाही. आज आपण सन्माननीय केंद्रीय कृषि मंत्री, श्री.शरद पवार यांचे फोटो दाखवित आहात तर इकडूनही वाजपेयी, अडवाणी यांचे फोटो आणता येतील. हे फोटो फाडण्याचे सभागृह आहे काय ? एक गोष्ट चुकीची घडली म्हणून आपण दुसरी चूक करायची का ? त्यामुळे हे सर्व थांबविण्याची आवश्यकता आहे. आपण जे फोटो आता दाखवित आहात ते घरी नेऊन लावा किंवा घरी लावण्यासाठी आम्हाला उपलब्ध करुन द्या.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.जितेंद्र आव्हाड यांनी दिलगिरी व्यक्त केली पाहिजे.

यानंतर कुमारी जयश्री.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी या ठिकाणी जो मुद्दा मांडला त्यासंदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी या बाबतीत झालेला प्रकार हा चुकीचा आहे असेही सांगितले. याबाबत मला असे वाटते की, येथे एका प्रकारावर निश्चितपणे पडदा पडलेला आहे की, वर्तमानपत्रामध्ये आलेल्या सगळयाच बातम्यांवर पटकन विश्वास ठेवून अशा प्रकारचे कृत्य होणे हे अत्यंत गैर आहे. वर्तमानपत्रात आलेल्या सगळयाच बातम्या हया ख-या असतात, असे समजून आपण जर प्रत्येक वर्तमानपत्रात जे काही छापून येते त्याची खात्री करुन न घेता कृत्य करणे चुकीचे आहे. म्हणून प्रथमत: वर्तमानपत्रामध्ये आलेल्या बातम्यांच्या विश्वासार्हतेबाबत सन्माननीय सदस्यांनी खात्री करुन घ्यावयास पाहिजे, अशी खात्री करुन न घेता अशा प्रकारची घटना घडणे, हे निश्चितपणे अतिशय गैर आणि चुकीचे आहे. माननीय नरेंद्र मोदी हे देखील एका राज्याचे मुख्यमंत्री आहेत. त्या बाजूच्या सदस्यांनी देखील आज माननीय श्री.शरदचंद्रजी पवार यांचे फोटो या ठिकाणी आणलेले आहेत, अर्थात मला पूर्ण विश्वास आहे की, त्यांनी ते फाडण्यासाठी आणलेले नाहीत.

श्री.विनोद तावडे : काल माननीय श्री.नरेंद्र मोदी यांचे फोटो माननीय गृहमंत्री सभागृहात असतांना फाडले, याचे जास्त वाईट वाटते.

**उपसभापती** : परवा माननीय शरदचंद्रजी पवार यांच्या चरित्राच्या पुस्तकप्रकाशनाचा सोहळा सन्माननीय उपराष्ट्रपती यांच्या हस्ते संपन्न झाला. या समारंभात सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण, माननीय श्री.मनोहर जोशी उपस्थित होते. कोणत्याही पक्षाचा नेता हा त्या पक्षातील प्रत्येक कार्यकर्त्यासाठी आदरणीय व आपलासाच असतो, त्याची अशा प्रकारे विटंबना करु नये. या सभागृहामध्ये कोणी झाल्या प्रकाराबद्दल दिलगीरी व्यक्त करो अथवा न करो, मी या प्रकाराबद्दल दिलगीरी व्यक्त करतो.

( गोंधळ )

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.निकोसे बोलतील.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**जालना येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाची झालेली विटंबना.**

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, टी.व्ही.वर सातत्याने एक बातमी येत आहे, ती अशी की, जालन्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाची विटंबना झालेली आहे व तेथे अनेक ठिकाणी दंगली होऊन कर्फ्यू लावण्यात आलेला आहे. यासबंधी माननीय गृहमंत्री साहेबांनी निवेदन करावे,अश्ी माझी विनंती आहे. माननीय गृहमंत्री साहेबांनी निवेदनामध्ये हे ही सांगावे की, जालन्यामध्ये आता काय परिस्थिती आहे ? तेथील परिस्थिती आटोक्यात आहे की नाही, नसल्यास तेथील परिस्थिती आटोक्यात आणण्याकरिता कोणत्या प्रकारचे प्रयत्न केले जाणार आहेत ?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रमेश निकोसे यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो अतिशय महत्वाचा आहे. जालन्यामध्ये घडलेली ही घटना अतिशय निंदनीय आहे. दिनांक 14 एप्रिल रोजी परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आहे. या त्यांच्या जयंतीच्या पर्वावर अशा प्रकारे त्यांच्या पुतळयाची विटंबना होणे, हे महाराष्ट्राला शोभेसे कृत्य नाही. आमच्याकडे अशी माहिती आली की, जालन्यामध्ये ही घटना घडली त्यानंतर तेथे पोलिसांनी फायरिंग केली व त्यामध्ये 20 - 25 लोक जखमी झालेले आहेत. सदर घटना अतिशय गंभीर आहे. ज्या कोणी ही विटबंना केली असेल त्याचा शोध घेणे आवश्यक आहे. सदर घटनेमुळे संपूर्ण समाजजीवन दूषित होऊ नये, याचीही काळजी घेणे आवश्यक आहे. माननीय गृहमंत्री या ठिकाणी हजर आहेत, त्यांनी त्या ठिकाणी काय परिस्थिती आहे ?यासंबंधी सभागृहामध्ये वस्तुस्थिती विषद करावी. कारण जालन्यामध्ये आता कर्फ्यूही लागलेला आहे, अशी आम्हाला माहिती मिळालेली आहे.

श्री.मधुकर चव्हाण : माननीय गृहमंत्र्यांना माझी विनंती आहे की, परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाची विटंबना करण्याचे प्रकार राज्यात वारंवार होत आहेत व गेली दोन - तीन वर्षापासून हे प्रकार वाढत चालले आहेत. मला यासंबंधात असे विचारावयाचे आहे की, समाजामध्ये अशा प्रकारची कुठली यंत्रणा आहे की, जी अशा प्रकारे म्हणजे उदा. सिमी सारखी पाकिस्तानवादी संघटना यामागे आहे की काय ? जेणेकरुन अशा प्रकारच्या कृत्यांमुळे राज्यातील समाजजीवन ढवळून निघून मोठया प्रमाणात वितंडवाद वाढवून, समाजामध्ये कलह निर्माण व्हावेत व एकंदरीत सर्वच समाजजीवन दूषित व्हावे, अशी एखादी यामागे भावना आहे काय ? अशी आम्हाला शंका येत आहे. याचाही शोध घेणे आवश्यक आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल समाजातील सर्व थरांमधील घटकांना, जातीपंथियांना आदर वाटावा, असेच ते महापुरुष होते.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाची किंवा कोणत्याही महापुरुषाच्या पुतळयाची विटंबना व्हावयास नको. ज्या माणसाने पुतळयाची विटंबना केली असेल त्याला शिक्षा झालीच पाहिजे. पुतळयाची विटंबना करणा-याला अशी शिक्षा द्यावी की, अशा प्रकारचे कृत्य करणा-यांच्या मनामध्ये दहशत निर्माण होईल.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, जालना जिल्हयामध्ये जी घटना घडलेली आहे त्या घटनेचा मी राज्य शासनाच्या वतीने तीव्र शब्दात धिक्कार करतो. आज सकाळी 6.00 वाजता जालन्यामध्ये बुलढाणा रोडवरील दलित वसतीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाची विटंबना झाल्याची माहिती पोलिसांनी मिळाली. त्याच क्षणी ॲडिशनल एस.पी. आणि एस.पी. घटनास्थळी पोहोचले. या पुतळयाला जो हार घालण्यात आला होता तो हार काढण्याचा प्रयत्न सुरु असतांना पुतळयाजवळ उभ्या असलेल्या जमावाने ॲडिशनल एस.पी. आणि एस.पी. यांच्यावर दगडफेक केली. जमावाने पोलिसांच्या गाडीची मोडतोड केली. तीन बसेसचे नुकसान झालेले आहे. तसेच काही पोलीस गाडयांची देखील तोडफोड करण्यात आली. महाराष्ट्रामध्ये मोठया प्रमाणावर पुतळे बसविले जातात. वास्तविक यासंदर्भात नियम करावयास पाहिजेत. खरे तर पुतळयाचे संरक्षण करण्याची जबाबदारी पुतळा बसविणा-यांची सुध्दा असते. कोणीही आपआपल्या धार्मिक, राजकीय नेत्यांचे पुतळे उभे करतो, परंतु पुतळयांच्या संरक्षणाची जबाबदारी घेतली जात नाही. महाराष्ट्रातील लोकांचे मन संवेदनशील आहे. सार्वजनिक बसेसचे, शासकीय मालमत्तेचे नुकसान केले जाते किंवा दुस-या कोणत्याही समुदायाच्या लोकांवर हल्ले होतात, अशा वेळी राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. पुतळे बसविण्यापूर्वी शासकीय परवानगी घ्यावी लागते, परंतु ती घेतली जात नाही. तरी देखील कोणाच्याही भावना दुखावू नयेत म्हणून शासकीय यंत्रणा सहानुभूतिने पुतळा बसविण्यास परवानगी देण्याची भूमिका स्वीकारत असते. अशा घटनांपासून बोध घेऊन सरकारची परवानगी घेऊन बसविण्यात आलेले अधिकृत पुतळे किती आणि अनधिकृत पुतळे किती याची सर्वेक्षण करण्यात येईल. याचा अर्थ परवानगी न घेता जे पुतळे बसविण्यात आले आहेत ते पुतळे काढण्याची भूमिका शासन घेणार नाही. ज्यांनी पुतळे बसविलेले आहेत त्या पुतळयांच्या संरक्षणाची जबाबदारी त्यांनी स्वीकारली पाहिजे. महाराष्ट्रामध्ये 3000 पुतळे बसविलेले आहेत. या

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ........

पुतळयांची तीन शिफट्मध्ये जरी देखदेख करावयाची म्हटले तरी ते कदापि शक्य नाही. एखादा माथेफिरु उठतो आणि पुतळयाची विटंबना करतो. राज्यात अनेक वेळा समाजा-समाजामध्ये तणाव व शासकीय यंत्रणेमध्ये नको ते प्रसंग निर्माण होतात. जालन्यामध्ये जी घटना घडली त्यामुळे ज्यावेळी मॉब अनावर झाला त्यावेळी पोलिसांनी बचावात्मक आणि मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची काळजी घेतली. 17 राऊंड फायर करण्यात आले. एका माणसाच्या पायावर गोळी लागली. एका माणसाच्या हाताला खरचटलेले आहे. कोणाच्याही जीविताला धोका नाही, अशा प्रकारचा मेडीकल रिपोर्ट असल्याबाबतची माहिती पोलिसांनी मला फोनवरुन कळविलेली आहे. ज्या परिसरामध्ये पुतळयाची विटंबना झाली त्या परिसरातच कर्फ्यु लावण्यात आलेला असून संपूर्ण जालना जिल्हयामध्ये कर्फ्यु लावण्यात आलेला नाही. तसेच या परिस्थितीवर आय.जी. नियंत्रण ठेवत आहेत. तेथे एस.आर.पी.च्या दोन फलटणी पोहोचलेल्या आहेत. ही घटना घडल्यानंतर पोलिसांनी अत्यंत शिघ्रगतीने आपली कारवाई पार पाडलेली आहे.

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MHM/ KGS/ पूर्वी श्री.बोरले 1:55

श्री.आर.आर.पाटील .....

सर्व कौशल्य पणाला लावून पुतळयाची विटंबना करणारे समाजकंटक शोधले जातील. सन्माननीय सदस्य श्री.रमेश निकोसे यांनी ज्या भावना व्यक्त केल्या अगदी तसे करता येणार नाही. परंतु अशा पध्दतीने पुन्हा पुतळयाची विटंबना करण्याची हिंमत कोणी दाखवणार नाही यादृष्टीने तपास करुन समाजकंटकांवर कठोर कारवाई करण्यात येईल. प्रत्येक पुतळयाच्या परीसरात कायमचा बंदोबस्त ठेवणे शक्य नाही. परंतु पुतळयाच्या परिसरात रात्रीची गस्त ठेवणे व फिरती पथके ठेवणे अशा उपाययोजना शासनामार्फत केल्या जातील.

---------------

.....2

10-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) L-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>नांदेड जिल्हयातील बाभळी बंधारा बॉम्बने उद्ध्वस्त करण्याची</u>**

**<u>श्री.चंद्राबाबू नायडू यांनी दिलेली धमकी</u>**

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मी एका गंभीर बाबीकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. नांदेड जिल्हयात महाराष्ट्र-आंधप्रदेश सीमेवर असलेल्या बाभळी बंधाऱ्यावर आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्री श्री.चंद्राबाबू नायडू 40-50 लोकांचा जनसमुदाय घेऊन गेले आणि हा बंधारा बॉम्बने उद्ध्वस्त करण्याची धमकी दिली, अशी माहिती आम्हाला मिळाली आहे. यापूर्वीही या बंधाऱ्यावर आंध्रप्रदेशचे सहा आमदार येऊन अशा प्रकारच्या धमक्या देऊन गेले आहेत.

सभापती महोदय, कर्नाटक राज्यात मराठी भाषिकांसाठी कानडी भाषा अनिवार्य केली आहे, सीमा भागातील मराठी मोडीत काढली जात आहे त्यामुळे आता तरी महाराष्ट्राने राज्याच्या हितासाठी सडेतोड उत्तर देण्याची वेळ आलेली आहे. महाराष्ट्राने काही बांगडया भरलेल्या नाहीत हे त्यांना निक्षून सांगावे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांना मी सांगू इच्छितो की, ज्याप्रमाणे आंध्रप्रदेशचे आमदार बंधाऱ्यावर आले होते, त्याप्रमाणे तुम्ही 5-6 आमदारांना घेऊन त्यांना रोखण्यासाठी का गेला नाहीत ?

श्री.जितेंद्र आव्हाड : उपसभापती महोदय, होय, आपल्या नेतृत्वाखाली आम्ही त्या बंधाऱ्यावर जाऊ.

**उपसभापती** : ठीक आहे, मी नेतृत्व करीन.

श्री.वसंत चव्हाण : सभापती महोदय, मलासुध्दा याबाबतीत सांगावयाचे आहे. या धरणाबाबत सर्वोच्च न्यायालयात केस चालू आहे. आंध्रप्रदेशचे पाटबंधारे मंत्री यांनीसुध्दा असाच प्रकार केलेला होता, आता आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्री श्री.चंद्राबाबू नायडू हे मोठा जनसमुदाय घेऊन येतात आणि बंधारा उद्ध्वस्त करण्याची धमकी देतात, ही गंभीर बाब आहे. महाराष्ट्र शासनाने आंध्रप्रदेशची ही कृती थांबविण्यासाठी कोणते प्रयत्न केले ? याबाबत शासनाने निवेदन करावे अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** :सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांना मी सांगू इच्छितो की, आपण माझ या नेतृत्वाखाली बंधाऱ्यावर जाऊ असे म्हटले आहे, म्हणजे तुम्ही माझे नेतृत्व स्वीकारणार आहात, हे ऐकून मला फार आनंद झाला आहे. .....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद आव्हाड : उपसभापती महोदय, आम्ही कायम आपले नेतृत्व स्वीकारत आलेलो आहोत, परंतु आपण ते स्वीकारत नाहीत याचे शल्य व दु:ख आम्हाला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी काल या सभागृहात जो प्रकार केलेला आहे, त्याबद्दल आपण माफी मागितली परंतु त्यांनी मागितली नाही याची आम्हाला लाज वाटत आहे. या बंधाऱ्याबाबत मागील सहा महिन्यापासून सातत्याने आंध्रप्रदेशचे आमदार, पाटंबधारे मंत्री तसेच माजी मुख्यमंत्री श्री.चंद्राबाबू नायडू हे धमक्या देत आहेत. यापूर्वीही आंध्रप्रदेशने असा असा प्रकार केला होता, 40 आमदार घेऊन येतो असे म्हणाले होते, तेव्हा शिवसैनिकांनी त्यांना पिटाळून लावले होते. काल पुन्हा महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन केलेले आहे की, कोणत्याही परिस्थितीत पुन्हा असा प्रकार होऊ देणार नाही. सभापती महोदय, बंधाराच्या ठिकाणी सहा बॅरेजेसचे काम कायदेशीरपणे सुरु आहे. याबाबत नक्षलवाद्यांनीही काही धमक्या दिलेल्या आहेत. तसेच गोदावरी नदीवरील बंधाऱ्याचे काम रोखण्याच्याही धमक्या आलेल्या आहेत. आता दोन राज्याच्या सीमेवर युध्द सुरु होणार आहे, असे दिसते, याबाबत मी औचित्याचा मुद्दा मांडणार आहे. दुसरीकडे बिहारचे माजी मुख्यमंत्री श्री.लालूप्रसाद यादव "आपके मराठी भाषिक लोग भी बिहार में रहते है" अशा प्रकारची धमकी देतात. सभापती महोदय, मी शासनाला विचारु इच्छितो की, प्रत्येक वेळी आम्हीच सांभाळून घ्यायचे का ? सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्राने सरकारने त्यांना समज देण्याची आवश्यकता आहे,

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

की, असे तुम्ही कराल तर तुम्हालाही काही भोगावे लागेल. असे काही तरी आपण देखील केले पाहिजे असे मला येथे सांगावयाचे आहे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, बाभळी बंधाऱ्याचा हा प्रश्न मराठवाड्यातील एक महत्त्वाचा प्रश्न झालेला आहे. तेथील जवळपास 150 गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न या बंधाऱ्यामुळे सुटणार आहे. म्हणूनच या प्रश्नावरील गांभीर्य लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने विशेषत: मागास भागामध्ये तेथील पर कॅपिटा इन्कम सगळ्यात कमी आहे आणि तेथे अमानवी दृष्टीकोनातून जनतेच्या भावना लक्षात न घेता आंध्र प्रदेश ज्या पद्धतीने आक्रमण करीत आहे, ज्यामध्ये आपण कमी पडतो आहोत असे दिसते आहे., त्यामुळे मी सांगतो की, माननीय मुख्यमंत्री,, माननीय उपमुख्यमंत्र्यांसह आपण सगळ्यांनीच तेथे जायला पाहिजे. इतकेच नव्हे तर माननीय पंतप्रधानांना देखील या संदर्भात सांगितले पाहिजे की, आम्हाला प्यायला पाणी नाही, आम्हाला आमच्या हक्काचे पाणी देत नाही आणि त्यामुळे गोदावरील व्हॅलीत आज महाराष्ट्राकडून जे चांगले काम चालले आहे ते आम्ही जीवाची पर्वा न करता करीत आहोत. त्याबद्दलच्या भावना माननीय मुख्यमंत्र्यांनी, उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त कराव्यात. सभापती महोदय, नांदेडच्या भूकंपाच्या बाबतीत कदेखील असेच झाले होते. आता हा केवळ अस्मितेचा प्रश्न नाही तर आमच्या सगळ्यांच्याच जीवंत राहण्याचा प्रश्न आहे, तो साधा प्रश्न नाही म्हणून याबद्दल निवेदन करताना कालबद्ध ॲक्शन घेण्याची अपेक्षा मी करतो आणि यासाठी एक दिवसाची सुटी वाटल्यास आपण घेऊन, आपण सगळ्यांनीच तेथे जाऊन यावे अशी माझी नम्र सूचना आहे. सभापती महोदय, आपण या विषयीच्या माझ्या भावना स्पष्टपणे मांडण्यास आपण परवानगी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो. धन्यवाद.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, बाभळी धरणाला आंध्र प्रदेशच्या काही मंडळींनी भेट देण्यासंबंधीची बाब येथे उपस्थित करण्यात आलेली आहे. ही गोष्ट खरी आहे की, महाराष्ट्र हा नेहमीच घटनेचे पावित्र्य राखण्याचे प्रयत्न करीत आलेला आहे तसेच सुप्रीम कोर्टाच्या निर्णयांचा देखील आदर महाराष्ट्राकडून केला जातो. अन्य भाषिकांबरोबर चांगले संबंध राखले पाहिजेत आणि महाराष्ट्रातील अल्पभाषिकांना योग्य सन्मान दिला पाहिजे या सगळ्या भूमिका महाराष्ट्र नेहमीच घेत आलेला आहे. परंतु घटनेचे पावित्र्य राखण्याची भूमिका घेणे, लवादाच्या निर्णयाचा

...... एम 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आदर राखणे हा महाराष्ट्राचा चांगुलपणा महाराष्ट्राच्या शेजारची राज्ये महाराष्ट्राचा दुबळेपणा मानू लागली आहेत. त्यातूनच लवादांनी काहीही निर्णय घेतला असला, अलमट्टी धरणाची उंची वाढविण्यास कोर्टाने दिलेली मान्यता आम्हाला मान्य नाही अशी भूमिका शेजारच्या कर्नाटकाने मांडलेली आहे. महाराष्ट्रात राहणाऱ्या सर्व भाषिकांना या राज्यात चांगला न्याय दिला जात असतानाही कर्नाटकातील मराठी भाषिकांवर जबरदस्ती व जुलुम करण्याचा प्रयत्न तेथील शासनाच्या मान्यतेने दुर्दैवाने केला जातो. सभापती महोदय, नांदेड जिल्ह्यातील मानव विकास निर्देशांक वाढझ्याच्या पाठीमागे आणि पिण्याच्या पाण्याच्या मागे असलेल्या लवादाच्या निर्णयानुसार ठरवून दिलेल्या पाण्याचे महाराष्ट्राच्या हितासाठी बंधारे बांधून संरक्षण आपण करीत असताना त्याबाबत आंध्र प्रदेशच्या लोकप्रतिनिधींनी आततायी भूमिका घेतल्या आहेत. एखाद्या मंत्र्याचे, आमदारांचे शिष्टमंडळ किंवा एखाद्या माजी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्त्वाखाली आलेले शिष्टमंडळ असेल, जे वादाचे प्रकल्प असतात अशा प्रकल्पाला शेजारच्या राज्याने, राज्यातील प्रतिनिधींनी भेट द्यावयाची असेल तर किमान त्याबाबत राज्य सरकारला कळवून, राज्य सरकारची त्यासाठी परवानगी घेणे आवश्यक आहे, शिष्टसंमत आहे. हा प्रकल्प काही आम्ही चोरून सुरू केलेला नाही तर कोर्टाच्या, लवादाच्या परवानगीनेच सुरू केलेला आहे. सभापती महोदय, अलमट्टी धरणातून किती पाणी सोडले जाते हे पाहण्यासाठी जेव्हा आपले अधिकारी तेथे गेले तेव्हा तेथील सरकारने त्यांना हाकलून लावले. त्यानंतर आपला एक कार्यकारी अभियंता तेथे जाऊन त्याबाबत पाहणी करून आला होता. महाराष्ट्र आपल्या वाट्याच्या पाण्यापेक्षा अधिक पाणी घेत आहे, अडवित आहे असे त्यांना वाटत असेल तर त्यांनी रितसर पाहणी करण्याची परवानगी मागितली पाहिजे. परंतु 5-10 लोकांना एकत्र करून एखादी चढाई करतात अशी युद्धजन्य परिस्थिती निर्माण करून, आणि महाराष्ट्राच्या पोलीस दलाने काही कृती केली तर .. असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न तेथे केला जातो आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... एन 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

दुर्दैवाने आंध्र प्रदेशामध्ये एका पक्षाने एक भूमिका घेतल्यानंतर आपण पाठीमागे राहून कसे चालेल म्हणून दुसऱ्या पक्षाकडून देखील त्याच पध्दतीची भूमिका घेतली जाते. ही गोष्ट खरी आहे की, शेजारच्या राज्यामध्ये वेगवेगळया पक्षांचे लोकप्रतिनिधी असून ते एखादा प्रसंग आल्यावर एकसंघ होतात. तसे दुर्दैवाने महाराष्ट्रामध्ये होत नाही ही वस्तुस्थिती आहे. याचे प्रमुख कारण असे की, महाराष्ट्र हे कायद्याचे समर्थन करुन चालणारे राज्य आहे. त्यामुळे जी गोष्ट कायध्याने होणार आहे, त्याठिकाणी धाकदपटशा दाखवून आणि 20-25 आमदारांचे शिष्टमंडळ नेऊन देशातील कायदे बदलणार नाहीत आणि लवादाचे निर्णयही बदलले जाणार नाही. प्रश्न सोडविण्यासाठी 5-25 आमदारांना बरोबर घेऊन कुणी आंदोलनाची भूमिका घेत आहे, म्हणून महाराष्ट्राने देखील 5-25 आमदारांना घेऊन आंदोलनाची भूमिका स्वीकारली तर हा प्रश्न संपणार नाही. उलट त्यामुळे प्रश्न आणखी चिघळेल. आज कायदा आपल्या बाजूला आहे. बाभळीच्या बंधाऱ्याचे काम पूर्णपणे कायदेशीरपणे चालू आहे. महाराष्ट्राच्या वाटयाला जे पाणी आलेले आहे ते अडविण्याकरिता या बंधाऱ्याचे काम महाराष्ट्रामध्ये सुरु आहे. त्यामुळे कुणीही आंदोलन करुन राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्था निर्माण करुन त्याचा राजकीय फायदा उठविण्यासाठी प्रयत्न करीत असेल तर महाराष्ट्र शासन अशाप्रकारच्या गोष्टींना भीक घालणार नाही. त्यांचे शिष्टमंडळ तीन वेळा येऊन गेले, तिन्ही वेळा पोलिसांनी त्यांना परत पाठविले. आज सुध्दा त्यांच्याबरोबर काही लोकांचा मॉब येईल असे गृहीत धरुन योग्य तो पोलीस बंदोबस्त त्या परिसरात ठेवण्यात आला आहे. एखादी क्रिया घडली की, त्याची प्रतिक्रिया उमटत असते. आंध्र प्रदेशमधील लोकांनी धरणाचे काम बंद पाडतो असे म्हटल्यावर महाराष्ट्रातील लोकांनी त्यांना येऊ ध्या आम्ही बघून घेतो अशापध्दतीने संघटीत होऊन कायदा हाती घेण्याची आवश्यकता नाही. आंध्र प्रदेश सरकारला व तेथील जनतेला या सभागृहामार्फत आवाहन करतो की, महाराष्ट्र राज्य हे नेहमी शेजार धर्माचे पालन करीत आले आहे. शेजारचे राज्य जर अडचणीत आले तर सर्वात पहिल्यांदा त्या राज्याला मदत देण्याच्या बाबतीत आपले राज्य कधीही मागे पडले नाही. त्या राज्याला पाणी कमी पडले तर आपल्या शेतातील उभे पीक जाळून त्या राज्यांना पाणी देण्याची भूमिका या राज्याने स्वीकारली आहे. महाराष्ट्रातील मालमत्तेपेक्षा शेजारच्या राज्यातील होणारी जीवितहानी वाचविण्याची भूमिका या राज्याने नेहमी घेतली आहे. असे असतांना दोन राज्यांमध्ये तणाव निर्माण होईल अशाप्रकारचे पाप राजकीय फायध्यासाठी तेलगु देसमच्या लोकांनी आंध्र प्रदेशमध्ये करु नये. आणि आपली अस्थिरता

DGS/ KGS/ MHM/

श्री. आर. आर. पाटील...

लपविण्यासाठी कर्नाटकचे मुख्यमंत्री श्री. कुमारस्वामी यांनी सुध्दा कर्नाटकमधील सर्व प्रश्न संपले आहेत असे समजून मराठी भाषिकांवर अन्याय करणारी भूमिका घेऊन बेळगावमध्ये उपराजधानी निर्माण करण्याचा घाट घालून आणि त्याठिकाणी एअरपोर्ट व खाजगी उद्योगधंध्यांना चालना देऊन मराठी भाषिकांना अल्पसंख्यांक बनविण्याचे उद्योग शेजारच्या राज्यांमध्ये चालविले आहेत ते त्यांनी थांबविले पाहिजेत. ज्याप्रमाणे आंध्र प्रदेशचे शिष्टमंडळ माननीय पंतप्रधानांना जाऊन भेटून आले त्याप्रमाणे बाभूळ धरणाच्या बाबतीत महाराष्ट्राचे शिष्टमंडळ सुध्दा माननीय पंतप्रधानांना जाऊन भेटेल व हे राज्य त्यांच्यासमोर आपली योग्य ती बाजू ठेवेल. आणि शेजारचे राज्य घुसखोरी केल्यासारखे वागत आहे अशाप्रकारे हे राज्य शासन माननीय केंद्रीय गृहमंत्र्यांच्या लक्षात आणून देईल. शेजारच्या राज्यामधून आमच्या राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्था बिघडविण्याचे काम होणार नाही याची योग्य ती दक्षता राखण्याचे काम आवश्यक त्या मर्यादेपर्यंत केले जाईल. शेजारच्या राज्यामधून बॉम्बव्दारे या राज्यातील धरणे उडवून लावली जाणार असतील, आणि महाराष्ट्रातील कोणत्याही धरणाला हात लावण्याची भाषा ऐकविली जाणार असेल तर ही भाषा महाराष्ट्र राज्य कदापि सहन करणार नाही. त्याठिकाणी कायदा आपले काम चोखपणे करील. महाराष्ट्रातील प्रत्येक धरणाचे संरक्षण महाराष्ट्राचे प्रशासन आणि महाराष्ट्राच्या खेडापाडयातील जनता करील याचा मला विश्वास आहे. म्हणून अशाप्रकारची धमकावणी कुणी करु नये. जो कुणी अशाप्रकारची धमकी देत असेल तर त्यांचा तीव्र शब्दामध्ये मी धिक्कार करतो.

---

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>रामटेक लोकसभा पोट निवडणुकीच्या प्रचाराच्यावेळी निर्माण झालेल्या कायदा व सुव्यवस्थेसंबंधी</u>

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी नियम 289 च्या संदर्भातील विषय मांडला. याबाबत सन्माननीय सभागृहाच्या नेत्यांनी उल्लेख करून ज्या गोष्टीची मागणी केली त्याबाबतचा खुलासा झाला नाही. या घटनेच्या संदर्भात संबंधित मंत्री महोदयांवर 307 कलम लावले आहे की नाही ? आरोपींवर 395 आणि 506 कलमे लावली आहेत, या संदर्भात त्यांना केव्हा अटक करणार आहात ? यासबंधीचा खुलासा केलेला नाही. त्यांना त्वरित अटक करून त्या ठिकाणची कायदेशीर चौकशी करणार आहात काय ? केवळ मंत्रिमंडळामध्ये आपले सहयोगी मंत्री आहेत म्हणून कायद्यातून सूट देणार आहात काय ? याबाबतची माहिती दिलेली नाही. मंत्री महोदयांनी केले्या कृतीबद्दल त्यांना प्रोत्साहन देण्याची कोणत्याही प्रकारची भूमिका महाराष्ट्र शासनाने आणि गृहमंत्री महोदयांनी घेऊ नये, अशी आमची भूमिका आहे. या संदर्भाने आपण खुलासा केला तर मी आपला आभारी राहीन.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, पोलिसांना पोलिसांचे काम करू दिले पाहिजे. विधानसभेचे विरोधी पक्षनेते यांनी पोलिसांनी नि:पक्षपातीपणाने काम केलेले आहे अशाप्रकारचे उघडपणे पोलिसांना सर्टिफिकेट दिलेले आहे. या प्रकरणामध्ये दोन तक्रारी आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : आरोपींवर कोणती कलमे लावलेली आहेत ? ते सांगा.

श्री.आर.आर.पाटील : मी यापूर्वी कलमे वाचून दाखविलेली आहेत, तरी देखील पुन्हा सांगतो. कलम 143, 147,.149, 448,.295, 323, 336, 427, 294, 506,109 अशी श्री.राणे साहेब आणि श्री.सुबोध मोहिते यांच्यावर एफआयआरमध्ये ही कलमे लावलेली आहेत. श्री.नरेंद्र बाबूलाल चव्हाण, वय वर्षे 40, रा.काटोल यांनी दुसरी तक्रार नोंदविलेली आहे. त्यामध्ये सर्वश्री उध्दव ठाकरे, रामदास कदम, चंद्रकांत खैरे, सुभाष देसाई, देवेंद्र साटम, किशोर कुमेरिया, उप महापौर यांच्यावर 147, 149, 109, 409, 294, 509, 506, 323 कलमे लावलेली आहेत. तक्रार आल्यानंतर पोलिसांनी नोंदवून घेऊन लगेच त्यांना अटक केली तर त्याबाबतची कारणे द्यावी लागतात, पुरावे द्यावे लागतात, व्हीडिओ शुटिंग झाले असेल तर ते पहावे लागते, या कारणांची शहानिशा करावी लागेल. मी सदनाला इतकेच आश्वासन देऊ इच्छितो की, पोलीस नि:पक्षपातीपणाने आपले काम करतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : मला एकच गोष्ट निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, श्री.उध्दव ठाकरे आणि मी स्वत: एका हॉटेलमध्ये होतो, काटोलमध्ये नव्हतो. त्यांचा काही संबंध नाही. नागपूरपासून 45 कि.मी. दूर होतो. श्री.उध्दव ठाकरे यांना पोलीस प्रोटेक्शनही आहे, असे असतांना त्यांच्यावर कशी काय कलमे लावलेली आहेत ?

श्री.आर.आर.पाटील : तक्रार अर्ज दिल्यानंतर पोलिसांना तो घ्यावा लागतो आणि एफआयआर दाखल करावा लागतो. या संदर्भातील सुप्रीम कोर्टाचाच निर्णय आहे, तो पोलिसांवर बंधनकारक आहे. उध्दव ठाकरे यांना पोलीस सिक्युरिटी आहे, त्यांचाही रिपोर्ट आहे की, त्यावेळेला आम्ही तेथे नव्हतो. परंतु तक्रार आली.... मग ती गडबडीने आली म्हणून पहिल्या केसमध्ये यांना आणि दुसऱ्या केसमध्ये त्यांना अटक करण्याची भूमिका स्वीकारली असती तर पोलिसांवर टीका झाली असती. मिडियाप्रमाणे, न्यायालयालाही पुरावा द्यावा लागतो.

---

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**

श्री.कपिल पाटील (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, अतिशय खेदाने मी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. काल या सभागृहामध्ये दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र होत्या, त्या गोंधळामध्ये अतिशय महत्वाचे असे शिक्षक सेवकांसंबंधीचे विधेयक रेटून मंजूर करण्यात आले. जेव्हा जेव्हा हे विधेयक सभागृहामध्ये चर्चेला येत होते, त्या त्या वेळेस मी लेखी सूचना देऊन या विधेयकावर बोलण्यासाठी परवानगी द्यावी, अशी विनंती करत होतो...

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. उल्हास पवार )**

श्री. कपिल पाटील ...

सभापती महोदय, आताच सभागृहाचे नेते माननीय श्री. आर. आर. पाटील यांनी सांगितले की, हे ज्येष्ठ सभागृह आहे. या सभागृहाचा आदर आणि पावित्र्य राखले गेले पाहिजे. या सभागृहाला आपण कायदेमंडळ म्हणतो परंतु या ठिकाणी कायदे बनविण्याच्या प्रक्रियेला नख लावले जाते ही अतिशय खेदाची गोष्ट आहे. मी नवीन सदस्य आहे. परंतु मी या सभागृहामध्ये सदस्य म्हणून येण्याच्या आधी पत्रकार म्हणून प्रेस गॅलरीमध्ये उपस्थित असताना सभागृहाचे कामकाज पाहिलेले आहे. विधेयकांवर तासन तास, दिवस दिवस चर्चा होत असे. परंतु हे विधेयक या ठिकाणी आले त्यावेळी जर सन्माननीय सदस्यांना त्यावर आपले विचार मांडण्याचा संवैधानिक अधिकार बजावता येत नसेल तर मग या कायदेमंडळाला काय अर्थ राहतो ? याला कायदेमंडळ म्हणावयाचे की गोंधळमंडळ म्हणावयाचे अशी परिस्थिती सभागृहामध्ये निर्माण झाली आहे. त्याला सर्वस्वी शासन जबाबदार आहे. कारण या ठिकाणी विधेयक मंजूर करुन घेत असताना त्यावर विरोधकांचे म्हणणे ऐकून घेणे, एखाद्या सदस्याला आपली दुसरी बाजू मांडावयाची असेल तर ती बाजू ऐकून घेण्याची शासनाची तसेच या सभागृहाची आणि आपली जबाबदारी आहे. परंतु ही संधी काल कोणत्याही शिक्षक आमदाराला देण्यात आली नाही. सभापती महोदय, या बिलाच्या संदर्भात संबंध महाराष्ट्रामध्ये अतिशय तीव्र प्रतिक्रिया आहेत. या महाराष्ट्रामध्ये शिक्षक नावाची सन्माननीय संस्था निर्माण केली. या राज्याला शिक्षणाची फार मोठी परंपरा आहे. उद्या आपण महात्मा जोतिबा फुले यांची जयंती साजरी करणार आहोत. या सभागृहामध्ये त्यांचा फोटो लावलेला आहे. ज्या महात्मा जोतिबा फुले यांनी शिक्षणाच्या हक्काचा अधिकार दिला, सर्व बहुजनांना शिक्षणाची कवाडे खुली केली, स्त्रियांना शिक्षणाची कवाडे खुली केली आणि शिक्षक नावाची संस्था ज्या सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख यांनी निर्माण केली त्या शिक्षक संस्थेला नख लावणारे बिल या ठिकाणी मंजूर करण्यात आले. शिक्षकाला सेवक करण्याचे आणि वेतनाच्या जागी मानधन अशी लांच्छनास्पद तरतूद या विधेयकामध्ये आणली आणि ते विधेयक गोंधळामध्ये रेटून नेण्यात आले. या सबंध महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारे उलट पध्दतीचा निर्णय या सभागृहाने कधी घेतला नव्हता तशा पध्दतीचा निर्णय या सभागृहामध्ये झाला. माननीय शिक्षण मंत्री काल सभागृहात उपस्थित नव्हते. परंतु

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/

श्री. कपिल पाटील .....

माननीय शिक्षण मंत्र्यांनी विधानसभा सभागृहामध्ये असे उद्‌गार काढले की, असलेल्या एकूण शिक्षकांपैकी 95 टक्के शिक्षक अप्रामाणिक आहेत. माननीय शिक्षणमंत्री हे स्वत: शिक्षक आहेत. हे उद्‌गार म्हणजे येथील शिक्षण व्यवस्थेवरील सबंध पालकवर्गाचा आणि महाराष्ट्राचा विश्वास उडावा अशा पध्दतीचे उद्‌गार आहेत. महाराष्ट्रातील शिक्षकांना असे अप्रामाणिक ठरवत असताना त्या जोरावर अशा पध्दतीचे बिल आणवे हे अत्यंत खेदजनक आहे. माननीय शिक्षण मंत्री या ठिकाणी खुलासा करतील परंतु शिक्षक संस्था आणि शिक्षकांबद्दल इतक्या वाईट पध्दतीने माननीय शिक्षण मंत्री महोदय बोलत असतील तर मग शिक्षकांनी काय करावयाचे ? शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचे ओझे लादण्यात येते. त्यांना जनावरे, गुरेढोरे मोजण्याच्या कामी सुध्दा लावण्यात येते. ज्या पध्दतीने हे विधेयक आणून ते रेटून नेण्यात आले त्यामध्ये शिक्षकांना शिक्षण सेवक करुन चतुर्थश्रेणीमध्ये नेऊन ठेवले आहे. तसेच वेतनाच्या जागी मानधन अशी तरतूद यामध्ये आणलेली आहे. आतापर्यंत जी अवहेलना करण्यात येत होती त्यामध्ये अनुदानित आणि विनाअनुदानित अशी अवहेलना होत होती परंतु या ठिकाणी ज्या पध्दतीचे बिल आणले आणि त्याला कायदेशीर स्वरुप दिले त्याबद्दल मी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला आहे. मी आता बिलावर बोलत नाही परंतु जे गंभीर संकट निर्माण करुन ठेवलेले आहे तेवढ्यापुरते मी बोलत आहे. मी याबाबत जास्त वेळ बोलणार नाही. मी नेमका मुद्दा मांडतो. कोणतीही संधी न देता ज्या पध्दतीने हे बिल या ठिकाणी आणून मंजूर केले ते बरोबर नाही. त्यामुळे हे बिल असेच एकदा मागे घेतले पाहिजे आणि पुन्हा सुधारणा विधेयक या सभागृहामध्ये सादर केले पाहिजे. या ठिकाणी शिक्षकांना छळण्याचा उद्योग सुरु झालेला आहे. वस्तीशाळांतील ज्या 9168 शिक्षकांनी गेली पाच सहा वर्षे खेड्यापाड्यातील मुलांना प्राथमिक शिक्षण देण्याचे, त्यांना त्यांचा हक्क देण्याचे काम केले त्यांना शासनाने वाऱ्यावर सोडलेले आहे. कायम विनाअनुदानित 1 लाख शिक्षक आणि कर्मचाऱ्यांची उपासमार सुरु आहे. त्यांना कोणतेही भवितव्य उरलेले नाही. शिक्षकांवर अध्यापनाचे काम सोडून इतर ओझी लादण्याचे काम शिक्षण विभाग करीत आहे. ज्या पध्दतीने या संस्थांची अवहेलना सुरु केलेली आहे त्यामुळे गोरगरीब, बहुजन समाज या पुढच्या काळात शिक्षण घेऊ शकणार नाही अशी अवस्था या राज्यात निर्माण झालेली आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.बरवड 14:20

(श्री. कपिल पाटील...)

याचा धिक्कार करावा तेवढा थोडा आहे. सभापती महोदय, सभागृहाचे अन्य कामकाज बाजूला सारुन या महत्वाच्या विषयावर सभागृहामध्ये तातडीने चर्चा व्हावी यासाठी मी नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. ही चर्चा करण्याचा आमचा अधिकार आहे. काल गोंधळामध्ये आमचे अधिकार हिरावून घेतले. किमान आज तरी ते हिरावून घेतले जाऊ नयेत. सभापती महोदय, विधेयकावर बोलण्यासाठी जेव्हा सन्माननीय सदस्य उभे राहिले होते त्यावेळी त्यांना नजरअंदाज करुन, त्यांना बेदखल करुन विधेयक पुढे रेटून नेण्यात आले ही लांच्छनास्पद अशी बाब आहे. तेव्हा शासनाने नवीन विधेयक आणून त्यावर चर्चा करावी अशी सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे.

**तालिका सभापती** : नियम 289 अन्वये प्रस्तुत विषयावर चर्चा घेण्यात येईल. मात्र चर्चेचा दिवस माननीय सभापती ठरवतील.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या सदनामध्ये जे घडत आहे ते बरोबर आहे असे मला वाटत नाही. संसदेमध्ये जेव्हा सभागृहामध्ये विधेयके चर्चेसाठी येतात त्यावेळी गोंधळ झाला तर विधेयके गोंधळामध्ये मंजूर केली जात नाहीत. एखाद्या विषयासंबंधी तीन-चार सदस्य उभे राहिले तरी संसदेमध्ये बिलावरील चर्चा थांबविण्यात येते. सत्ताधारी पक्षाला अध्यादेश काढण्याचा अधिकार आहे. तसेच बहुमताच्या जोरावर त्या पक्षाला विधेयके पास करुन घेता येतात. आमचे काही विशिष्ट मुद्दे आम्ही मांडण्याचा प्रयत्न करीत असतो. सन्माननीय उपमुख्य मंत्री श्री. आर.आर.पाटील तसेच सन्माननीय मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ हे जेव्हा विरोधी पक्षामध्ये होते त्यावेळी त्यांनी देखील हेच केले. मी त्यांना दोष देत नाही. हा दोष खुर्चीचा आहे. सभापती महोदय, माझी आपणास सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने विनंती आहे की, गोंधळामध्ये विधेयके पास करुन घेऊ नयेत अशा प्रकारचा निर्णय एकमताने घ्यायला पाहिजे. विधिमंडळ हे कायदे मंडळ आहे. या विधिमंडळामध्ये आपण कायदे करतो. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी व्यक्त केलेल्या भावनांशी मी सहमत आहे. शिक्षकांच्या अस्मितेचा मुद्दा ज्या विधेयकामध्ये आहे ते विधेयक गोंधळामध्ये पास करण्यात आले. बहुमताच्या जोरावर सत्ताधारी पक्ष विधेयक पास करुन घेऊ शकतो. तो त्यांचा अधिकार आहे. लोकशाहीमध्ये आपण यशवंतराव

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी...)

चव्हाण, जवाहरलाल नेहरु यांचे नाव घेतो. निदान या शिक्षकांचे म्हणणे आपण ऐकून घेणार आहात की नाही ? माझे म्हणणे एवढेच आहे की, अशा त-हेने गोंधळामध्ये विधेयके पास होणे योग्य नाही.

**तालिका सभापती** : नियम 289 अन्वये या विषयावर सभागृहामध्ये चर्चा घेण्यात येईल.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, विरोधी पक्षाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी गोंधळामध्ये विधेयके घेतली जाऊ नयेत असे सांगितले. त्यांच्या भूमिकेशी मी शब्दश: सहमत आहे. गोंधळामध्ये विधेयके पास केली जाऊ नयेत ही बाजू जशी खरी आहे त्याच प्रमाणे विधेयकाच्या वेळी गोंधळ घालू नये ही दुसरी बाजू देखील विचारात घेतली पाहिजे. म्हणून गोंधळामध्ये विधेयके पास होऊ नयेत आणि विधेयकाच्या वेळी गोंधळ होणार नाही असा दोन्ही बाजूंनी विचार केला जाण्याची आवश्यकता आहे....(अडथळा).. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी शिक्षण खात्यासारख्या महत्वाच्या प्रश्नावर या ठिकाणी मुद्दा उपस्थित केल्यानंतर त्यावर चर्चा करण्यास शासनाने सहमती दर्शविली. ही चर्चा व्हायची तेव्हा होईल. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी माननीय शिक्षण मंत्र्यांचा हवाला देऊन एक दोन गोष्टींचा उल्लेख या ठिकाणी केला. माननीय शिक्षण मंत्र्यांनी काही टक्के शिक्षक अप्रामाणिक असल्याचे मत व्यक्त केल्याचे सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सांगितले. माननीय शिक्षण मंत्री असे म्हणाले की नाही, हे मला माहीत नाही. त्याबाबत मी माहिती घेईन. परंतु या सभागृहाचा नेता म्हणून मी सांगू इच्छितो की, महाराष्ट्र सरकारला राज्यामध्ये काम करणा-या शिक्षकांबद्दल नितांत आदर आहे. आज केरळ नंतर दुस-या क्रमांकाची साक्षरता आणि मोठ्या राज्यांमध्ये पहिल्या क्रमांकाची साक्षरता महाराष्ट्र राज्याची आहे. आज देशामध्ये जेवढे डॉक्टर्स, इंजिनिअर्स, सर्व आय.टी.क्षेत्रातील तज्ज्ञ आणि सर्वाधिक इंग्रजी बोलणारे मनुष्य बळ हे महाराष्ट्रामध्ये आहे.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.........

महाराष्ट्राचा प्रत्येक क्षेत्रातील विद्यार्थी देशातील कोणत्याही राज्यापेक्षा पुढे आहे. तो पुढे असण्यामध्ये शिक्षकांचे खूप मोठे योगदान आहे. शिक्षकांबद्दल राज्य सरकारला नितांत आदर आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी उभे असतात)

**उपसभापती** : यावर कोणतीही चर्चा होणार नाही. नियम 289 अन्वये सभागृहात या प्रश्नासंबंधी चर्चा घेण्यात येईल. माननीय सभापतींच्या अनुमतीने उद्या किंवा परवा या चर्चेसाठी वेळ देण्यात येईल.

आता मी पुढील कामकाज पुकारीत आहे.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे**

श्री.राणा जगतजितसिंह पाटील (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सन 2005-06 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.उल्हास पवार)**

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभापतीच्या आसनासमोरील मार्गिकेमध्ये येऊन बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.बाबा सिद्दीकी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने इचलकरंजी माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाचा (इचलकरंजी) सन 1993-94, 1994-95, 1995-96, 1996-97, 1997-98 चा वार्षिक लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कापूस बाजार मंडळाचा (बृहन्मुंबई) सन 1995-96, 1996-97, 1997-98, 1998-99 चा चोविसावा, पंचविसावा, सव्वीसावा व सत्ताविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा (नाशिक) सन 2001-2002, 2002-2003 चा सतरावा व अठरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------- ..3..



(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य करतात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोल्हापूर जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा (कोल्हापूर) सन 1992-93, 1993-94, 1994-95, 1995-96, 1996-97, 1997-98, 1998-99, 1999-2000, 2000-2001, 2001-02 चा वार्षिक लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----------

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभापतीच्या आसनासमोरील मार्गिकेमध्ये येऊन बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.धर्मरावबाबा आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळ मर्यादितचा सन 2003-2004 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----------

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

..4.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**<u>औचित्याचे मुद्दे</u>**

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडू इच्छितो.

सभापती महोदय, आधीपासून सुरु असलेल्या त्रासदायक भारनियमनात आणखी एक-दोन तासाची तातडीने भर पडल्यामुळे राज्यभर असंतोष खदखदत असून याचा कोणत्याही क्षणी भडका उडू शकतो.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात)

त्यामुळे कायदा व सुव्यवस्था धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याची प्रचिती गेल्या काही दिवसात नवी मुंबई, भिवंडी, कल्याण-डोंबिवली, उस्मानाबाद, अमरावती, यवतमाळ, नागपूर येथे आली आहे. तेथे संतप्त जनतेने उत्स्फूर्तपणे आंदोलन केले असता आंदोलकांवर पोलिसांनी अमानुषपणे लाठीमार करुन केसेस दाखल केल्या. राज्यात 5000 मे.वॅट विजेची तूट निर्माण झाली आहे. अशा वेळी कोयना व सेंट्रल सेक्टरमधून 500 मे.वॅट वीज कमी मिळते. तारापूर, दाभोळ येथील एक वीजनिर्मिती संच बंद पडले. गेल्या महिनाभरात पडघा येथे दोन वेळा वीज निर्मिती संच बंद पडले. परळी, पारस, दाभोळ येथील प्रकल्पातून वीज निर्मिती सुरु झालेली नाही. उरण येथे वीज निर्मिती केंद्रासाठी गॅस नसल्यामुळे वीजनिर्मिती पूर्ण क्षमतेने होऊ शकली नाही. अशा स्थितीत अनेक कारणांमुळे भारनियमनाच्या वेळेत मोठी वाढ झालेली आहे व आणखी वाढ होणार आहे. काही दिवसात 24 तास भारनियमन करणार का? असा संतप्त सवाल आज जनता करु लागली आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त .....

या खात्याचे संबंधित मंत्री कार्यक्षम असून वीज परिस्थिती चांगली होण्याच्या संदर्भात ते निश्चितपणे चांगल्या प्रकारचे प्रयत्न करीत आहेत. विजेच्या प्रश्नामुळे जनतेच्या मनात शंका आणि भिती निर्माण झालेली आहे. म्हणून माझी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती आहे की, विजेच्या संदर्भातील सत्य परिस्थितीबाबत शासनाने निवेदन करावे व यासंदर्भात तातडीने तोडगा काढण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे यासर्व गोष्टीबाबत या सार्वभौम सभागृहात जनतेला विश्वासात घेऊन सविस्तर निवेदन शासनास करण्यास सांगावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी जो औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे त्या संदर्भात मला शासनाच्या एक गोष्ट निदर्शनास आणून द्यावयाची आहे. विजेच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी निवेदन केले होते की, दाभोळ वीज प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत मार्च एंड पर्यंत सुरु होईल. यासंदर्भात जमीन उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात जे काही प्रॉब्लेम्स आहेत ते लवकर सोडवले जातील व मे महिन्याच्या सुरुवातीला दाभोळ वीज प्रकल्पातून राज्याला 2200 मे.वॅ. वीज मिळू शकेल. परंतु दाभोळ वीज प्रकल्पाच्या संदर्भात केंद्रीय मंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी टी.व्ही.वर जी मुलाखत दिली होती ती मी पाहिलेली आहे. त्यांनी ठोसपणे त्यावेळी सांगितले होते की, "नोव्हेंबर महिन्यापर्यंत दाभोळ वीज प्रकल्प सुरु होण्याची शक्यता नाही." त्यामुळे केंद्रीय मंत्री सत्य बोलत आहेत की, आपल्या राज्याचे ऊर्जा मंत्री सत्य बोलत आहेत यासंभ्रमात महाराष्ट्रातील जनता पडलेली आहे. या ठिकाणी विजेच्या संदर्भात जेव्हा शासनाकडून निवेदन होईल त्यावेळेस या मुद्याचा देखील त्यामध्ये समावेश करण्यात यावा व खुलासा करावा. आज संपूर्ण राज्यात मोठया प्रमाणात विजेचे लोडशेडींग केले जात आहे त्यामुळे येथे सुध्दा खामगाव सारखी परिस्थिती निर्माण होणार नाही याची शासनाने दक्षता घ्यावी व त्यासंदर्भात निवेदन करावे अशी विनंती आहे.

**तालिका सभापती** : शासनाने निवेदन करावे.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

शालेय शिक्षणात संगीत या विषयाला अतिशय महत्व आहे. शिक्षणामुळे माणूस आपल्या पायावर उभा राहतो. जगण्याचे साधन त्याला मिळते. परंतु जगायचं कशासाठी हे कला शिक्षण शिकवतं, असं महाराष्ट्राचे महान साहित्यिक पु.ल. देशपांडे यांनी म्हटलं आहे. संगीत हा कला शिक्षणाचा अनिवार्य भाग आहे. शिक्षण हा जीवनाचा आधार असेल तर संगीत त्या जीवनाला सूर मिळवून देतं, परंतु राज्यशासनाच्या शिक्षण धोरणात नेमका हाच सूर हरवलेला आहे. संगीत या विषयाला आणि संगीत शिक्षकांना दुय्यम आणि सापत्न भावाची वागणूक मिळते आहे. प्रत्येक शाळेला एक संगीत शिक्षक आवश्यक असतांना संगीत शिक्षकांची पदे सहसा भरली जात नाहीत. संगीत शिक्षकांवर पगाराच्या बाबतीतही मोठा अन्याय होत आहे. महाराष्ट्रातील संगीत शिक्षकांना चौथ्या वेतन आयोगानुसार पदवीधर प्रशिक्षित शिक्षकांची वेतन श्रेणी मिळत होती. परंतु पाचव्या वेतन आयोगानुसार या शिक्षकांना अपदवीधर प्रशिक्षितांची वेतनश्रेणी देण्यात आली आहे. वास्तविक त्यांना चौथ्या वेतन अरायोगा प्रमाणेच पाचव्या वेतन आयोगामध्येही पदवीधर प्रशिक्षित वेतनश्रेणी मिळणे आवश्यक आहे. संगीत विशारद ही पदवी आहे. दिल्ली आणि अन्य बोर्डातील संगीत शिक्षकांना समान वेतनश्रेणी मिळते. महाराष्ट्रातच मात्र दुजाभाव केला जात आहे. संगीताच्या क्षेत्रात महान कलाकारांचे योगदान देणा-या महाराष्ट्रात संगीत शिक्षण आणि शिक्षकांवरील हा अन्याय संगीतावर प्रेम करणा-या माननीय शिक्षणमंत्र्यांनी पर्यायाने राज्यशासनाने दूर करावा अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला औचित्याचा मुद्दा बरोबर आहे. या औचित्याच्या मुद्याच्या संदर्भात शासनाने निवेदन करावे. या औचित्याच्या मुद्याच्या द्वारे अत्यंत गंभीर प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला आहे. गेल्या अनेक वर्षापासून संगीत शिक्षक या प्रश्नाच्या संदर्भात झगडत आहेत. त्यामुळे शासनाने या गंभीर प्रश्नाची दखल घ्यावी व या गोष्टीला न्याय मिळवून द्यावा.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी संगीत शिक्षकांच्या संदर्भातील जो विषय मांडलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. या विषयाच्या सदर्भात चार महिन्यापूर्वी सन्माननीय सभापती महोदयांनी संगीत शिक्षकांची वेतनश्रेणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

तसेच संगीत अभ्यास क्रमाच्या संदर्भात एक बैठक आयोजित केली होती. या वर्षापासून संगीत विषय सुरु करण्याच्या बाबतीत शासन तातडीने निर्णय घेईल अशी चर्चा त्या बैठकीमध्ये झाली होती त्यामुळे सन्माननीय सभापती महोदयांनी जी बैठक आयोजित केली होती त्या बैठकीचा जो निर्णय घेतला होता तो निर्णय सुध्दा शासनाने लक्षात घ्यावा ही विनंती आहे.

यानंतर श्री. अजित......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KGS/ MHM/ 14:35

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, सन 2007-2008 चे बजेट सादर होऊन दहा दिवस झाले तरीही राज्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक उच्च माध्यमिक, ज्युनियर कॉलेजेस इत्यादी क्षेत्रातील शिक्षकांना मार्च 2007 चे वेतन प्राप्त झालेले नाही. सरकारी कर्मचाऱ्यांना मार्च महिन्याचे वेतन प्राप्त झालेले आहे. या संदर्भातील प्रोसिजरसुध्दा लांबचलक आहे. ट्रेझरी व बँक 10 ते 15 दिवस घेतात. म्हणजेच शिक्षकांना 25 मार्चपूर्वी वेतन मिळण्याची शक्यता नाही. या संदर्भात मी मंत्रालयात चौकशी केली असता मला असे समजले की, वेतनासंबंधीचे पत्र अजून डायरेक्टरांकडे गेलेले नाही. तेव्हा यापुढे 13 मार्च पूर्वी शिक्षकांना वेतन मिळेल अशाप्रकारच्या सक्त सूचना विभागाला द्याव्यात अशी माझी आपल्यामार्फत माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शिक्षकांना मार्च महिन्याचे वेतन वेळेवर देण्याची व्यवस्था केली जाईल.

-------------------

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग-खारेपाटण या खाडीलगत असलेल्या मुटाट येथे 18 वर्षापूर्वी बांधलेला खार बंधारा फुटल्यामुळे त्या परिसरातील जवळपास 200 एकर जमीन नापिकी झालेली आहे. मुटाट येथील बंधारा अतिशय जीर्ण अवस्थेत आहे. त्याची तातडीने दुरुस्ती होण्याची आवश्यकता आहे. तेव्हा या संदर्भात मंत्रिमहोदयांनी लक्ष घालावे अशी माझी आपल्यामार्फत त्यांना विनंती आहे.

-------------

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, राज्यात रेसिडन्ट डॉक्टरांची संख्या फार कमी असल्यामुळे रुग्णांचे फार हाल होत आहेत. ही पदे एमपीएससीमार्फत भरण्यात येतात. मराठवाड्यातील औरंगाबाद आणि अंबेजोगाई येथील मेडिकल कॉलेजेसमध्ये रेसिडन्ट डॉक्टरांची पदे रिक्त आहेत. विशेषत: घाटी रुग्णालयात रेसिडन्ट डॉक्टरांची पदे रिक्त आहेत. तेव्हा माझी आपल्यामार्फत वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांना विनंती आहे की, रेसिडन्ट डॉक्टरांची पदे भरण्याबाबत त्वरित कार्यवाही करण्यात यावी.

श्री.सुरेश शेट्टी :सभापती महोदय, नोंद घेतली आहे.

--------------

..2..

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सीमा प्रश्ना संदर्भातील याचिका उच्च न्यायालयाने पुढे ढकलली आहे. घटनेच्या अधिकारात अधीन राहून कर्नाटक सरकारने संपूर्ण राज्यामध्ये शिक्षणाचे माध्यम हे कन्नड भाषा राहील, अन्य भाषा स्वीकारली जाणार नाही, जर कन्नड भाषेत शिक्षण घ्यावयाचे नसेल तर त्यांनी केंद्र शासित शाळेत प्रवेश घ्यावा अशाप्रकारचे सक्त आदेश काढले आहेत. या आदेशाचा परिणाम बेळगाव,निपाणी आणि कारवार भागातील मराठी जनतेवर होणार आहे. बाजूच्या राज्यात मराठी भाषेचा गळा कापला जात असेल तर या महाराष्ट्रात सुध्दा सर्वच ठिकाणी मराठीचा वापर अनिवार्य केला पाहिजे. कर्नाटक राज्यात एम.ए., इंजिनियरींग इत्यादींचे शिक्षण सुध्दा कन्नड भाषेत दिले जाते. तेव्हा महाराष्ट्रात सुध्दा संपूर्ण शिक्षण मराठीतून देण्यासंदर्भात शासनाने धोरण जाहीर करावे.

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, आपल्या पुण्यामध्ये अनुदान मिळणाऱ्या ज्या मराठी शाळा आहेत, त्याठिकाणी गणित आणि विज्ञान हे विषय इंग्रजीतून शिकवले जातात. ते तातडीने बंद करण्यात यावेत व मराठीतूनच ते विषय शिकवले जावेत, अशी मी आग्रही भूमिका याठिकाणी मांडतो. याबाबतीत ज्याप्रमाणे कर्नाटक सरकारने भूमिका घेतली आहे, त्याप्रमाणे आपल्याही राज्य सरकारने भूमिका घ्यावी व मराठीच्या संदर्भातील घोषणा अधिवेशन संपण्यापूर्वी करावी. सर्वंकष मराठी भाषेच्या निर्णय घेण्यात येईल, असा महाराष्ट्र शासनाच्या वतीने शब्द दिला होता, त्याप्रमाणे मराठीबाबतचे धोरण तातडीने अंमलात आणावे, अशी माझी विनंती आहे. तसेच, आपल्याकडे जे गुजरात, ऊर्दू, कन्नड, तामिळी, सिंधी भाषिकांचे जे लाड चालू आहेत, ते तातडीने थांबवावेत. 2007-2008 पासून मराठीच्या वापराची जी भूमिका आपण घेतली आहे ती तातडीने अंमलात आणावी, ही नम्र विनंती. तसेच, यासंदर्भातील घोषणा अधिवेशन संपेपर्यंत करावी, अशीही माझी आग्रही भूमिका मांडतो.

**तालिका सभापती** : यासंदर्भात कर्नाटक सरकारने कशा स्वरुपाचा कायदा केलेला आहे किंवा याबाबतीत कसा आदेश काढला आहे, तो मागवून घ्यावा व त्यांची भावना समजून घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, होय.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय मंत्री महोदय, श्री.राजेश टोपे यांच्या पत्राबाबत.**

**तालिका सभापती** : माननीय मंत्री महोदय श्री.राजेश टोपे यांचे माझ्याकडे एक पत्र आलेले आहे. ते तातडीने जालना येथे गेल्यामुळे त्यांच्या विभागाचे आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये जे कामकाज दाखविण्यात आले आहे ते पुढे ढकलावे, अशी त्यांनी पत्राद्वारे विनंती केलेली आहे. त्यांची विनंती आपण मान्य करु या.

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, रामनाथ मोते, विनोद तावडे, वि.प.स. यांनी "शिक्षण शुल्क समितीने महाराष्ट्रातील व्यावसायिक अभ्यासक्रमांची घोषित केलेली प्रचंड शुल्क वाढ संस्थाचालकांनी दिलेल्या माहितीची कोणत्याही प्रकारची उलट पडताळणी न करता केली असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु याबाबत शासनाने निवेदन करावे.

यांनतर सर्वश्री नितीन गडकरी, सागर मेघे, विनोद तावडे, वि.प.स. यांनी "मौजे बांद्रा, मुंबई येथील न.भू.क्र.629 (पै.), 629/12 ते 61 या जमिनीवरील शास्त्रीनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेतर्फे राबविण्यात येत असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेकरिता परिशिष्ट-2 मध्ये 160 झोपडपट्टी धारकांची नावे बोगस असल्याबाबत शास्त्रीनगर येथे राहणाऱ्या श्री.दामोदर गायकवाड व इतर नागरिकांनी प्राधिकरणाकडे केलेली तक्रार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री जयंत पाटील, शरद पाटील, वि.प.स. यांनी "पोलादपूर (जि.रायगड) मध्ये दि.15.2.2007 रोजी अनधिकृत गॅसची विक्री करणाऱ्या गोदामामध्ये गॅसचा स्फोट झाल्यामुळे अनेक दुकाने आगीच्या भक्ष्यस्थानी पडून लाखो रुपयांची वित्त हानी झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.श्रीकांत जोशी, वि.प.स. यांनी "राज्य सरकारतर्फे खरेदी हंगामात जिल्हयातील विविध केंद्रावर खरेदी केलेल्या 1 लाख 38 हजार 614 क्विंटल मक्यापैकी जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी केलेल्या तपासणीत 56 लाखांचा मका गायब झाल्याचे लक्षात आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु याबाबत शासनाने निवेदन करावे.

..4.....

**तालिका सभापती**....

यानंतर श्री.श्रीकांत जोशी, वि.प.स. यांनी "सांगली जिल्हयातील सात महाविद्यालयांनी नोकरी विषयक मार्गदर्शन केंद्रे चालविल्याची खोटी कागदपत्रे तयार करुन विद्यापीठ अनुदान आयोगाचे (युजीसी) 50 लाख रुपये अनुदान हडप केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु याबाबत शासनाने निवेदन करावे.

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती**....

यानंतर श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स यांनी "डॉ, बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील 10 व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार 6 पदांना मान्यता देऊन पाच वर्षानंतरची आर्थिक जबाबदारी राज्यशासनाने स्वीकारावी या अटीवर मंजूर करणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर डॉ. निलम गोऱ्हे, वि.प.स यांनी " अजय बहादूरसिंग यांनी दि. 8.4.2007 रोजी एकतर्फी प्रेमातून हनुमान नगर आकुर्ली रोड, रमाबाई चाळीत राहणाऱ्या कुमारी सत्या शोभनासिंग वय वर्षे 18 या तरुणीने लग्नास नकार दिल्याने त्यांचे घर पेटवून दिल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे ,वि.प.स यांनी " माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रासाठी राखीव असलेला 29000 चौ. फूटाचा भूखंड सिडकोने कोणतीही निविदा न काढता प्रती मीटर 13500 रुपये भावाने घरबांधणी व व्यावसायिक वापराकरिता रहेजा बिल्डर या विकासकाला दिल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर प्रा. शरद पाटील, श्री.जयंत प्र.पाटील,वि.प.स यांनी " मुंबई,ग्रँटरोड येथील ब्राम्हणवाडीमधील 443 सी.डी. ठक्कर चाळ या उपकर प्राप्त इमारतीच्या दुरुस्तीसाठी तेथील भाडेकरुनी 11 लाख रुपये मुंबई इमारत आणि पुनर्रचना मंडळाकडे नोव्हेंबर, 2006 मध्ये भरुन देखील इमारतीची दुरुस्ती अद्याप सुरु न झाल्याबाबत"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु याबाबत शासनाने निवेदन करावे.

इतर ज्या 93 च्या सूचना होत्या त्यांना दालनात अनुमती नाकारण्यात आलेली आहे.

..2..

श्री. परशुराम उपरकर :सभापती महोदय, "दिनांक 3एप्रिल, 2007 रोजी सिंधुदूर्ग जिल्हयाचे पोलीस अधीक्षक, श्री. प्रसन्न यांच्या नातेवाईकांची गाडी शिरोडा बाजारात वाहतूक कोंडीत अडकल्याने त्याचा राग काढत श्री. प्रसन्न यांचे कमांडोने श्री. सत्यवान तेंडुलकर या रिक्षाचालकाला मारहाण केल्याबाबत, तसेच त्याची तक्रार घेण्यास पोलिसांनी दिलेला नकार" या विषयावर मी नियम 93 अन्वये सूचना दिलेली होती....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आता सन्माननीय सदस्य श्री. उपरकर यांनी 93ची सूचना दिलेली होती त्या तालुक्यावर जो अन्याय झाला, त्या कुटुंबावर हल्ला केला गेला त्या संदर्भातील नियम 93 ची सूचना देण्यात आली होती. ती सूचना नाकारण्याचे कारण काय होते ? त्या बाबतीत निवेदन करणे आवश्यक होते.

**तालिका सभपती** : माननीय सभापतींना विचारुन त्या सूचनेवर अंतिम निर्णय घेण्यात येईल.

..................

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, महाड येथे भार नियमनाच्या विरोधी जनतेचा उद्रेक झालेला आहे. त्यासंदर्भात आम्ही नियम 93ची सूचना दिली होती . महाराष्ट्रात अनेक ठिकाणी भारनियमन विरोधी आंदोलनास हिंसक स्वरुप प्राप्त झालेले आहे.

यानंतर श्री. रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे..........

यासंबंधी आम्ही जी नियम 93 अन्वये सूचना दिली होती ती येथे वाचून दाखविण्यात आलेली नाही. त्यामुळे ती सूचना नाकारली आहे किंवा कसे, हे आम्हाला कळले नाही.

**उपसभापती** : मी आपल्या भावनेशी सहमत आहे. मी ताबडतोब चौकशी करतो व आपल्याला अवगत करतो.

----------------

..2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**म्हाडाच्या सदनिका वितरणात झालेल्या भ्रष्टाचाराबाबत**

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, म्हाडामध्ये भ्रष्टाचार झाला. ज्यांना सदनिका वितरीत करण्यात आली होती ते राहण्यासाठी गेल्यानंतर दुसरेच घुसखोर तेथे रहात असल्याचे लक्षात आले. या भ्रष्टाचारासंबंधी नियम 93 अन्वये सूचना दिली होती व माननीय सभापती महोदयांनी तीन दिवसात निवेदन करावे, असे निदेश दिनांक 16 मार्च 2007 रोजी दिले होते. आज 10 एप्रिल आहे परंतु अद्याप शासनाने निवेदन केलेले नाही.

**उपसभापती** : गृहनिर्माण राज्यमंत्री, ॲड.प्रीतमकुमार शेगावकर सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी या बाबीची नोंद घेऊन दोन/तीन दिवसात सभागृहात निवेदन करावे.

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, होय.

-----------------

..3...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: ऊस पिकातील ठिबक व तुषार सिंचन संचासाठी शेतक-यांना तात्काळ अनुदान देण्यासंबंधी

**मु.शी.**: ऊस पिकातील ठिबक व तुषार सिंचन संचासाठी शेतक-यांना तात्काळ अनुदान देण्याबाबत प्रा.शरद पाटील व श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.राणा जगजितसिंह पाटील (कृषि राज्यमंत्री) : सभापती महोदय, प्रा.शरद पाटील व श्री.जयंत प्र.पाटील, वि.स.स.यांनी "ऊस पिकातील ठिबक व तुषार सिंचन संचासाठी शेतक-यांना तात्काळ अनुदान देणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

--------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेवरील निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, ऊस, कापूस, गळीत धान्य, कडधान्य इत्यादि शेतीपिकांचा यामध्ये समावेश नव्हता. ऊस पिकाकरिता सुक्ष्म सिंचन योजनेअंतर्गत अनुदान दिले जात नाही, असे शासनाने म्हटले आहे. मी मंत्री महोदयांना प्रश्न विचारु इच्छितो की, सन 2005-2006 मधील बिगर फलोत्पादन पिकासाठी बसविलेल्या सुक्ष्म सिंचन संचासाठी शेतक-यांना अनुदान देण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाने जिल्हयातील कृषि खात्याकडून मागविला आहे, हे खरे आहे काय, हे खरे असेल तर शेतक-यांना अनुदान देण्यासंबंधी शासनाचा विचार आहे काय व त्यासंबंधी काय तरतूद आहे ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सुक्ष्म सिंचन संचासाठी अनुदान देण्याबाबतचे धोरण सन 2001 मध्ये स्वीकारले होते. त्यानुसार 75 टक्के अनुदान देण्यात येत होते. सन 2002-2003 मध्ये हे अनुदान 25 टक्क्यांपर्यन्त खाली आणण्यात आले. 75 टक्के केंद्र शासनाचा हिस्सा व 25 टक्के महाराष्ट्र शासनाचा हिस्सा अशा प्रकारची ही योजना होती. सन 2005-2006 मध्ये नॅशनल हॉर्टिकल्चर मिशन सुरु झाल्यानंतर हॉर्टिकल्चरल क्रॉप्ससाठी ही योजना सुरु ठेवावी व 50 टक्के अनुदान द्यावे, असे केंद्र शासनाने ठरविले होते. महाराष्ट्र शासनानेही हेच धोरण राबविले होते. सन 2005-2006 मध्ये हॉर्टिकल्चरल क्रॉप्ससाठी सुक्ष्म सिंचन योजना करण्यात आली व त्याप्रमाणे अनुदान देण्यात आले. सन 2006-2007 पासून सगळयाच पिकांना ड्रिप इरिगेशन व स्प्रिंकलर इरिगेशनसाठी अनुदान देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कृषि खात्याकडून ऊस ठिबक सिंचन संचाबाबतचे प्रस्ताव मागविण्यात आले आहेत व त्याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्याचा प्रयत्न राहिल.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, माझा मूळ प्रश्न असा होता की, शेतक-यांना अनुदान देणार काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, हा सन 2005-2006 मधील विषय आहे. त्यामुळे त्याबाबत लगेच निर्णय घेणे कठीण आहे. तरी देखील सन्माननीय सदस्यांनी विनंती केल्यानुसार वित्त विभागाशी चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल.

----------------

..5..........



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सांगली जिल्हयातील आटपाडी तालुक्यातील झरे मानेवाडी व चिंचाळे येथील साठवण तलावांसाठी करावयाच्या भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण न होणे

**मु.शी.**: सांगली जिल्हयातील आटपाडी तालुक्यातील झरे मानेवाडी व चिंचाळे येथील साठवण तलावांसाठी करावयाच्या भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण न होणे बाबत प्रा.शरद पाटील वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.राणा जगजितसिंह पाटील (कृषि राज्यमंत्री) : सभापती महोदय, प्रा.शरद पाटील, वि.स.स.यांनी "सांगली जिल्हयातील आटपाडी तालुक्यातील झरे मानेवाडी व चिंचाळे येथील साठवण तलावांसाठी करावयाच्या भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाची प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, सांगली जिल्हयातील आटपाडी या दुष्काळी तालुक्यातील शेतक-यांच्या जमिनी साठवण तलावासाठी घेण्याबाबतचा हा प्रश्न आहे. सन 2001 पासून शेतक-यांच्या जमिनी ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु झाली आहे. त्या ठिकाणी साठवण बंधारा तयार झाला आहे व पाणी साठवण देखील सुरु झाले आहे. तथापि, अद्याप त्या शेतक-यांच्या जमिनीच्या भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. त्यामुळे हे शेतकरी वर्षानुवर्षापासून भूसंपादनाच्या मोबदल्यापासून वंचित राहिले आहेत व त्यामुळे भूसंपादनाचा मोबदला मिळण्याबाबत शेतकरी सातत्याने मागणी करीत आहेत. परंतु, त्यांना अद्याप मोबदला मिळू शकलेला नाही. भूसंपादनाची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी शासन काही तातडीचे आदेश देणार काय ? तसेच, निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदात असे म्हटले आहे की, तालुका निरिक्षक भूमी अभिलेख आटपाडी कार्यालयात सन 2003-2004 पासून भूकरमापकाची (सर्वेअर) मंजूर असलेली दोन्ही पदे रिक्त आहेत त्यामुळे भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण होऊ शकलेली नाही. माझा प्रश्न असा आहे की, भूसंपादनाची प्रक्रिया किती दिवसात पूर्ण करण्यात येईल व शेतक-यांना भूसंपादन मोबदल्याची रक्कम मिळण्याची व्यवस्था किती दिवसात करण्यात येईल ?

यानंतर कुमारी जयश्री.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील : मानेवाडी,झरे,चिंचाळे या तिन्ही ठिकाणची भूसंपादनाची 2 / 3 रक्कम ही सन 2005 मध्येच जमा करण्यात आली. या तिन्ही ठिकाणच्या स्थानिक शेतक-यांनी जी काही रक्कम ठरलेली आहे, त्याला जर संमती दिली तर पुढच्या तीन महिन्यामध्ये सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

X - 2

पृ.शी. : बीड जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पोलिओ लसीचा पुरवठा केल्याचा खोटा अहवाल दिल्याबाबत

मु.शी. : बीड जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पोलिओ लसीचा पुरवठा केल्याचा खोटा अहवाल दिल्याबाबत सर्वश्री श्रीकांत जोशी,पाशा पटेल,वि.प.स. यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना.

श्री.रणजित कांबळे (ग्रामविकास,सार्वजनिक आरोग्य,कुटुंबकल्याण,पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री श्रीकांत जोशी,पाशा पटेल,वि.प.स. यांनी बीड जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पोलिओ लसीचा पुरवठा केल्याचा खोटा अहवाल दिल्याबाबत नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभाजृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : या घटनेमध्ये बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा व गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. या ठिकाणच्या स्त्री आरोग्य सहाय्यिका रजेवर असल्याची कल्पना असतांना देखील पर्यायी व्यवस्था उपलब्ध न केल्यामुळे बीड जिल्हयामध्ये हा प्रकार घडलेला आहे. सदर वैद्यकीय अधिका-यांवर लवकरात लवकर कारवाई करण्यात येत आहे, असेही निवेदनात म्हटलेले आहे, यावरुन असे दिसून येते की, शासनाने ही जबाबदारी स्वीकारलेली आहे. आरोग्य विभागाचा गलथान कारभार चालू आहे. यासाठी रिन्यू सिस्टम किंवा संगणकीकरण वगैरे व्यवस्था या निमित्ताने शासन करणार आहे का ? ग्रामीण स्तरावर वेगवेगळी औषधे,साथीच्या रोगावरील औषधे, फवारणीसाठी देण्यात येणारी औषधे वेळेत पोहोचतात का ? याचा फीडबॅक घेण्याची व्यवस्था शासनाकडून करण्यात येणार आहे का ? करणार असल्यास किती दिवसांमध्ये पूर्ण करणार ?

श्री.रणजित कांबळे : संगणकीकरणाचा प्रस्ताव अद्याप विचाराधीन आहे एचसीएल ही कंपनी तसेच, आरोग्य खाते यासंदर्भात इनपूट आऊटपूट,फंडामेंटल डेव्हलपमेंट,स्टाफ ट्रेडिंग,पी.एच.सी.,आर.एच या सर्वांबद्दल तालुका पातळीवर माहिती गोळा करीत आहे. मला अशी खात्री आहे की, सहा महिन्यांमध्ये हे काम 100 टक्के पूर्ण होईल व या घटनेमध्ये ज्या दोषी अधिका-यांवर कारवाई करण्यात येत आहे, ती देखील 15 दिवसांमध्ये पूर्ण होईल.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कायम विनाअनुदानित शाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी इतरांप्रमाणे वेतन अनुदान व इतर शैक्षणिक सवलतींपासून वंचित राहणे.

मु.शी. : कायम विनाअनुदानित शाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी इतरांप्रमाणे वेतन अनुदान व इतर शैक्षणिक सवलतींपासून वंचित राहणे याबाबत श्री.वसंतराव खोटरे,प्रा.बी.टी.देशमुख,सर्वश्री. व्ही.यू डायगव्हाणे,जी.एल.अैनापुरे,दिलीपराव सोनावणे,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री.वसंतराव खोटरे,प्रा.बी.टी.देशमुख,सर्वश्री.व्ही.यू डायगव्हाणे,जी.एल.अैनापुरे,दिलीपराव सोनावणे,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलज्न, आपज निदेश दिल्याप्रमाजे मला निवेदन ज्रावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अजोदरच वितरीत जेलेल्या असल्याने मी हे निवेदन सभाजृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.वसंतराव खोटरे : महाराष्ट्र राज्यामध्ये सन 2000 - 2001 कायम विनाअनुदानित

तत्वावर प्राथमिक,उच्च माध्यमिक शाळांना तुकडया देण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. शासनाकडून याबाबत एक शुध्दपत्र देखील कोर्टामध्ये सादर करण्यात आले होते. ज्यावेळी राज्यशासनाची आर्थिक स्थिती सुधारेल आणि सध्या विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या व सुरु असलेल्या सर्व शाळा व आवश्यक वर्ग / तुकडया प्रचलित अनुदानसूत्रानुसार 100 टक्के अनुदानावर येतील त्यावेळी कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना अनुदान देण्याबाबत शासन धोरण निश्चित करेल. माननीय अर्थमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्राची आर्थिक स्थिती चांगली आहे. म्हणून माझे म्हणणे असे आहे की,शासन आता विनाअनुदान तत्वावरील शाळांना दोन महिन्यांमध्ये अनुदान देण्याबाबतचे आदेश निर्गमित करेल का ?

श्री.हसन मुश्रीफ : महाराष्ट्र राज्यामध्ये अजूनही 303 शाळा व 1750 तुकडया या अनुदानावर यावयाच्या आहेत. राज्यशासनाने उच्च न्यायालयामध्ये शुध्दीपत्रक सादर केलेले आहे. शासनाने सांगितलेले आहे की, जसजशी राज्याची आर्थिक स्थिती आता सुधारत आहे तसतसे राज्यशासन झोपडपट्टी,डोंगराळ भाग येथील शाळा अल्पसंख्यांक यांच्या शाळा टप्प्याटप्प्याने अनुदानावर आणत आहे. माननीय अर्थमंत्री यांनी सांगितले की, राज्यशासनाची आर्थिक परिस्थिती चांगली आहे परंतु तेवढेच कर्जदेखील राज्यशासनावर आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





पृ.शी. : ग्रंथालय संचालनालयातर्फे घेतल्या जाणा-या ग्रंथपालन प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या वर्गांना वेळेत परवानगी न मिळणे.

मु.शी. : ग्रंथालय संचालनालयातर्फे घेतल्या जाणा-या ग्रंथपालन प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या वर्गांना वेळेत परवानगी न मिळणे याबाबत प्रा.शरद पाटील,श्री.जयंत प्र.पाटील,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुरेश शेट्टी. ( वैद्यकीय शिक्षण,उच्च व तंत्रशिक्षण,पर्यटन,विशेष सहाय्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, प्रा.शरद पाटील,श्री.जयंत प्र. पाटील,वि.प.स. यांनी " ग्रंथालय संचालनालयातर्फे घेतल्या जाणा-या ग्रंथपालन प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या वर्गांना वेळेत परवानगी न मिळणे." या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



प्रा.शरद पाटील : सभापती महोदय,या ठिकाणी ग्रंथालय संचालनलयाकडून घेण्यात येणा-या परीक्षेची परीक्षा घेण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडे सोपविण्याचा निर्णय राज्यशासनाने घेतलेला आहे, असे या ठिकाणी निवेदनामध्ये सांगितलेले आहे. खरे पाहिले तर या

तंत्रशिक्षण मंडळाकडे ही जबाबदारी न सोपविता ग्रंथालय संचालनालयावरच सोपविली पाहिजे व त्यात होणारे गैरप्रकार टाळण्यासाठी काहीतरी उपाययोजना करणे आवश्यक आहे. तंत्रशिक्षण मंडळाकडे परीक्षा घेण्याची ही जबाबदारी न सोपविता पुर्ववत ग्रंथालय संचालनालयाकडेच सोपवावी, अशी राज्य ग्रंथालय संघाची जी मागणी आहे ती मागणी शासन मान्य करेल का ? व हे गैरप्रकार थांबविण्यासाठी काही व्यवस्था शासन करेल का ? ती करावी अशी माझी मागणी आहे.

ाानंतर श्री.बोरले......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळामार्फत घ्यावी, असा निर्णय राज्य शासनाने घेतला होता. यावर्षी गंथालय संचालनालयातर्फे ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा घेण्यात येणार आहे. हे खरे आहे की, ग्रंथालय संचालनालयामध्ये पूर्वी भ्रष्टाचार झालेला होता. आम्ही त्यामध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु ते झाले नाही. पुढच्या वर्षी डायरेक्टर ऑफ टेक्निकल एज्युकेशनमार्फत परीक्षा घेण्यात येणार आहे.

-------

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**नियम 93 च्या निवेदन क्र.6 बाबत.**</u>

नितीन गडकरी : सभापती महोदय, निवेदन क्र.6 ला कोणते मंत्री उत्तर देणार आहे ? माननीय वित्त मंत्री श्री.जयंत पाटील सभागृहामध्ये उपस्थित नाहीत.

**तालिका सभापती** : तोपर्यंत आपण पुढचे निवेदन घेऊ.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आदिवासी तालुक्यांमध्ये शासनाने कोटयावधी रुपये खर्च करुन देखील कुपोषित बालकांच्या संख्येत घट न होणे.

**मु. शी.** : आदिवासी तालुक्यांमध्ये शासनाने कोटयावधी रुपये खर्च करुन देखील कुपोषित बालकांच्या संख्येत घट न होणे याबाबत डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.धर्मरावबाबा आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी "आदिवासी तालुक्यांमध्ये शासनाने कोटयावधी रुपये खर्च करुन देखील कुपोषित बालकांच्या संख्येत घट न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

..4.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, नियम 93 च्या सूचनेला दिलेल्या लेखी निवेदनामध्ये जी आकडेवारी देण्यात आलेली आहे ती ग्रेड 3 आणि 4 ची आहे. मी नियम 93 च्या सूचनेमध्ये असे म्हटले होते की, "आजमितीला तेथे 10 हजार बालके कुपोषित असल्याचे आढळून आले आहे." माझा पहिला प्रश्न असा आहे की, ग्रेड 1, 2, 3 व 4 मध्ये एकूण किती बालके कुपोषित आहेत ? पाडा स्वयंसेवक योजना, नवसंजीवन योजना आणि मातृत्व अनुदान योजनांची सन 2006-07 ची आकडेवारी माझ्याकडे आहे. सन 2006-07 मध्ये या योजनांवर साधारणत: 67 टक्के रक्कम खर्च झालेली आहे. पाडा स्वयंसेवक योजनेसाठी 373.52 लाख इतके अनुदान प्राप्त झाले होते. त्यापैकी 80.73 लाख रुपये खर्च झालेले आहेत. मातृत्व अनुदान योजनेची देखील हीच परिस्थिती आहे. मातृत्व अनुदान योजनेवर शासनाने 67 टक्के रक्कम खर्च केलेली आहे. अशी परिस्थिती असतांना सर्व आलबेल आहे, असा क्लेम आपण कसा काय करु शकतो ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, पाडा स्वयंसेवक योजना, नवसंजीवन योजना आणि मातृत्व अनुदान योजना या तिन्ही योजनांवर सन 2006-07 मध्ये एकूण किती रक्कम खर्च झालेली आहे ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, विविध श्रेणीतील बालकांचे वजन करण्यात आलेले आहे. ग्रेड 1 मधील 2,68,41,360 बालकांचे वजन करण्यात आले आहे. ग्रेड 2 मधील 45,43,271 बालकांचे वजन करण्यात आले आहे आणि ग्रेड 3 व 4 मधील 2,14,908 बालकांचे वजन करण्यात आलेले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी असा प्रश्न विचारला होता की, ग्रेड 1 ते 4 मध्ये एकूण किती कुपोषित बालके आहेत ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, फेब्रवारी, 2007 पर्यंत 1,95,072 रुपये इतका खर्च झालेला आहे.

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांकडे या प्रश्नाचे उत्तर नसल्यास त्यांनी याबाबतची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरासंदर्भात मी सांगू इच्छितो की, ग्रेड 3 व 4 ची माहिती माझ्याकडे आहे. ग्रेड 1 व 2 ची माहिती माझ्याकडे सध्या उपलब्ध नाही ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.उल्हास पवार )

**पृ.शी.**: कु.श्रध्दा कैलास बागूल हिचा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद येथे चुकीच्या औषधोपचाराने झालेला मृत्यू.

**मु.शी.**: कु.श्रध्दा कैलास बागूल हिचा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद येथे चुकीच्या औषधोपचाराने झालेल्या मृत्यू याबाबत श्री.श्रीकांत जोशी, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.श्रीकांत जोशी, वि.प.स. यांनी "कु.श्रध्दा कैलास बागूल हिचा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद येथे चुकीच्या औषधोपचाराने झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती. तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय म्हणजे घाटी रुग्णालयाचे सुवर्णजयंती महोत्सवी वर्ष सुरु असून शासनाने याकरिता विविध घोषणा केलेल्या आहे. परंतु सुवर्ण जयंती वर्षात उलटया दिशेने प्रवास सुरु आहे. माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी वितरीत केलेल्या निवेदनामधील शेवटच्या परिच्छेदामध्ये म्हटले आहे की, "शवविच्छेदनाच्या प्राथमिक निष्कर्षानुसार सदर मुलीला हृदय व यकृताला आजार असल्याचे निष्पन्न झाले आहे. व्हिसेरा, हिस्टोपॅथोलॉजी व रासायनिक विश्लेषकांचा अहवाल प्राप्त झ ाल्यानंतर मृत्यूचे निश्चित कारण समजू शकेल, हया प्रकरणी इंजेक्शनचे वायलही तपासणीसाठी पाठविण्यात आले आहे. मृत मुलीचे वडील श्री.कैलास विष्णू बागूल यांनी दिनांक 3.4.2007 रोजी दिलेल्या लेखी पत्रात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद येथील डॉक्टरांनी केलेल्या औषधोपचाराबद्दल वा डॉक्टरांविरुध्द कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केले आहे."

सभापती महोदय, मी 93 अन्वये दिलेल्या सूचनेमध्ये अजूनही काही प्रश्न विचारले आहेत परंतु त्याचे उत्तर निवेदनामध्ये दिलेले नाही. माझ्या सूचनेमध्ये "या रुग्णालयाच्या सुवर्ण जयंती वर्षात अशा धटना घडू नयेत म्हणून शासनाने त्वरीत चौकशी करुन डॉक्टरांविरुध्द गुन्हा नोंदवून तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता तसेच अशा रुग्णांना चांगले डॉक्टर उपलब्ध करुन तसेच बोगस औषधांचे रॅकेटवर कार्यवाही करण्याची आवश्यकता, नवीन उपकरण, मशीन इ.ची सोय करण्याची आवश्यकता " असे म्हटले आहे. या प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्र्यांनी दिलेली नाहीत. या रुग्णालयासंबंधी अनेक प्रश्न आहेत. तेथे कार्यरत असलेल्या डॉक्टरांची इतरत्र बदली करण्यात आलेली आहे, तेथील रुग्णांचा मोठा आक्रोश सुरु आहे, एम.आर.आय. मशीन नाही. शासनाने 50 कोटींचा निधी जाहीर केला आहे परंतु फक्त 2-3 कोटी रुपये देऊन बोळवण केलेली आहे. शासनाने वरील प्रकाराची त्वरीत चौकशी केली पाहिजे. तसेच या रुग्णालयात चांगले डॉक्टर उपलब्ध करुन दिले पाहिजेत. या रुग्णालयात रेसीडेंट डॉक्टर नेमण्याचीही आवश्यकता आहे. बोगस औषधाच्या रॅकेटवर आपण कारवाई करणार का ? सुवर्ण जयंती वर्षात या हॉस्पीटलला अधिक चांगले करणे आवश्यक आहे, परंतु त्याऐवजी तेथील रुग्ण मरत आहेत, ही गंभीर बाब आहे. माझ्या वरील प्रश्नांचे उत्तर मंत्री महोदयांनी निवेदनात का दिलेले नाही, हा माझा स्पेशिफिक प्रश्न आहे.

.....4



PNG/ SBT/ MHM/

श्री.श्रीकांत जोशी.....

सभापती महोदय, घाटी रुग्णालयाकरिता माननीय मुख्यमंत्र्यांनी विविध घोषणा केलेल्या आहेत. परंतु कार्यवाही होण्यासाठी ठोस पावले कधी उचलणार आहात ? चांगले डॉक्टर कधी देणार आहात ? बदली केलेल्या जागेवर पर्यायी डॉक्टर कधी देणार आहात ? या मुलीचा मृत्यू का झाला आहे ? निवेदनात त्या मुलीला हृदय रोग असल्याचे म्हटले आहे, या प्रकरणी सविस्तर रिपोर्ट आल्यानंतर कळेल. परंतु आपण तेथील जनतेचा असंतोष दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही करणार आहात ? सुवर्ण महोत्सवी वर्षात ही कार्यवाही करणार का ? हे मी या निमित्ताने विचारु इच्छितो.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद येथील विविध प्रश्नाबाबत दोन वेळा बैठक घेतलेली होती. मराठवाडा पॅकेजमध्ये शासनाने या रुग्णालयाच्या अपग्रेडेशनसाठी निधी दिलेला आहे, प्रस्तावित नवीन इमारतीचे भुमीपूजन आपण करीत आहोत. सन्माननीय सदस्य मुलीच्या मृत्यूच्या संदर्भात प्रश्न न विचारता हॉस्पीटलच्या व्यवस्थेसंबंधी इतर प्रश्न उपस्थित करीत आहेत.

श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मी या सूचनेच्या संदर्भातच प्रश्न उपस्थित करीत आहे. वेगळे काही बोलत नाही, मी या सूचनेमध्ये जे प्रश्न उपस्थित केले होते, त्या संदर्भातच विचारात आहे. माझ्या सूचनेमध्ये म्हटले होते की, "अशा रुग्णांना चांगले डॉक्टर उपलब्ध करुन तसेच बोगस औषधांचे रॅकेटवर कार्यवाही करण्याची आवश्यकता, नवीन उपकरण, मशीन इ.ची सोय करण्याची आवश्यकता" असे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. याचे आपण उत्तर न देता प्रश्नाला बगल देऊन उडवाउडवीची उत्तरे देत आहात, तरी आपण या रुग्णालयाबाबत खरी माहिती द्यावी. जनतेच्या मनामध्ये या रुग्णालयाच्या अव्यवस्थेसंदर्भात असंतोष निर्माण झालेला आहे त्याबद्दल आपण उत्तर द्यावे. तसेच या मुलीच्या नातेवाईकांनी अशी तक्रार केली आहे की तेथे चांगले डॉक्टर नाहीत, या उपस्थित केलेल्या प्रश्नाबद्दल आपण माहिती द्यावी.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, कु.श्रध्दा कैलास बागूल हिच्या मृत्यूसंदर्भात व रुग्णालयाच्या अव्यवस्थेसंदर्भात असे दोन प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी उपस्थित केलेले आहेत. याबाबत मी सांगू इच्छितो की, घाटी रुग्णालयाकरिता दोन वेळा बैठक घेतलेली आहे.

.....5



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, मराठवाडा पॅकेजमध्ये या रुग्णालयासाठी निधीची तरतूद केलेली आहे. नवीन इमारतीसाठीही निधी दिला असून ड्रॉईंग तयार आहे, काम लवकरच सुरु होईल. या रुग्णालयास एम.आर.आय.मशीन दिलेली आहे. डॉक्टर व अन्य कर्मचाऱ्यांची कमतरता भासू नये म्हणून एम.पी.एस.पी. च्या माध्यमातून भरती करण्याची प्रक्रिया सुरु आहे. अधिवेशन संपल्यानंतर पुन्हा बैठक घेण्यात येईल व या संदर्भात कोणकोणती पावले उचलली आहेत, याची माहिती देण्यात येईल.

नंतर श्री.सुंबरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शेट्टी ....

परत एकदा आपण बसून तेथे हॉस्पिटल सुधारण्यासाठी काय काय पावले उचलली आहेत त्याचा आढावा घेऊ.

सभापती महोदय, कु.श्रद्धा बागूल या मुलीबद्दल येथे सांगितले गेले की, तेथे डॉक्टर नाही, इतर सुविधा नाहीत म्हणून तिचा मृत्यू झाला. पण तशी वस्तुस्थिती नाही. सभापती महोदय, ही मुलगी 30 मार्च 2007 ला 10 वाजता तिला होणाऱ्या ॲब्डॉमिनल पेनिंगच्याबाबत उपचार करण्यासाठी हॉस्पिटलमध्ये, ओपीडीमध्ये कॅज्युअल्टीमध्ये, आली होती. त्यावेळी तिची तेथे सोनाग्राफी केल्यानंतर तिला पेन कीलर इन्जेक्शन दिल्यानंतर दोन तासाने तिने स्वत: डॉक्टरांना सांगितले की, मी आता ठीक झाले आहे. त्यामुळे तिला घरी जाऊ देण्यात आले. तिचे आजोबा त्याच हॉस्पिटलमध्ये काम करीत असल्याने हॉस्पिटलच्या कंपौंडमध्येच ती रहात होती. त्या दिवशी ती घरी गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी 11 वाजता पुन्हा हॉस्पिटलमध्ये आली आणि त्यावेळी तिने जास्त दुखते म्हणून तक्रार केली आणि तिला उपचार करण्यापूर्वीच ती डेड झाल्याचे लक्षात आल्यामुळे तिचा मृत्यू झाल्याचे जाहीर करण्यात आले. 1 एप्रिलला ही घटना घडली. तिच्या पोस्ट मार्टेम मध्ये सोरायसीस ऑफ लीवर, कन्जंक्शन ऑफ लंग्ज, प्री-कार्डिॲकल इफ्यूजन असल्याचे समजून आले. तिच्या चेस्टमध्ये, हार्टमध्ये जवळपास 200 ग्रॅम यलो लिक्विड जमा झालेले होते. परंतु तिचे हार्ट, कीडनी इ. सगळे पार्ट आपण प्रिझर्व करून ठेवले असून ते तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविले आहेत. तसेच तिला जे इंजेक्शन दिले होते त्या ठिकाणची त्वचा देखील काढून ती तपासणीसाठी दिली आहे तसेच तिला देण्यात आलेल्या इंजेक्शनची संपूर्ण बॅच तपासणीसाठी आपण प्रयोगशाळेत पाठविली आहे. तेव्हा त्यांच्याकडून त्याबाबत अहवाल आपल्यानंतर या संबंधात योग्य ती कारवाई केली जाईल.

****

....... एए 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : शासकीय व खाजगी मुला-मुलींच्या आश्रमशाळांतील अनियमितता दूर करण्याबाबत शासनाची असलेली उदासीनता.

**मु.शी.** : शासकीय व खाजगी मुला-मुलींच्या आश्रमशाळांतील अनियमितता दूर करण्याबाबत शासनाची असलेली उदासीनता याबाबत सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.वसंतराव खोटरे व इतर वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

--

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : महोदय, श्री. व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.वसंतराव खोटरे व इतर वि.प.स. यां-ी "शासकीय व खाजगी मुला-मुलींच्या आश्रमशाळांतील अनियमितता दूर करण्याबाबत शासनाची असलेली उदासीनता" या विषयावर -ियम 93 अ-वये जी सूच-ा दिली होती, तिला अ-ुलज्ञ-ा, आपज -िदेश दिल्याप्रमाजे मला -िवेद-ा ज्रावयाचे आहे. -िवेद-ाच्या प्रती सदस्यां-ा अजोदरच वितरीत ज्रेलेल्या असल्या-े मी हे -िवेद-ा सभाज्रृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : -िवेद-ा सभाज्रृहाच्या पटलावर ठेवज्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे -िवेद-ा छापावे )

...... एए 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 च्या सूचनेवरील (अनु.क्र.9) मा.शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर..)

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये आश्रमशाळांमध्ये शिकणारे जे विद्यार्थी आहेत त्यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत आहे. मात्र माननीय मंत्री महोदय त्याबद्दल गंभीर नाहीत असेच एकंदरीत दिसते आहे. आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शोषण आणि छळासंबंधातील 9 प्रकरणाच्या बाबत माझी ही नियम 93 ची सूचना आहे. आश्रमशाळांतील विद्यार्थ्याने अंधार सांगणी, ता.पातूर, जिल्हा अकोला येथील आश्रमशाळेतील झाडाला गळफास लावून आत्महत्या केलेली आहे. अशा प्रकारे आत्महत्या जवळपास नागपूर विभागातील 3-4 जिल्ह्यांत दोन दोन तरी झालल्या आहेत. आश्रमशाळांतील विद्यार्थिनींचा लैंगिक छळ झालेला आहे आणि हाही प्रकार अगदी आता कॉमन झालेला आहे. आश्रमशाळांतील मुख्याध्यापक आणि अधीक्षक त्या संबंधात दोन दिवस पोलीस कोठडीत आहेत पण मुख्य दोषी असलेले संस्थचे अध्यक्ष व सचिव यांना अद्याप अटक झालेली नाही. आश्रमशाळांतील गैरकारभार तर चव्हाट्यावर आलेले आहेत. संस्था चालकांकडून विद्यार्थी-विद्यार्थीनींना मारहाण होणे हेही कॉमन झालेले आहे. आश्रमशाळातील भोंगळ कारभार असे अनेक प्रकार यामध्ये आहेत. मुख्य म्हणजे गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ आणि अमरावतीमध्ये हे प्रकार जास्त झालेले आहेत. म्हणून माझा या ठिकाणी कॉमन प्रश्न आहे की, या संदर्भात या जिल्ह्यातील सर्व आश्रमशाळांची आपण उच्च स्तरीय चौकशी कराल काय ? आपण नुसती चौकशी करून वसुली करू नका. कारण चौकशीनंतर वसुली हा दुसरा प्रकार सुरू होतो. म्हणून तसे न करता या बाबतीत उच्च स्तरीय चौकशी करून दोषी असलेल्यांवर, मग ते संस्था चालक असोत वा मुख्याध्यापक, अधीक्षक असोत, त्यांच्यावर आपण कडक कारवाई कराल का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या सर्व आश्रमशाळांची उच्च स्तरीय चौकशी करण्यात येईल आणि दोषी असलेल्यांवर कडक कारवाई केली जाईल.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : पण ही चौकशी आपण किती कालावधीत पूर्ण करून कारवाई करणार आहात ? किमान एक महिन्यात तुम्ही याबाबत उच्च स्तरीय चौकशी नेमाल का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, लवकरात लवकर याबाबत उच्च स्तरीय चौकशी करण्यात येईल असे मी सांगितले आहे.

...... एए 4 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, नुसते चौकशी करण्यात येईल असे सांगून होणार नाही. आपण डेफिनेट उत्तर दिले पाहिजे. त्या ठिकाणी आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांची राहण्याची, जेवणा-झोपण्याची नीट व्यवस्था नाही. तेथील मॅनेजमेंट आणि आपले अधिकारी सर्व संगनमताने आपला निधी लंपास करीत आहेत. ....

**तालिका सभापती** : मंत्री महोदयांनी त्याबाबत चौकशी करण्याचे आश्वासन दिलेले आहे.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण द्यावे. आपण मंत्री महोदयांना निर्देश द्यावेत. एक दिवसाच्या आत उच्च स्तरीय चौकशी नेमली जाईल म्हणून ....

( यानंतर श्री. सरफरे .... बीबी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही. यू.डायगव्हाणे...

एक महिन्याच्या आत चौकशी नेमावयास पैसे लागत नाही. चौकशी नेमून आपण कारवाई करणार काय?

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : मंत्रिमहोदयांनी चौकशी करण्याचे आश्वासन दिले आहे.

श्री. व्ही. यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, चार महिन्यापूर्वी देखील चौकशी करण्याचे आश्वासन दिले होते परंतु त्याबाबत पुढे काही झालेले नाही. तेव्हा आपण आम्हाला संरक्षण ध्यावे.

**तालिका सभापती** : चौकशी करण्यात येईल असे आश्वासन दिले आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी मुद्दयाचे गांभीर्य लक्षात घेऊन चौकशी करण्याचे आश्वासन दिले आहे. माझे असे म्हणणे आहे की, हा प्रश्न सभागृहाच्या पटलावर आल्यानंतर याठिकाणी मोघम आश्वासन देऊन आमच्या तोंडाला पाने पुसली जातात अशाप्रकारचा चुकीचा मेसेज त्या मुलांपर्यंत जाणे बरोबर नाही. म्हणून एक ते दोन महिन्यात आपण चौकशी पूर्ण करुन कारवाई करणार काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पुढील अधिवेशनापूर्वी चौकशी पूर्ण केली जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MHM/ SBT/

पृ.शी. : पोलीस जीपमधून चोरटी दारुची वहातूक करतांना पोलीस अधिकाऱ्यास झालेली अटक

मु.शी. : पोलीस जीपमधून चोरटी दारुची वहातूक करतांना पोलीस अधिकाऱ्यास झालेली अटक याबाबत श्री.सुरेश जेथलिया, डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. सिध्दाराम म्हेत्रे, डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यां-ी "पोलीस जीपमधून चोरटी दारुची वहातूक करतांना पोलीस अधिकाऱ्यास झ ालेली अटक" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, विक्रोळी पोलीस ठाण्याचे निरीक्षक श्री. अशोक ढवळे हे स्वत: जीपमधून अवैध मध्याची वहातूक करीत असतांना सापडले आहेत. निवेदनात म्हटले आहे की, "त्यादिवशी सत्र न्यायालय, 48 वे कोर्ट येथे साक्षकामी जातो अशी नोंद करण्यास सांगून निघून गेले." प्रत्यक्षात ते सत्र न्यायालयामध्ये न जाता अवैध मद्याची वहातूक करीत असतांना सापडले आहेत. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, हे मद्य ते कोठून कुठे नेत होते? हे मद्य पुरविणारे आणि ते घेऊन जाणारे यांच्यावर आपण काय कारवाई केली आहे?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : श्री. अशोक ढवळे हे प्रभारी पोलीस निरीक्षक होते. ते सरकारी वाहन घेऊन दीव-दमण येथे गेले होते. तेथील डयुटीवर माणसे कमी होती म्हणून दारुचा एक बॉक्स घेऊन ते स्वत: येत होते. त्यांच्या घरी एक कार्यक्रम होता असे त्यांनी जबाबामध्ये सांगितले आहे. अशाप्रकारचे अधिकारी पोलीस खात्याला कलंक आहेत म्हणून त्यांना सेवेतून बडतर्फ केले आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, "कलंक" हा शब्द कामकाजामध्ये ठेवावयाचा काय?

**तालिका सभापती** : मंत्रिमहोदयांनी तो मान्य केला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मागे एकदा मी हा शब्द उच्चारल्यानंतर तो कामकाजातून काढून टाकण्यात आला...

**तालिका सभापती** : हा पोलीस खात्याला कलंक आहे, असे मंत्रिमहोदय म्हणाले.

श्री. दिवाकर रावते : "कलंक" हा "कलंक" असतो. परंतु आपण वेगवेगळा न्याय कसा लावता?

**तालिका सभापती** : पोलीस खात्याला "कलंक" आहे असे मंत्रिमहोदय म्हणाले आहेत.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 चे निवेदन क्र. 6 बाबत</u>

**तालिका सभापती** : माननीय अर्थमंत्री विधानसभागृहामध्ये असल्यामुळे ते सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. त्यामुळे नियम 93 चे निवेदन क्रमांक 6 उद्या चर्चेकरिता घेण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, विधानसभागृह बंद झाले आहे, ते चालू नाही...

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, विधानसभागृह चालू नाही, माननीय अर्थमंत्री कुठे गेले आहेत त्यांना आपण बोलवा...

**तालिका सभापती** : आपण हे निवेदन उद्या चर्चेकरिता घेऊ...

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहाच्या कामकाजामध्ये चुकीची नोंद होत आहे. विधानसभेचे कामकाज बंद पडलेले आहे...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांचा अडचणीचा विषय असल्यामुळे त्यांना सभागृहामध्ये उपस्थित रहावयाचे नाही. आपण हे सभागृह दहा मिनिटे तहकूब करावे आणि माननीय अर्थमंत्र्यांना सभागृहामध्ये बोलवावे. आम्ही सभागृहामध्ये उपस्थित नसतांना माननीय अर्थमंत्र्यांनी चूपचाप निवेदन करुन निघून जायचे हे बरोबर नाही. ते जाणुनबुजून सभागृहाची फसवणूक करीत असल्यामुळे आपण मंत्रिमहोदयांना बोलवावे अशी माझी आपणास विनंती आहे. विधानसभेचे कामकाज बंद असल्यामुळे माननीय अर्थमंत्री आपल्या चेंबरमध्ये बसले आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहाच्या कामकाजापेक्षा बाहेरील काम महत्वाचे आहे काय? या सभागृहातील कामकाजाला काहीच किंमत नाही काय?

**तालिका सभापती** : सर्व निवेदने चर्चेकरिता घेतली आहेत, आता फक्त हे एकच निवेदन आपण उद्या घेऊ.

----

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : आमच्या अस्मितेचा प्रश्न आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी तसे आपल्याला पत्र दिलेले आहे काय ? त्यांनी तसे आपल्याकडे पत्र दिले पाहिजे.

श्री.विनोद तावडे : त्यांनी पत्र दिलेले नाही तर हा आपला अपमान आहे.

**तालिका सभापती** : माझी आपल्याला विनंती आहे की, हे 93 चे निवेदन उद्या चर्चेला घेऊ.

श्री.नितीन गडकरी : मी या निवेदनावरील चर्चेच्यावेळी हजर राहू शकत नाही, असे वित्त मंत्री महोदयांनी आपल्याला पत्र दिलेले आहे काय ?

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माझे काय म्हणणे आहे ते आपण एक मिनिट ऐकून घ्यावे. त्या दिवशी दोन-अडीच तास सभागृह तहकूब झाले. हे अधिकार विदर्भ आणि मराठवाडा विकास महामंडळांना दिले पाहिजेत, अशाप्रकारचा राज्यामध्ये कायदा आहे. माननीय सभापतींच्या दालनामध्ये माननीय उपमुख्यमंत्री, माननीय अर्थ राज्यमंत्री उपस्थित होते, ते मुख्यमंत्र्यांना भेटून आले. मुख्यमंत्र्यांनी त्यांना जे सांगितले ते त्यांनी सभापती आणि आम्हा सर्वांच्या समक्ष सांगितले. आता माननीय मुख्यमंत्री येथे उपस्थित आहेत. मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले की," When there is a law, it will prevail. Your G.R. will go." हे निवेदन आम्ही सभागृहामध्ये करतो असे ते म्हणाले. त्याप्रमाणे शासनाच्या वतीने निवेदन करण्यात आले. त्यानंतर माननीय सभापतींनी सभागृहामध्ये जे रूलिंग दिले ते असे की, "सभागृहाच्या दोन्ही बाजूच्या नेत्यांना माझ्या दालनात बोलावून मी चर्चा केलेली आहे. या चर्चेला सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री आर.आर.पाटील, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री बी.टी.देशमुख, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी उपस्थित होते. घटनेच्या 371 (2) प्रमाणे राज्यपालांनी निदेश दिलेले आहेत, माननीय राज्यपालांच्या निदेशाच्या अनुषंगाने सभागृहामध्ये कायदा पास झालेला आहे. सन 2005 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 18 या अनुषंगाने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्राची प्राधिकरणे आहेत, त्या ठिकाणचे कामकाज या कायद्याच्या अनुषंगाने बंधनकारक आहे. तुमचा तो 13 मार्चचा शासन निर्णय असेल किंवा अन्य शासन निर्णय असतील ते शासन निर्णय सभागृहामध्ये चर्चा केल्याप्रमाणे रद्द होतील. याबाबतची कारवाई तीन-चार दिवसामध्ये पूर्ण करावी आणि शासनाने केलेल्या कारवाईची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावी."

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (पुढे सुरू.....

सभापती महोदय, सहा वर्षापूर्वी माननीय राज्यपालांनी निर्देश दिले होते, त्याची आता अंमलबजावणी होत आहे. दोन वर्षापूर्वीचा कायदा आहे त्याचा आदेश निदान आता निघत आहे, याबाबत आम्ही सर्वांनी आपले आभार मानले. माननीय वित्त मंत्र्यांनी खाजगी चर्चा केली ती सभागृहात सांगण्याची माझी पध्दत नाही. पण आपल्याला हे माहीत आहे की, दोन वेळा ही 93 ची सूचना चर्चेसाठी आली आणि ती पुढे ढकलली गेली. ते असे म्हणाले की, आपल्याला त्याप्रमाणे ही गोष्ट करायची आहे, पण ती गोष्ट अजून होत नाही, दुर्बोध कुमार किंवा सुबोध कुमार या नावाचे अत्यंत हट्टी आणि मराठी न समजणारे अधिकारी आहेत. अत्यंत विदर्भ, मराठवाड्याचा द्वेष करणारे वित्त मंत्री बसले आहेत. तेथे माझ्या समक्ष झालेली चर्चा आहे ती मी सांगू इच्छित नाही. फक्त माझे म्हणणे असे आहे की, सभागृहामध्ये जे सांगितले, त्यानंतर मुख्यमंत्र्याशी चर्चा करून उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले, त्याप्रमाणे येथे कारवाई होत नाही. महाराष्ट्राच्या सांविधानिक इतिहासामध्ये ही अतिशय दुर्देवी अशाप्रकारची गोष्ट आहे. खाजगी बोलण्याची खात्री सभागृहामध्ये कधी सांगू नये, पण अर्थमंत्र्यांनी त्याप्रमाणे करण्याचे ठरविल्यानंतरसुध्दा ...पाच दिवस झाले. येथे बसून ते माझ्याशी बोलले आहेत ते मी सभागृहामध्ये त्यांच्या नावाने कोट करून सांगणार नाही. त्यांच्या नावाने जे बोलायचे आहे, ते त्यांनीच बोलायचे आहे. माझे म्हणणे असे आहे की, हा अतिशय महत्वाचा आणि अतिशय सेन्सीटिव्ह अशाप्रकारचा प्रश्न आहे. त्यांनी नागपूरच्या अधिवेशनामध्ये जे सांगितले, त्या कार्यवाहीची प्रत माझ्याकडे आहे. ती मी मुद्दाम घेऊन आलेलो आहे. त्यांनी सांगितले की, "विदर्भ आणि मराठवाडयामध्ये हे अधिकार दिले पाहिजेत, ते दिले जातील." माझे म्हणणे असे आहे की, हे कोण निबुध्द कुमार अधिकारी आहेत ? की जे महाराष्ट्राला वेठीला धरतात. काय बोलले, ते मी सांगत नाही. कारण ती पध्दत बरोबर नाही. पण सभागृहात मुख्यमंत्र्यांनी सांगितल्यानंतर, उप मुख्यमंत्री महोदयांनी सांगितल्यांनंतर, पाटबंधारे मंत्र्यांनी सांगितल्यानंतर त्याबाबतच्या वर्किंग ऑर्डस् निघू नयेत, हे बरोबर नाही. महाराष्ट्रामध्ये कायदा आहे. महाराष्ट्राच्या एकंदर प्रशासनाला ही गोष्ट अत्यंत अनुचित आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय येथे उपस्थित आहेत. विदर्भ आणि मराठवाड्याचा अनुशेषाचा प्रश्न आहे, असे त्यांनी म्हटले पाहिजे की, उद्या, परवा याबाबतचे आदेश निर्गर्मित होतील. कायद्याप्रमाणे ही कारवाई केली गेली पाहिजे.

यानंतर श्री.बरवड.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( श्री. उल्हास पवार )** : माननीय वित्त मंत्री स्वत: डॉक्टरकडे गेलेले आहेत. तसे पत्र त्यांनी माझ्याकडे पत्र पाठविले आहे. माननीय वित्त राज्यमंत्री त्यांच्या कार्यालयात नाहीत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय वित्त मंत्र्यांनी आपल्याकडे किती वाजता पत्र पाठवले ?

**तालिका सभापती** : त्यांनी आताच पत्र पाठविले आहे.

श्री. नितीन गडकरी : आपण त्यांना कशाला संरक्षण देत आहात ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, निवेदन वितरित केलेले आहे. त्यासंबंधी सन्माननीय सदस्यांचे काही प्रश्न असतील तर मी उत्तर देईन. निवेदन वितरित झालेले आहे. माननीय वित्त मंत्री सभागृहात उपस्थित नसले तरी मुख्यमंत्री म्हणून मी उपस्थित आहे. त्यामुळे जे मान्य केले आहे त्यामध्ये आणि निवेदनामध्ये कोणती अडचण आहे हे सन्माननीय सदस्यांनी निदर्शनास आणावे. जे निवेदन दिलेले आहे त्यामुळे आपले कोणते उद्दिष्ट सफल होत नाही हे सन्माननीय सदस्यांनी सांगावे. शासनाने जे निवेदन दिलेले आहे त्यामधून आपल्या संकल्पनेप्रमाणे आणखी काही अडचण असेल तर तेवढी दुरुस्ती सन्माननीय सदस्यांनी सांगावी.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय राज्यपालांचा अवमान होऊ नये त्यामुळे यासंदर्भात खुलासा झाला पाहिजे. यासंदर्भात जे बिल पास झालेले आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, " Provided further that, in respect of the projects situated in Marathwada and Vidarbha Regions, the powers to accord administrative approval or revised administrative approval, under the clause, shall in accordance with the Governor's directives, be exercised by the concerned River Basin Agency." हे बिल अस्तित्वात असताना वित्त विभागाचे सचिव श्री. सुबोध कुमार यांनी माननीय मंत्रिमहोदय श्री. अजित पवार साहेबांचे अधिकार काढले. आम्हाला माननीय मुख्यमंत्र्यांकडून संरक्षण पाहिजे. या राज्यामध्ये काय सुरु आहे ? आपल्याकडे दोन ॲडव्होकेट जनरल्सनी त्यांचे ओपिनियन दिलेले आहे. आपण सरकारतर्फे या राज्याच्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

माननीय राज्यपालांचा जो अपमान करीत आहात तो करु नये. या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, माननीय राज्यपालांनी जे निदेश दिलेले आहेत ते ॲडव्हायजरी आहेत. माननीय राज्यपालांनी घटनेच्या कलम 371(2) अन्वये दिलेले निदेश ॲडव्हायजरी आहेत की, मेंडेटरी आहेत हा संवैधानिक मुद्दा आहे. घटनेच्या कलम 371 (2) मध्ये असे म्हटले आहे की, "The special provision with respect to the States Maharashtra and Gujarat. (2) Notwithstanding anything in this Constitution, the President may by order made with respect to the State of Maharashtra or Gujarat, provide for any special responsibility of the Governor for..." हा कायदा आलेला आहे. यासंदर्भात दोन ॲडव्होकेट जनरल्सनी त्यांचे ओपिनियन दिलेले आहे. ॲडव्होकेट जनरल श्री. वहानवटी यांनी जे ओपिनियन दिलेले आहे त्याची प्रत मी माननीय मुख्यमंत्र्यांना वाचण्यासाठी देतो. "Directions issued by the Hon. Governor on 15th December, 2001 and 12th March, 2003 to Article 371(2) of the Constitution of India." ॲडव्होकेट जनरल श्री. वहानवटी साहेबांनी जे ओपिनियन दिलेले आहे ते मी वाचून दाखवतो.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : त्यामध्ये "Shall" असा शब्द वापरलेला आहे.

श्री. नितीन गडकरी : हे जे ओपिनियन आहे ते सन्माननीय सदस्यांनी वाचावे.

**तालिका सभापती** : हरकतीचा मुद्दा काय आहे ते सन्माननीय सदस्यांनी सांगावे.

श्री. नितीन गडकरी : या निवेदनामध्ये माननीय राज्यपालांच्या अधिकाराबद्दल जो अपमानजनक शब्द वापरलेला आहे तो काढून टाकला पाहिजे. अन्यथा महाराष्ट्राच्या माननीय राज्यपालांचा अपमान होईल. ते निदेश ॲडव्हायजरी नसून मेंडेटरी आहेत असे श्री. वहानवटी यांनी म्हटले आहे. ॲडव्होकेट जनरल श्री. वहानवटी यांनी दिलेल्या ओपिनियनमध्ये असे म्हटले आहे की, "In my opinion there is no doubt that the directives given by the Hon. Governor are mandatory. I say this for the following reasons. (a) Article 371 begins with non obstante clause. The words notwithstanding



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. नितीन गडकरी ....

anything contained in the Constitution are significant. It marks departure from the scheme of the Constitution which makes all financial matters to the prones of Legislature." त्यानंतर ॲडव्होकेट जनरल म्हणून श्री. कदम साहेब आले. त्यांची माननीय सभापतींकडे बैठक झाली. सभापती महोदय, ॲडव्होकेट जनरल श्री. कदम यांनी जे ओपिनियन दिलेले आहे त्याचा आधार घेऊन या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, ते ॲडव्हायजरी आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 15:30

(श्री. नितीन गडकरी...)

माननीय राज्यपालांचे निदेश बंधनकारक आहेत हे सा-या दुनियेला माहीत आहे. सभापती महोदय, आपण देखील हे जाणता. असे असताना माननीय वित्तमंत्री श्री. जयंत पाटील हे, माननीय राज्यपालांचे निदेश हे ॲडव्हायझरी आहेत, असे कसे काय म्हणू शकतात ? हे राज्यपालांचे निदेश ॲडव्हायझरी असतील तर मग त्या निदेशांचे पालन आपण कशासाठी करता ? ही एवढी मोठी चूक माननीय वित्त मंत्री का करीत आहेत ? माननीय राज्यपालांनी दिलेले निदेश हे बंधनकारक आहेत, मॅण्डेटरी आहेत, कॉन्स्टीटयूशनल आहेत, लॉजिकल आहेत, लिगल आहेत. तुम्हाला ते बदलता येत नाहीत. हे राज्यपालांचे निदेश पाळले जाणार नसतील तर ते व्हॅयोलेशन ऑफ कॉन्स्टीटयूशन आहे. यासंदर्भात मी आणि सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख हायकोर्टामध्ये केस लढत आहोत. सभापती महोदय, हे तुम्हाला मान्य आहे काय ? मग जखमेवरच्या खपल्या काढून मीठ चोळल्याप्रमाणे "राज्यपालांचे निदेश हे ॲडव्हायझरी आहेत" असे निवेदनामध्ये नमूद केलेले आहे ते योग्य आहे काय ? माननीय राज्यपाल हे या सभागृहामध्ये नाहीत, ते सभागृहाच्या बाहेर आहेत. माननीय राज्यपालांचे निदेश हे मॅण्डेटरी आहेत हे ॲडव्होकेट जनरल वहानवटी साहेबांनी रेकॉर्डवर मांडलेले आहे. हे निदेश बंधनकारक असल्यामुळेच निधीची तरतूद करण्यात आली. मग हे कोण टिनपाट सुबोध कुमार आहेत ? ते माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्र्यांपेक्षा मोठे आहेत काय ? सभापती महोदय, आपल्या दालनामध्ये परवा सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांच्या समवेत आम्ही आपणांबरोबर चर्चा केली. त्यावेळी आम्हाला असे सांगितले गेले की, या संदर्भात विधेयक पास झाले असेल तर आदेश अस्तित्वात राहात नाहीत. त्यामुळे यासंदर्भात निवेदन करण्यात येईल असे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. असे असताना माननीय वित्तमंत्री पुन्हा पुन्हा हेच सांगत आहेत की, माननीय राज्यपालांचे निदेश हे ॲडव्हायझरी आहेत. असे सांगणे हा माननीय राज्यपालांचा अपमान आहे. माननीय राज्यपालांचा अपमान आपण या सभागृहामध्ये होऊ देणार आहात काय ? हे सब्मीट केलेले उत्तर आहे. This is direct insult for the Hon. Governor. Hon. Governor's powers are mandatory, Constitutional powers. It is binding on the Government. This opinion is given by Shri G. Vahanvati, Ex-Advocate-General of Maharashtra in the

..2..

(श्री. नितीन गडकरी...

House. This is on record. Then, how this Finance Minister says time and again that this is Advisory.

दिनांक 4.4.2005 रोजी ॲडव्होकेट जनरल आर.आर. कदम यांनी उत्तर दिलेले आहे. Question: "Whether the directives issued by the Governor are mandatory in nature or otherwise." Shri Kadam replied, "This question has already been answered in the opinion dated 17th December, 2003 given by Shri G. Vahanvati and I agree with his view completely."

हे ॲडव्होकेट जनरल आर.आर. कदम साहेब एकीकडे "I agree with this" असे म्हणतात आणि दुसरीकडे " निदेश ॲडव्हायझरी आहेत" असे म्हणतात. त्यांनी दोन ओपिनियन दिलेली आहेत. ॲडव्होकेट जनरल आर.आर.कदम यांनी माननीय वित्तमंत्र्यांच्या दबावाखाली हे ओपिनियन दिलेले आहे काय ? सभापती महोदय, आपण कॉन्स्टीटयुशनमधील तरतुदी पहाव्यात. घटनेनुसार माननीय राष्ट्रपतींनी माननीय राज्यपालांना 1994मध्ये अधिकार दिलेले आहेत. मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, माननीय वित्त मंत्री श्री. जयंत पाटील यांनी याबाबतीत खूप प्रयोग केलेले आहेत. यासंदर्भात सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी लिहिलेले लेख मी वाचून दाखवित नाही. समाननीय राज्यपालांचे निदेश हे ॲडव्हायझरी आहेत असे या निवेदनामध्ये म्हटलेले आहे ते बरोबर आहे काय ?

श्री. विलासराव देशमुख : ते अभियोक्त्याचे मत आहे.

श्री. नितीन गडकरी : ॲडव्होकेट आर.आर.कदम यांनी 15 डिसेंबर 2001 रोजी दिलेले ओपिनियन मी वाचून दाखवितो. Question: "Whether the directives issued by the Governor are mandatory in nature or otherwise." Answer: "This question has already been answered in the opinion dated 17th December, 2003 given by Advocate General Shri G. Vahanvati and I agree with his view completely."

एकीकडे ते "I agree with this" असे म्हणतात तर दुसरीकडे हे निदेश ॲडव्हायझरी आहेत

..3..



MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 15:30

(श्री. नितीन गडकरी...

असे सांगतात. यामध्ये ॲडव्होकेट जनरल कदम यांचा दोष नाही. सभापती महोदय, अशा प्रकारे शब्दच्छल करणे इष्ट नाही. आपण या सभागृहामध्ये बिल मंजूर केले आहे. ..

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..........

माझ्याकडे ॲडव्होकेट जनरलचे ओपीनियन उपलब्ध आहे. आपण ते चेक करावे. नाही तर पुन्हा ॲडव्हायझरी म्हणायचे. या बोटाची थुंकी त्या बोटावर करुन आमच्या तोंडाला का पाने पुसत आहात? ॲडव्होकेट जनरलना का बोलवायचे? कशाला नियमाप्रमाणे सभागृह चालवायचे? माझा पहिला मुद्दा असा आहे की," Whether the directives given by the Governor are mandatory or advisory?" या सभागृहात "any document submitted by the Minister in the House, means that it is the opinion of the Government." हे होत नाही. साहेब म्हणतात, त्याच्याशी मी सहमत नाही. This is not opinion of the Advocate General. Advocate General submitted his opinion to the State, the State Government examined the opinion, they took that on record and then submitted it to the House. हे कसे होणार? सन्माननीय राज्यपाल महोदय श्री.कृष्णा यांना अधिकार नाही असे तुम्ही म्हणता? मग कशाला त्यांच्याकडे चार-चार वेळा जायचे? कशाला आमदारांना घेऊन जाता? हे जे चालले आहे, Whether these directions, जे बिल पास झाले, कायद्यात रुपांतर झाले त्याला जोडून शासनाला अध्यादेश काढता येत नाही, तरी तो अध्यादेश काढला गेला. सन्माननीय मंत्री श्री.अजित पवार यांचे अधिकार विथड्रॉ करुन ते स्वत:कडे घेतले. अधिकार काढले कसे? हे काय चालू आहे? हे घटनात्मक आहे. माझा मुख्यमंत्री महोदयांना मुद्दा आहे. या निवेदनात जे ॲडव्होकेट जनरलसंबंधी म्हटले आहे ते तुम्हाला मान्य आहे की नाही? ते तसेच ठेवले गेले तर this is direct insult of the Governor of Maharashtra. असे होणार असेल तर आम्ही आता जातो राज्यपाल महोदयांकडे आणि त्यांना सांगतो You give us the opinion, you are the Constitutional Head of Maharashtra, You clarify whether your orders are mandatory or advisory. In the interest of democracy, please give us the reply. सभापती महोदय, आपण आम्हाला उत्तर द्यावे. उद्या जर गव्हर्नर साहेबांनी रेकॉर्डवर उत्तर दिले की, दिलेल्या डायरेक्शन्स मॅण्डेटरी आहेत, तर काय करणार? त्यांनी ऑलरेडी उत्तर दिलेले आहे. हा केवळ शब्दच्छल करुन आम्हाला मूर्ख बनविण्याचा धंदा आहे. आम्हाला तुमच्याकडून आणि मुख्यमंत्र्यांकडून उत्तर हवे आहे. हे तुम्ही रेकॉर्डवरुन काढता की नाही हा माझा मुद्दा आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हा जो हरकतीचा मुद्दा उपस्थित झाला आहे त्या संदर्भातील वस्तुस्थिती सभागृहाच्या निदर्शनास येणे आवश्यक आहे. घटनेच्या कलम 371(2) चे ज्युरिसडिक्शन जे आहे ते aid and advice of the Council of Ministers headed by the Chief Minister च्या बाहेरचे आहे. ते कॉन्स्टिटयूशनल आहे. माननीय राज्यपाल महोदयांनी स्वत: पत्र लिहून शासनाला कळविले आहे. माझ्याकडे त्या पत्राची प्रत आहे. म्हणजे 10 जानेवारी, 2003 रोजी पत्र लिहिलेले आहे. राज्यपाल महोदयांचे तत्कालीन सचिव श्री.व्ही.जयरथ यांनी राज्य शासनाला ते पत्र पाठविले आहे. मी त्यातील काही मजकूर वाचून दाखवितो. त्यावेळी शासनाने राज्यपाल महोदयांकडे एक अध्यादेशाचा मसूदा पाठविला आणि आम्हाला साऱ्या महाराष्ट्रात एकवाक्यता आणायची आहे, सारे अधिकार मंत्रालयात आणायचे आहेत. त्या अध्यादेशाला तुम्ही मान्यता द्यावी असे कळविले.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांनी कळविले की, मी तुम्हाला आधी आदेश दिले की, सर्व महामंडळांना अधिकार द्या आणि तुम्ही पुन्हा पत्र पाठविता हे बरोबर नाही. 10 जानेवारी, 2003 चे पत्र आहे. "महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागातील पाचही महामंडळात समानता आणि सुसूत्रता आणण्यासाठी अधिनियमात करावयाच्या सुधारणांचा अध्यादेश प्रख्यापित करण्याचा प्रस्ताव माननीय राज्यपाल महोदयांच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला. या संदर्भात मला आपणास असे कळविण्याचा आदेश आहे की, माननीय राज्यपाल महोदयांच्या असे निदर्शनास आले आहे की, विदर्भ व मराठवाडा विभागात प्रशासकीय मान्यता व सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी नवीन कामे सुरु करण्यास विलंब होत आहे. यापूर्वी कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ आणि तापी खोरे पाटबंधारे विकास महामंडळ यांना प्रशासकीय मान्यता आणि सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. परंतु इतर महामंडळांच्या स्थापनेनंतर त्यांच्याकडून उक्त अधिकार काढून घेण्यात आले आहेत. या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांनी 15 डिसेंबर, 2000 च्या पत्रान्वये घटनेच्या कलम 371(2) अन्वये निधीचे वाटप करण्यासंबंधीचे निर्देश निर्गमित करतेवेळी माननीय मुख्यमंत्र्यांना असे सूचित केले आहे की, उक्त महामंडळांच्या अखत्यारितील नवीन कामे विनाविलंब व वेगाने सुरु व्हावीत आणि प्रशासकीय मान्यता व सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यासंबंधीचे आदेश निर्गमित करणे गरजेचे आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

प्रा. बी.टी.देशमुख .....

परंतु विद्यमान अध्यादेशात अशा प्रकारची तरतूद न करता पुन्हा प्रशासकीय मान्यता व सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार शासनाकडे ठेवण्यात आलेले आहेत. वरील संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांनी या पूर्वीच सूचना निर्गमीत केली असल्याने अध्यादेशातील तरतूदीस मान्यता देण्यास संयुक्तीक होणार नाही असे माननीय राज्यपाल महोदयांचे मत आहे." असे म्हणून त्यांनी ही फाईल परत पाठवली. आपल्याला माननीय राज्यपाल महोदयांचे निदेश बंधनकारक आहेत. राज्यपालांना या प्रश्नाच्या संदर्भात काय वाटते याबाबत त्यांनी पत्र लिहून कळविले आहे. दुर्दैवाने माननीय राज्यपाल महोदयांचे पत्र सचिवांना माहिती नव्हते. दॅट लेटर वॉज नॉट बिफोर मी अशी जर एखाद्या सचिवाची भाषा असेल तर त्या सचिवाला त्याची जागा दाखविण्याची आवश्यकता आहे. एखाद्या वेळेस लेटर माहीत नसेल तर आम्ही ते समजू शकतो. परंतु सचिवांना यासंदर्भातील कायदाही माहीत नव्हता का? महाराष्ट्रातील तो जिवंत कायदा आहे. मी या विषयाचा मुद्दाम खुलासा करतो की, जॉईंट सिलेक्ट कमिटीमध्ये सुध्दा आज जसा मी मुद्दा मांडतो आहे तसाच मुद्दा मांडला होता. मी जॉईंट सिलेक्ट कमिटीमध्ये ज्या सूचना केल्या होत्या, जे मत मांाडले होते, जे मुद्दे मांडले होते त्याबाबत पाटबंधारे मंत्री व पाटबंधारे राज्यमंत्र्यांना मी जाहीर धन्यवाद देऊ इच्छितो कारण त्यांनी आमचे म्हणणे ऐकून घेतले होते व त्याप्रमाणे अमेंडमेट मान्य केली. कायद्यामध्ये अमेंडमेंट झाल्यानंतर जर ही अमेंडमेंट सचिवांच्या डोळयांना दिसत नसेल तर त्या सचिवांना डोळयाच्या दवाखान्यात तरी पाठवा. हा सचिव म्हणजे जसे काय सुप्रिम कोर्टाचा जजच आहे. ही भाषा केवळ सुप्रिम कोर्टच्या जजेसनी केली असती तर समजू शकलो असतो. सभापती महोदय, खाजगीमध्ये जे बोलले जाते ते सांगण्याची माझी पध्दत नाही. मी स्पष्टपणे हे सांगू इच्छितो की, ते असेही म्हणाले की, वित्त विभागाला हे अधिकार नको काय? मी म्हणालो 1974 ची व्यवस्था तुम्ही सन 2005 मध्ये बदलवली.....

**उपसभापती** : माझी आपल्याला एक विनंती आहे. की, निवेदनावर आपण फक्त एक प्रश्न विचारण्याची संधी देत असतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( एकाचवेळी काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात. )

**उपसभापती** : मागच्या वेळेस या विषयाच्या संदर्भात या सभागृहात चर्चा झालेली आहे. या विषयाच्या संदर्भात आपण ॲडव्होकेट जनरल यांना सुध्दा पाचारण केले होते. आपल्याला हा प्रश्न सोडवायचा असल्यामुळे येत्या दोन दिवसात आदरणीय सभापती महोदयांकडे माननीय अर्थमंत्री आणि आपण सर्व चर्चा करु.

( एकाचवेळी काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात. )

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी या विषयाच्या संदर्भात जे मुद्दे उपस्थित केले होते त्यासंदर्भात आपल्याकडून उत्तर आलेले नाही. आपण या विषयाच्या संदर्भात ॲडव्होकेट जनरलचे म्हणणे ऐकून घेतलेले आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, एखाद्या सचिवांने अशा प्रकारचे बोलणे योग्य नाही. कै. यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक अशा राजकीय नेत्यांना काहीच कळत नव्हते फक्त सुबोध कुमार यांनाच अक्कल आहे असे समजण्यास मी तयार नाही. तुम्ही आमच्या मानेवर 2005 मध्ये जी सूरी ठेवली ती बाजूला करा, यासंदर्भात सात जीआर काढलेले आहेत.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...........

एक चूक झाली म्हणून दुसरा जी.आर.काढण्यात आला, त्यामध्ये चूक झाली म्हणून तिसरा जी.आर.काढण्यात आला, पुन्हा त्यामध्ये चूक झाली म्हणून चौथा जी.आर.काढण्यात आला. अशाप्रकारे सात वेळा जी.आर. काढण्यात आले आणि हे जी.आर. फक्त झालेल्या चुका दुरूस्त करण्यासंबंधी काढण्यात आलेले आहेत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय राज्यपालांचा अवमान झाल्याबद्दल मी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता. तो मुद्दा आपण फेटाळला का ? जर आपण तो मुद्दा फेटाळला असेल तर मी आताच माननीय राज्यपालांकडे जातो......आम्हाला आपल्याकडून संरक्षण पाहिजे.

**उपसभापती** : या संदर्भात मला प्रथम माननीय मंत्रिमहोदयांचे म्हणणे तरी ऐकू द्यावे. तुम्हाला पूर्ण संरक्षण दिलेले आहे आणि मी आता अडचणीत आलेलो आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी उपस्थित केलेला मुद्दा जर चुकीचा असेल तर आपण द्याल ती शिक्षा भोगण्यास माझी तयारी आहे. मला वित्तमंत्र्यांबद्दल आदर आहे. ते विद्वान आहेत. सभापती महोदय, हे सभागृह घटनेप्रमाणे झालेले आहे. घटनेप्रमाणे माननीय राज्यपालांचे पद आहे, राज्यपालांचे अधिकार आहेत. 371(2) हा घटनेचाच अनुच्छेद आहे. त्याप्रमाणे माननीय राज्यपालानां अधिकार मिळालेले आहेत. "Notwithstanding anything in this constitution......" हे मी वाचून दाखविले आहे. मी ॲव्होकेट जनरल वहानवटी व ॲव्होकेट जनरल कदम या दोघांचे लिखित ओपिनियन दिले. ॲव्होकेट जनरल वहानवटी यांनी सांगितले की, there is no doubt in my mind हे मॅन्डेटरी अधिकार आहेत. तरी देखील अधिकारी माननीय राज्यपालांच्या अधिकाराबद्दल असे लिहितात... ? हा माननीय राज्यपालांचा अवमान आहे. आपण पीठासीन अधिकारी हे पद ग्रहण केलेले आहे, आपणाला माननीय राज्यपालांचा अवमान मान्य आहे काय ? मी जर इललिगल बोलत असेन तर आपण मला खाली बसवावे. माझा हरकतीचा मुद्दा चुकीचा असेल तर तो आपण जरूर फेटाळावा.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना मी सांगू इच्छितो की, दुसरी बाजू ऐकल्याशिवाय त्यांनी उपस्थित केलेला हरकतीचा मुद्दा फेटाळावा किंवा कसे याबाबत मला निर्णय घेता येणार नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी व्हेगमध्ये बोललो नाही. ॲड.जनरल वहानवटी आणि ॲड.जनरल कदम या दोघांचे अभिप्राय आहेत. घटनेमध्ये अशी तरतूद आहे की, " Notwithstanding anything in this Constitution..." अगदी साधा प्रश्न आहे As for as the Indian Constitution is concerned, whether the power of the Governor is mandatory or advisory? आपणाकडे कॉन्स्टीटयुशनची प्रत आहे.

**Deputy Chairman** : Mr. Gadkari, I have given you an opportunity. Let me give him an opportunity also.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्याला नम्रतापूर्वक सांगू इच्छितो की, हा विषय येथे उपस्थित झाला त्यावेळी मी सभागृहात नव्हतो. आज हा विषय उपस्थित होणार हे मला माहीत होते म्हणून मी अगोदरच येथे येऊन सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांच्याशी चर्चा केली. गेले पाच-सहा दिवस मी त्यांच्याशी यावर चर्चा केलेली आहे. त्यांना मी सांगितले की, वित्त विभागाने जी.आर.काढलेला आहे, तथापि, यासाठी पाटबंधारे विभागाचा सुद्धा जी.आर.निघण्याची आवश्यकता आहे. त्या जी.आर.च्या प्रोसेससाठी मी मंत्रालयात गेलो होतो. दोन्ही जी.आर. काढल्यावर आपण एकत्रित चर्चा करु असे मी त्यांना सांगितले. ...(अडथळा)...

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय वित्तमंत्री विद्वान आहेत, मला त्यांच्याबद्दल आदर आहे. परंतु मी त्यांना सांगू इच्छितों की, राज्यपालांचे निदेश ॲडव्हायझरी आहेत असे निवेदनात म्हटले आहे. ॲड.जनरल कदम यांचे लिखित अभिप्राय मी आपल्याकडे पाठविले आहेत. एवढेच नव्हे तर ॲड.जनरल वहानवटी यांचे देखील अभिप्राय पाठविले आहेत. ॲड. जनरल कदम आणि ॲड.जनरल वहानवटी यांनी सांगितले की, ते मॅन्डेटरी आहेत. ॲड.जनरल कदम यांनी सांगितले की, दिनांक 18 रोजी जे निवेदन दिलेले आहे त्याच्याशी मी सहमत आहे.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 371 (2) नुसार माननीय राज्यपालांनी दिलेले निदेश हे मॅंडेटरी आहेत. मग, आपण माननीय राज्यपालांचा अपमान का करीत आहात ? आपण माननीय राज्यपालांचे अधिकार का मानत नाहीत ? तीन वर्षे याच कारणासाठी आम्ही आपणांस नाचवत आहोत. नाहीतर आमच्या हातात आहेच काय ? आपण माननीय राज्यपालांचा अपमान का करीत आहात ? कायद्याप्रमाणे ज्या गोष्टी असतात, त्या आपण स्वीकारल्याच पाहिजेत. माननीय राज्यपालांचा या निवेदनामध्ये उल्लेख असून हे निदेश ॲडव्हायजरी आहेत, असे म्हणणे बरोबर नाही. याठिकाणी दोन्ही महाभियोक्त्यांचे आपेनिअन आहेत. ते मी आपल्याकडे पाठलेले असून रेकॉर्डवरही आहेत. मग, आपण याठिकाणी जे ॲडव्हायजरीचे निवेदन केले आहे ते आपण वापस घेणार का ?

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, यामध्ये फारच लहानशी गोष्ट आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा विषय असून घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाला आहे.

**उपसभापती** : यासंदर्भात माननीय वित्त मंत्र्यांनी उत्तर द्यावे. त्यानंतर यावरील चर्चा मी थांबवतो.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, निवेदनामध्ये माननीय राज्यपालांचा उल्लेख आहे. याठिकाणी निवेदनामध्ये जे म्हटले आहे ते कायद्याच्या व घटनेच्या विरुध्द आहे. ते वगळून टाकल्यानंतर यामध्ये काहीही अडचण निर्माण होणार नाही, अशी आजची स्थिती आहे, असे माझे मत आहे. परंतु याबाबतीत आग्रह करणे, हे योग्य नाही. त्यामुळे याठिकाणी निवेदनामध्ये जो माननीय राज्यपालांच्या अभिप्रायाचा भाग आहे तो वगळून टाकावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मी त्याही पुढे जाऊन सांगू इच्छितो की, याबाबतीत मी माननीय प्रा.बी.टी.देशमुख यांच्याशी चर्चा केलेली आहे. यासंदर्भातील दुसरा जी.आर. काढण्याच्या प्रयत्नात मी होतो. यासंदर्भात माझे आणि माननीय देशमुख साहेबांचे बोलणेही इ ालेले आहे. दुसरा आवश्यक अभिप्राय असणारा जी.आर. मी घेऊन येतो आणि त्यानंतर नवीन निवेदन सभागृहासमोर सादर करतो, असे मी त्यांना म्हटले होते. थोडयाशा गैरसमजुतीतून हे निवेदन सभागृहासमोर आले. ज्यासाठी नियम 93 अन्वये सूचना मांडण्यात आलेली आहे,

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील...

त्यासंबंधीची पूर्णत: प्रोसिजर आणि सभागृहाचे समाधान करणारे उत्तर आपल्या परवानगीने मी पुन्हा याठिकाणी ठेवणार होतो. माननीय सदस्यांनी म्हटले होते की, आज नाहीतर उद्या निवेदन करा. त्यामुळे मी थोडासा गाफिल राहिलो आणि मी सभागृहात उपस्थित राहिलो नाही. कारण, यासंदर्भातील दुसऱ्या जी.आर.च्या मागे होतो. त्यामुळे मी सभागृहात उपस्थित राहिलो नाही. त्याचे ते कारण होते. माननीय देशमुख साहेबांच्या मनात जे आहे तेच माझ्याही मनात आहे. परंतु माननीय गडकरी साहेबांचे काय म्हणणे आहे ते अजून मला कळले नाही. याबाबतीत आपल्या दोघांचे एकमत असून त्याप्रमाणे कारवाई करु व यासंबंधी स्वतंत्र निवेदन सादर करु. हे निवेदन मी विड्रॉ करीत आहे. यासंदर्भात मी नव्याने निवेदन सादर करीन.

**उपसभापती** : ठीक आहे.

----------

..3......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.अजित... 15:50

**पृ. शी.** : पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर या जिल्हयांतील लहान, मध्यम आणि मोठया धरण प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या अनेक प्रकल्पग्रस्तांचे अद्यापही पुनर्वसन न होणे

**मु. शी.** : पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर या जिल्हयांतील लहान, मध्यम आणि मोठया धरण प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या अनेक प्रकल्पग्रस्तांचे अद्यापही पुनर्वसन न होणे यासंबंधी सर्वश्री सुधीर सावंत, संजय दत्त, जैनुद्दिन जव्हेरी,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर या जिल्ह्यांमधील राज्य शासनाच्या पाटबंधारे खात्यामार्फत हाती घेण्यात आलेल्या असंख्य लहान, मध्यम आणि मोठ्या धरण प्रकल्पामुळे बाधित झालेल्या अनेक प्रकल्पग्रस्तांचे अद्यापही पुनर्वसन न होणे, पुणे विभागातील सर्व जिल्ह्यांत प्रकल्पग्रस्तांच्या स्थलांतरांचा प्रश्न मोठा असल्याने त्यांच्या पुनर्वसनाचे काम अद्याप अपूर्ण असल्याची कबूली पुनर्वसन उपायुक्तांनी देणे, या सर्व जिल्ह्यातील 70 टक्के प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन जमिनीच्या उपलब्धते अभावी झालेले नसणे, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झाले नसल्याने त्यांनी मोर्चे, आंदोलने, निषेध सभा, विनंती-अर्ज, निवेदने याद्वारे शासनाचे वारंवार लक्ष वेधलेले असणे, तथापि शासनस्तरावरुन याबाबत कोणतीही ठोस उपाययोजना केली जात नसल्याने प्रकल्पबाधितांमध्ये पसरलेली तीव्र संतापाची लाट, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.पतंगराव कदम ( पुनर्वसन मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, राज्यात बऱ्याच ठिकाणी प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित आहे. लक्षवेधी सूचनेसंबंधी उत्तरात दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने पुनर्वसनासाठी एकूण 100 कोटी रुपयांचा निधी शासनाकडून उपलब्ध करुन दिला असताना केवळ 14 कोटी 64 लाख रुपये इतकाच निधी पुनर्वसनाच्या कामासाठी देण्यामागची कारणे काय ? उर्वरित निधी कधी देण्यात येईल ? तसेच, 20,467 पात्र प्रकल्पग्रस्त लाभार्थी असताना केवळ 3678 प्रकल्पग्रस्तांनाच नोकरी देण्यात आली आहे, उर्वरित 16,200 प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्यात आली नाही, त्यांना कधी नोकरी देण्यात येईल ?

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, पाटबंधारे प्रकल्पासाठी एकंदरीत जो निधी दिलेला आहे तो 14 कोटी नसून 51 कोटी 94 लाख रुपये इतका दिलेला आहे. या निधीपैकी पुणे जिल्हयास 43 कोटी रुपये, सातारा जिल्हयास 3 कोटी 67 लाख रुपये, सोलापूर जिल्हयास 5 कोटी 27 लाख रुपये, असा एकंदरीत 51 कोटी 94 लाख रुपयांचा निधी देण्यात आलेला आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, येथे असा प्रश्न विचारावयाचा आहे की, महाराष्ट्र पुनर्वसन प्राधिकरणाचे स्वरुप काय आहे ? अनेक वर्षापासून साधारणत: 40 वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित आहे. किती दिवसामध्ये या लोकांचे पुनर्वसन होणार आहे ? या बाबतीत शासनाने काही आराखडा तयार केलेला आहे काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, महाराष्ट्र पुनर्वसन प्राधिकरणच्या अध्यक्षतेखाली निर्णय घेण्यात आले आहे. कोठलेही पाटबंधारे प्रकल्प करावयाचे असेल तर अगोदर निधी ईयरमार्क केला जाईल. व त्याचें अधिकार संबंधित अधिकाऱ्यांना दिलले आहेत. पुनर्वसनाचे वर्षानुवर्ष जे प्रश्न रेंगाळलेले आहेत ते मार्गी लागण्यास विलंब लागत होता.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न अनुत्तरीतच राहिलेला आहे. मी आता वेगळया पध्दतीने माझा प्रश्न विचारतो. डॉ. पतंगराव कदम यांच्या सारख्या ज्येष्ठ सन्माननीय सदस्य पुनर्वसन खात्याचे मंत्री असल्याने प्रकल्पग्रस्त जनतेच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाविषयी माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. 20467 प्रकल्पग्रस्तापैंकी 3678 प्रकल्पग्रस्तांना शासकीय किंवा निमशासकीय सेवेत नोकऱ्या देण्यात आलेल्या आहेत. तसेच 156 प्रकल्पग्रस्तांच्या नावाची शिफारस निरनिराळया खात्यामधील नोकरीसाठी करण्यात आलेली आहे. तेव्हा उरलेल्या प्रकल्पग्रस्तांना शासन नोकऱ्या कधी उपलब्ध करुन देणार आहे ? याबाबत काही खुलासा शासनाकडून केला जाणार आहे का ? या प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देण्यासाठी पुनर्वसनाचा जो नियम आपण तयार केलेला आहे त्या अनुसार साधरण 3 हजार लोकांना अग्रक्रमाने व लवकरात लवकर नोकऱ्या देण्यात याव्यात.

---------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: उमरेड (जि. नागपूर ) येथे भारनियमनाच्या विरोधात नागरिकांनी काढलेल्या मार्चावर पोलिसांनी केलेला गोळीबार.

**मु.शी.**: उमरेड (जि. नागपूर ) येथे भारनियमनाच्या विरोधात नागरिकांनी काढलेल्या मार्चावर पोलिसांनी केलेला गोळीबार. संबंधी सर्वश्री. नितीन गडकरी, सय्यद पाशा पटेल, सागर मेघे, केशवराव मानकर, जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, प्रतापसिंह पाटील, संजय दत्त, दिवाकर रावते, मधुकर सरपोतदार, गोपिकिसन बाजेरिया श्रीमती नीलम गोऱ्हे, अरविंद सावंत, दिपक सावंत, सुरेश जेथलिया, परशुराम उपरकर, अनिल परब, वि.प.स यांनी दिलेली लक्षवेधीची सूचना.

श्री. नितीन गडकरी ( नागपूर विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नागपूर विभागातील उमरेड येथे दिनांक ७ फेब्रुवारी, २००७ रोजी भारनियमनाच्या विरोधात व भारनियमनामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी सर्वपक्षीय मोर्चाचे आयोजन करणे, तहसिल कार्यालय येथे उप विभागीय अधिकारी यांनी निवेदन स्वीकारण्यास दिलेला नकार, यामुळे मोर्चेकऱ्यांच्या भावना प्रक्षुब्ध होणे, जमावाने शासकीय व खाजगी वाहनांवर तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींच्या घरामध्ये घुसून केलेली दगडफेक व जाळपोळ, प्रक्षुब्ध जमावाला आवर घालण्याकरिता पुरेसा पोलीस बंदोबस्त नसल्याने पोलीसांना जमावाला काबूत ठेवण्यात आलेले अपयश, यामुळे प्रक्षुब्ध जमावाने अनेक शासकीय कार्यालयांची केलेली तोडफोड व जाळपोळ, त्यानंतर जमावाला पांगविण्याकरिता पोलीसांनी केलेला लाठीहल्ला, अश्रुधुराचा वापर व हवेत केलेला गोळीबार, या गोळीबारात १ व्यक्ति मृत व १० ते १२ व्यक्ति जखमी होणे, सततच्या भारनियमनाला कंटाळून नागरिकांच्या भावना भडकणे, यामुळे नागरीकांच्या मनात निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे. ) ....3



DVG/ KGS/ MHM/ 15:55

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, नागपूर विभागातील उमरेड येथे दिनांक 7 फेब्रुवारी, 2007 रोजी भारनियमनाच्या विरोधात व भारनियमामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी सर्वपक्षीय मार्चाचे आयोजन केले होते. त्या मोर्चाला पांगविण्याकरिता पोलिसांनी लाठीहल्ला व अश्रुधुराचा वापर केला होता. कु. आरती ठवकर नावाची एक युवती 6 फेब्रुवारी रोजी आपल्या नातेवाईकाकडे लग्नासाठी मुलगा बघायला आली होती. ऊमरेड शहरामध्ये भारनियमनाच्या विरोधात एक मोर्चा होता या मोर्चाच्या जवळून ती चालली होती. तिचा या मोर्चाशी काहीही संबंध नव्हता. तिला विनाकारण या केसमध्ये सामील करुन तिच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला व नाहक गुंतविण्यात आले. तिच्यावर केस दाखल केल्यामुळे तिचे ठरलेले लग्न मोडले. या मुलीचा या आंदोलनाशी काहीही संबंध नव्हता. ती ब्युटी पार्लरचे काम संपवून निघालेली होती. तेव्हा या मुलीसारख्या अनेक लोकांवर ज्या केसेस दाखल केलेल्या आहेत याबाबत माझी विनंती आहे की, या केसेम मागे घेतल्या जाणार आहेत का ? येथील पोलीस अधिकारी हा "महंमद तुघलक" सारखा वागत आहे. असा होपलेस पोलीस अधिकारी मी कधीही पाहिला नाही. म्हाताऱ्या बाईला धक्के मारणे, मोबाईल हिसकावून घेणे, असभ्य वर्तन करणे असे अनेक आरोप या अधिकाऱ्यावर आहेत. हे आरोप केवळ आम्हीच करीत नसून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस असे सर्व पक्षाचे प्रतिनिधी देखील करीत आहेत. या ठिकाणी ज्या लोकांना अटक करण्यात आली त्या सर्व लोकांवर या पूर्वी कुठल्याही क्रिमिनल स्वरुपाच्या गुन्हयांची नोंद नाही. कु. आरती ठवकर या मुलीचे आयुष्य या आरोपांमुळे बरबाद झाले आहे.

यानंतर श्री. रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.........

माझा प्रश्न असा आहे की, ज्या मुलीचा त्या मोर्चाशी संबंध नव्हता त्या मुलीला अटक करण्यात आली, तिच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला व पंधरा दिवस तिला जेलमध्ये टाकण्यात आले. या मुलीवरील केस मागे घेण्यात येईल काय, तसेच ज्या अन्य निरपराध लोकांवर केसेस दाखल करण्यात आल्या असतील त्यांच्यावरील केसेस मागे घेणार काय ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, निरपराध लोकांवरील केसेस मागे घेण्याबाबत सन्माननीय ज्येष्ठ सन्माननीय सदस्य, श्री.नितीन गडकरी यांनी प्रश्न विचारला आहे. ज्या लोकांचा या घटनेशी संबंध नसेल, चुकून दंगल बघणा-या लोकांची आरोपी म्हणून नावे गुंतली असतील तर त्यांच्यावरील खटले मागे घेतले जातील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, खटले मागे घेण्यात येतील, असे मंत्री महोदयांनी सांगितले. या घटनेची जी व्हिडिओ कॅसेट काढण्यात आली त्यामधील लोकांना अटक केली आहे. परंतु, काटोल येथील घटनेत माननीय मंत्री, श्री.नारायण राणे यांचे जे लोक व्हिडिओ कॅसेटमध्ये दिसत आहेत त्यांना पोलीस अटक करीत नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, निरपराध लोकांवर खटले भरण्यात आले, त्यांना जेलमध्ये टाकण्यात आले, एका मुलीचे त्यामुळे लग्न मोडले. तेथील एस.डी.ओ.हे दंगलीला जबाबदार आहेत. एस.डी.ओ.यांनी निवेदन स्वीकारले असते तर दंगल घडली नसती. त्यामुळे संबंधित एस.डी.ओ.यांच्याविरुध्द कारवाई करुन त्यांना अटक केली पाहिजे. तसेच, मुंबईहून उच्चस्तरीय अधिकारी पाठवून या संपूर्ण घटनेची पुन्हा चौकशी करुन ज्या निरपराध लोकांवर खटले दाखल करण्यात आले आहेत ते मागे घेतले पाहिजेत व ज्या एस.डी.ओ.ने बेजबाबदारपणे दंगल भडकवली त्याच्यावर कारवाई केली पाहिजे. अशा प्रकारची कारवाई शासन करणार काय ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या संपूर्ण घटनेची उच्चस्तरीय अधिका-यामार्फत चौकशी करण्यात येईल व जे निरपराध असतील त्यांच्यावरील खटले काढून टाकण्यात येतील. एस.डी.ओ.जर चुकीचे वागले, असे निष्पन्न झाले तर त्यांच्यावरही कारवाई केली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही घटनास्थळाला भेट दिली आहे. पोलीस अधिका-यांनी असे सांगितले की, दंगल घडण्यास एस.डी.ओ. जबाबदार आहेत. पोलिसांनी

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.................

एस.डी.ओ.यांना अशी विनंती केली की, त्यांनी निवेदन स्वीकारावे. मी निवेदन स्वीकारणार नाही, असे या एस.डी.ओ.यांनी सांगितले. शासकीय अधिका-यांना अशा सूचना असतात की, त्यांनी आंदोलनासंबंधी कशा प्रकारचे वर्तन ठेवावे. मोर्चातील लोकांना धक्के मारुन बाहेर काढण्यात आले. एस.डी.ओ.यांनी मोर्चातील लोकांना मारहाण केली त्यामुळे दंगल भडकली. त्यामुळे एस.डी.ओ.यांच्यासंबंधी मंत्री महोदयांना आत्ताच निर्णय घ्यावा लागणार आहे व घोषणा करावी लागणार आहे. या दंगलीत 3 माणसे मेली आहेत तर 27 माणसे गंभीर जखमी झाली आहेत. आम्ही हे मान्य करतो की, पोलिसांना कारवाई करणे भाग पडले. परंतु, ज्या एस.डी.ओ.मुळे हे सर्व घडले त्यांच्याविरुध्द कारवाई करणार का व जे मृत झाले आहेत त्यांच्या कुटुंबियांना 5 लाख रुपयांची मदत देण्यात येईल का ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मयतांच्या वारसांना प्रत्येकी 2 लाख रुपये व जखमींना 25 हजार रुपयांची मदत देण्यात आली आहे. एस.डी.ओ.यांनी कसूर केली असेल तर त्याबाबतची चौकशी करण्यात येईल व त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. उच्चस्तरीय चौकशीमध्ये हे सर्व येणार आहे. निरपराध लोकांवरील खटले मागे घेण्यात येतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ही घटना घडून आता बरेच दिवस झालेले आहेत. त्यामुळे एस.डी.ओ.यांना त्वरित निलंबित करावे.

यानंतर कुमारी जयश्री...........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

सभापती महोदय, आम्ही प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी केलेली आहे. या राज्याचे माननीय गृहमंत्री साहेबही तेथे आले होते. तेथे तीन माणसे मृत पावली व 27 माणसे जखमी झालेली आहेत. निवडणूक असतांना ही लक्षवेधी येऊ दिली नव्हती परंतु आता निवडणूक संपलेली आहे. नागपूर येथील एस.डी.ओ.च्या संदर्भात निलंबनाची कारवाई या शासनास तातडीने करणे भाग आहे.

**उपसभापती** : माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरात सांगितले की, या घटनेबाबत उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल, या चौकशीमध्ये नागपूर येथील एस.डी.ओ.वरही चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ठाणे जिल्हयातील कल्याण - डोंबिवली,ठाणे,भिवंडी,मीरा - भाईंदर,उल्हासनगर आणि नवी मुंबई या सहा महानगरपालिका क्षेत्रातील पाणी टंचाईची गंभर समस्या.

**मु. शी.** :ठाणे जिल्हयातील कल्याण - डोंबिवली,ठाणे,भिवंडी,मीरा - भाईंदर,उल्हासनगर आणि नवी मुंबई या सहा महानगरपालिका क्षेत्रातील पाणी टंचाईची गंभीर समस्या.यासंबंधी सर्वश्री संजय दत्त,सुधाकर गणगणे,रमेश निकोसे,प्रतापसिंह मोहिते - पाटील,धनाजी साठे,गोविंदराव आदिक,जितेंद्र आव्हाड,सदाशिव पोळ,गुरुनाथ कुलकर्णी,श्रीमती मंदा म्हात्रे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त :( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणीपुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" ठाणे जिल्हयातील कल्याण - डोंबिवली,ठाणे,भिवंडी,मीरा - भाईंदर,उल्हासनगर आणि नवी मुंबई या सहा महानगरपालिका क्षेत्रांतील पाणी टंचाईचा बनलेला उग्र प्रश्न,ठाणे जिल्हयातील वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होणे गरजेचे असणे,मात्र शासनाचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष होणे,ठाणे जिल्हयातील पाणी टंचाईची समस्या अत्यंत गंभीर असणे, या समस्येवर तोडगा काढण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना न करणे, सहा महानगरपालिका क्षेत्रातील पाणी पुरवठयाचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने पोशीर धरण लवकरात लवकर पूर्ण करण्याची निर्माण झालेली आवश्यकता,शासनाने केलेल्या दुर्लक्षामुळे पाण्याचा प्रश्न अतिशय उग्र होणे,मुंबईपासून जवळ असलेल्या ठाणे,कल्याण, डोंबिवली इत्यादि महापालिका क्षेत्रात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाल्याने जनतेच्या भावनांचा उद्रेक होऊन निर्माण झालेली गंभीर परिस्थिती,याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

LL - 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे ( ग्रामविकास,सार्वजनिक आरोग्य,कुटुंबकल्याण,पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, सर्वप्रथम मी आपल्या माध्यमातून संबंधित मंत्रिमहोदयांचे अभिनंदन करु इच्छितो. वास्तविकत: ब-याचशा वेळेला काय होते की, ज्यावेळी लक्षवेधीचे निवेदन प्राप्त होते, तेव्हा त्यात बगल देणारी व उडवाउडवीची माहिती दिली जाते पण या निवेदनाच्या बाबतीत सन्माननीय मंत्रिमहोदयांनी सविस्तरपणे खरे उत्तर देऊन आपल्या प्रामाणिकपणाची प्रचिती दिलेली आहे. ठाणे जिल्हयामध्ये पाण्याचा प्रश्न हा अतिशय उग्र स्वरुपाचा होत चाललेला आहे. मुंबई आणि मुंबईतील उपनगरांना पाणी देऊन त्यांची तहान भागविणारा हा ठाणे जिल्हा स्वत: मात्र तहानलेला आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक असा प्रश्न विचारावा.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, आपणही या जिल्हयाचे प्रमुख आहात, आपण मला थोडा वेळ द्यावा. सन 2001 सालच्या लोकसंख्येकरिता पोशीर धरणाचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. परंतु याला तेथील स्थानिक लोकांनी विरोध दर्शविला होता. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, स्थानिक लोकांनी विरोध करावयाचे काय कारण आहे ? स्थानिक लोकांच्या विरोधामागचे नक्की कारण व मागण्या कोणत्या आहेत ? स्थानिक लोकांच्या मागण्या पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे ? पोशीर धरणाचे काम विशिष्ट कालमर्यादेत पूर्ण करण्यात येईल का ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, पोशीर धरणाचे बांधकाम उशिरा होण्याची दोन कारणे आहेत, त्यापैकी पहिले कारण म्हणजे तेथील वन व पर्यावरण या दोन्ही विभागांचा क्लियरन्स पाहिजे होता, फॉरेस्ट विभागाकडून आपल्याला 780 हेक्टर व खाजगीरित्या 1,540 हेक्टर एवढी जमीन ॲक्विझिशन करणे आवश्यक होते, परंतु त्या हिशोबाने 780 हेक्टर खाजगीरित्या व 760 हेक्टर एवढीच जमीन वनखात्यामार्फत उपलब्ध करुन देण्यात आली होती. याकरिता राज्यशासनाला 760 लाख रुपये द्यावयाचे होते. या योजनेला ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सँक्शन नसल्यामुळे ते पैसे देणे शक्य नव्हते. दुसरे कारण म्हणजे विभागीय अधिकारी या ठिकाणी सर्व्हे करण्याकरिता गेले असता स्थानिक लोकांनी काही कारणांवरुन ऑब्जेक्शन काढले व जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये यानिमित्ताने एक हिअरिंगही घेण्यात आले होते. माननीय पाणीपुरवठा व जलसंपदा मंत्र्यांनी या पोशीर धरणासारखे एक मल्टिपरपज धरण बांधण्याबाबत एक बैठक घेतली होती. या पोशीर धरणाचे काम आता पाटबंधारे खात्याकडे सोपविण्यात आलेले आहे व त्यांचे

LL - 5

सर्व्हेचे काम सुरु झालेले आहे. माननीय जलसंपदा व पाणीपुरवठा मंत्री हे लॅण्ड ॲक्विझिशन व वन खात्याच्या जमिनीबाबत स्वत: लक्ष घालणार आहे. रिवाईज्ड प्रोजेक्टही पाटबंधारे खात्यामार्फतच तयार केले जाणार आहेत.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MHM/ प्रथम कु.खर्चे ....... 16:10

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, पोशीर धरणाचा प्रकल्प 860 कोटी रुपयांचा होता. त्या प्रकल्पाचे बजेट आता तीन पटींनी वाढलेले आहे. हा प्रकल्प म्हणजे भिजत घोंगड आहे. अहवाल, वन विभागाची परवानगी, केंद्र शासनाची परवागी, सर्व्हेक्षण हे सर्व केव्हा पूर्ण होणार आहे ? ठाणे जिल्हयातील लोक पोशीर धरण पूर्ण होण्याची वाट बघत आहेत. पोशीर धरणातून ठाणे जिल्हयाला पाणी मिळणार आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, पोशीर धरण केव्हा पूर्ण होणार आहे ? लक्षवेधी सूचनेला दिलेल्या निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "ठाणे महापालिकेने शाही धरणाचा प्रकल्प प्रस्तावित केलेला आहे." माझा दुसरा प्रश्न असा आहे की, शाई धरणाच्या प्रकल्पाची सद्य:स्थिती काय आहे, त्याचा सर्व्हे झाला आहे काय, या प्रकल्पाला तेथील गावक-यांचा विरोध आहे काय ? आणि माझा तिसरा प्रश्न असा आहे की, पोशीर धरणासाठी किती निधी लागणार आहे आणि तो कशा पद्धतीने उपलब्ध केला जाणार आहे ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, रायगड जिल्हयातील कर्जत तालुक्यामध्ये पोशीर धरण होणार आहे. या धरणाला तेथील स्थानिक लोकांचा मोठया प्रमाणावर विरोध आहे. सर्व्हे करण्यासाठी स्टाफ गेला तर तेथील लोक त्याला विरोध करतात. पोशीर धरणाला त्या भागातील जनतेचा विरोध आहे. आम्ही आधी प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करु आणि नंतर धरण पूर्ण करु, असे त्या भागातील जनतेला विश्वासात घेऊन सांगण्याची आवश्यकता आहे. आम्ही या धरणातील पाण्याचा उपयोग सर्व शहरांकरिता करण्याचा प्रयत्न करीत आहोत. एक गोष्ट मात्र खरी आहे की, लोकप्रतिनिधी आणि तेथील गावक-यांशी चर्चा करुन याबाबत निर्णय घ्यावा लागणार आहे. आम्ही त्यासंदर्भातील चर्चा करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याला म्हणावे तसे यश मिळालेले नाही. जी महत्वाची शहरे आहेत तेथील अधिका-यांना असे सांगण्यात आले आहे की, पिण्याच्या पाण्याकरिता नवीन धरणाचे काम हाती घ्यावे. नवी मुंबई येथे मोरबे धरण तयार करण्यात आले आहे. त्याच पद्धतीने पोशीर धरणाबद्दल प्रयत्न सुरु आहेत. वन विभागाची जमीन घेत असतांना त्यासंदर्भात सुप्रिम कोर्ट वेगवेगळया प्रकारचे आदेश काढते. शासनाला सुप्रिम कोर्टाच्या आदेशांचे पालन करावे लागते. पोशीर धरणासाठी वन विभागाची 760 हेक्टर जमीन लागणार आहे. पोशीर धरणाचा उपयोग फक्त पिण्याच्या पाण्यासाठी होणार नसून पूर नियंत्रणासाठी देखील होणार आहे.

..2.....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार ..........

आम्ही केंद्र शासनाच्या असे निदर्शनास आणून देत आहोत की, या धरणाचा फक्त पिण्याच्या पाण्यासाठी उपयोग होणार नसून ज्यावेळी मोठया प्रमाणावर पाऊस पडतो आणि शहरांना पाण्याने वेढले जाते त्यावेळी पूर नियंत्रणाची जबाबदारी पोशीर धरण पार पाडू शकते. हेच शाई धरणाचे देखील आहे. आपण ज्या ठिकाणी शाई धरण करु पाहत आहोत त्या ठिकाणी 487 हेक्टर वन जमीन लागणार आहे. दोन्ही धरणांसाठी वन जमीन मोठया प्रमाणावर लागत असल्यामुळे अडचणी येत आहेत. त्या भागामध्ये दिवसेंदिवस पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होणार असल्यामुळे सन 2011 पर्यंत ही धरणे पूर्ण होणे गरजेचे आहे, अशी भूमिका पाणी पुरवठा विभाग केंद्र शासनासमोर मांडणार आहे आणि त्यावेळी आम्हाला नक्की यश येईल, अशी आम्हाला आशा वाटते.

-------

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जालना जिल्हा परिषदेतील शिक्षणाधिका-यांच्या मनमानी कारभारामुळे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांना तीन महिन्यांपासून वेतन न मिळणे.

**मु.शी.**: जालना जिल्हा परिषदेतील शिक्षणाधिका-यांच्या मनमानी कारभारामुळे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांना तीन महिन्यांपासून वेतन न मिळणे यासंबंधी श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"जालना जिल्हापरिषदेतील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी मनमानी कारभार करुन दरमहा खाजगी शाळांतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी आलेले अनुदान इतरत्र वापरणे व हे अनुदान अतिरिक्त कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी वापरल्यामुळे नियमित कर्मचाऱ्यांचे वेतन गेल्या तीन महिन्यापासून न मिळणे, शिक्षण उपसंचालक औरंगाबाद विभाग यांनाही वारंवार विचारणा करुन सुध्दा शिक्षणाधिकारी त्याकडे करीत असलेले दुर्लक्ष, यामुळे सर्व शिक्षकांवर उद्‌भवलेली उपासमारीची परिस्थिती, त्यामुळे शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

श्री.हसन मुश्रीफ (शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

..4.......



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आज एप्रिल महिन्याची 10 तारीख आहे. मार्च महिन्याचे पगार आज होणे अपेक्षित होते. परंतु अद्याप काही शाळांचे फेब्रुवारी महिन्यांचे देखील पगार झालेले नाहीत, हे खरे आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, जालना जिल्हयातील सर्व शाळांच्या पगाराचे धनादेश दिनांक 2.4.2007 रोजी जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत जमा झालेले आहेत आणि त्यांचे पैसे देखील अदा झालेले आहेत.

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, वाढीव पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचा पगार शासनाकडे देय नाही. शासन नेहमीच शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधात बदल करीत आहे. जालना जिल्हा परिषदेमध्ये 100 पदांना शासनाने मान्यता दिलेली आहे, हे खरे आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, वाढीव पदांना मंजूरी देण्यात आलेली आहेत, हे खरे आहे, परंतु त्यांचे वेतनही थांबविण्यात आले होते. यानंतर उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने एका याचिकेमध्ये थकीत वेतन द्यावे असा आदेश दिला असल्याने थकीत वेतन देण्यात आलेले आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, या पदांना शासनाची मान्यता नसतानाही वेतन देण्याचा प्रश्न न्यायालयात उपस्थित करण्यात आला, या प्रकरणास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना उपस्थित करेपर्यंत या प्रकरणी कोणतीही कार्यवाही झालेली नाही. जालना येथून संबंधित अधिकारी बदलून गेलेले आहेत, त्यांनी या 100 पदांच्या वेतनावर 54 लाख रुपये खर्च केला आहे, संबंधित अधिकाऱ्याच्या पगारातून शासन ही रक्कम वसूल करणार आहे का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल, चौकशीत दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांवर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ही घटना घडून गेली आहे. आता शासन याची कोणती वेगळी चौकशी करणार आहे. ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सदरील शिक्षकांना अनधिकृतपणे वेतन देण्यात आलेले आहे, असे मी म्हटलेले नाही. वाढीव पदांचा पगार दिलेला होता, हे खरे आहे. तसेच उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर त्यांना वेतन दिले आहे, हे खरे आहे. तरीही सन्माननीय सदस्यांच्या सूचनेच्या अनुषंगाने या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : शिक्षण शुल्क समितीच्या शिफारसी डावलून खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांनी फीमध्ये केलेली भरमसाठ वाढ.

**मु.शी.** : शिक्षण शुल्क समितीच्या शिफारसी डावलून खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांनी फीमध्ये केलेली भरमसाठ वाढ यासंबंधी सर्वश्री अरविंद सावंत, दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.अनिल परब, सर्वश्री परशुराम उपरकर, सुरेश जेथलिया, गोपीकिसन बाजोरिया, मधुकर सरपोतदार वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"सन २००२-०३ मध्ये अथवा यापूर्वी अभियांत्रिकी महाविद्यालयांत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये ५० ते ६५ हजार रुपयांची करीत असलेली मागणी, पुणे येथील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे व नव्या मुंबईतील खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांनी पूर्वीच्या चौपट फीची विद्यार्थ्यांकडे केलेली मागणी, राज्य शासनाच्या शिक्षण शुल्क समितीच्या शिफारशी डावलून ही फी वाढ करण्यात आल्याने शासनाची शिक्षण शुल्क समिती निरुपयोगी ठरणे, हजारो विद्यार्थी खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असतांना त्यांना अव्वाच्या सव्वा रक्कमेची फी मागणी करण्यात येत असल्याने सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या ती आवाक्याबाहेर असणे, अशा प्रकारे राज्य शासनाच्या शिक्षण शुल्क समितीला धुडकावून खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची चालविलेली लूट, या प्रकाराला आळा न घातल्यास अशाच प्रकारे वैद्यकिय महाविद्यालयेही आपल्या शिक्षण शुल्कात चौपट वाढ करण्याच्या तयारीत असणे, याबाबत शासनाने तातडीने हस्तक्षेप करुन खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या शिक्षण सम्राटांना आवर घालण्याबाबत सुरु केलेली जाणीवपूर्वक चालढकल, परिणामी विद्यार्थ्यांत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट, याबाबत शासनाने तातडीने केलेली व करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

.....3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....4

10-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) NN-4

PNG/ MHM/ KGS/

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मी वारंवार शिक्षण शुल्क वाढीबाबत आवाज उठविलेला आहे आणि त्या अनुषंगाने आज ही लक्षवेधी सूचना मांडलेली आहे.

सभापती महोदय, याबाबत मी सांगू इच्छितो की, शिक्षण शुल्क समितीने राज्यातील विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांसाठी अंतरिम शुल्क जाहीर केलेले आहे. जाहीर करण्यात आलेल्या शैक्षणिक शुल्काव्यतिरिक्त कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारु नये असे स्पष्ट आदेश दिलेले असतानाही सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे, विश्वकर्मा इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी पुणे व जवाहरलाल नेहरु अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद या संस्था शिक्षण शुल्क समितीने आकारलेली किंवा निर्देश केल्यापेक्षा अधिक शुल्क आकारीत आहेत अशा तक्रारी प्राप्त झाल्याचे माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात म्हटले आहे. परंतु शासन या संस्थांवर कोणती कारवाई करणार आहे ? शासनाने परिपत्रक काढून टाकले आहे की, खाजगी अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयाचे शिक्षण शुल्क निश्चित करण्याची किंवा वाढ करण्याची सर्वस्वी शिक्षण शुल्क समितीच्या अखत्यारीतील बाब आहे. परंतु माझा प्रश्न असा आहे की, काही अभियांत्रिकी महाविद्यालयांनी अवाजवी फी आकारल्याच्या तक्रारी किती तारखेस प्राप्त झालेल्या आहेत ? शिक्षण शुल्क समितीने या तक्रारींवर किती तारखेस कारवाई केली ? आतापर्यंत कोणत्या स्वरुपाची कारवाई केली आहे ?.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्कावर यापूर्वी अनेकवेळा आपण सभागृहात चर्चा केलेली आहे. सभागृहातील बहुतेक सदस्यांना माहिती आहे की, टी.एम.ए.पै. फाऊंडेशन व इतर विरुध्द कर्नाटक राज्य या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिनांक 31.10.2002 रोजी दिलेल्या निकालपत्रामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण शुल्क निश्चित करण्याचे अधिकार संबंधित संस्थांना प्राप्त झाले. त्यामुळे सन 2003-04 पासून पेड सीट व मुल्याधारित जागा अशी विभागणी असणारी संकल्पना अस्तित्वात राहिली नाही. तसेच खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक शिक्षण संस्थांनी ठरविलेल्या शिक्षण शुल्कास सर्वोच्च न्यायालयाप्रमाणे उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या शिक्षण शुल्क समितीकडून शुल्क प्रमाणित करुन घेऊन ते लागू करण्याचे बंधन घालण्यात आले आहे. शिक्षण शुल्क समितीने शैक्षणिक वर्ष 2003-04, 2004-05, 2005-06 साठी अंतिम शुल्क तसेच सन 2006-07 साठी दिनांक 19 जून, 2006 रोजी अंतरिम शुल्क जाहीर केले आहे.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शेट्टी .....

सर्व प्रोफेशनल नॉन-एडेड कॉलेजेस `असतील, मग ती मेडिकल असोत वा इंजिनिअरींग असोत. त्यांना हे बंधनकारक आहे की, शिक्षण शुल्क समितीने ठरवून दिलेलीच फी विद्यार्थ्यांकडून त्यांनी घेतली पाहिजे. काही ठिकाणी म्हणजे या निवेदनात म्हटल्याप्रमाणे सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय,पुणे., विश्वकर्मा इन्स्टि.ऑफ टेक्नॉलॉजी,पुणे आणि जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालय,औरंगाबाद या तीन संस्थांच्या बाबतीत विद्यार्थ्यांची तक्रार आपल्याकडे आली होती. ती तक्रार कोणत्या तारखेला आपल्याकडे आलेली आहे याची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही, ती मी आपल्याला नंतर देऊ शकेन. परंतु ती तक्रार आपण शिक्षण शुल्क समितीकडे पाठविली आहे. सभापती महोदय, या विद्यार्थ्यांची बेसिक तक्रार अशी आहे की, या ज्या 26 तक्रारकर्त्या विद्यार्थ्यांनी 2002-03 मध्ये ॲडमिशन घेतली होती त्यांचा कोर्स 2005-06 मध्ये संपणार होता. परंतु ते परीक्षेत फेल झाल्यामुळे त्यांना 2006 मध्ये पुन्हा त्या वर्षासाठी ॲडमिशन घ्यावी लागली. त्यावेळी म्हणजे 2006 मध्ये शिक्षण शुल्क समितीने नवीन फी जाहीर केली असल्याने हे जे 26 विद्यार्थी आहेत त्यांना 'रिपीटर' म्हणून पुन्हा चौथ्या वर्षासाठी प्रवेश घ्यावा लागला आहे त्यांना नवीन फी लागू शकेल असे संस्थांनी सांगितले. कारण याबाबतचा कोर्टाचा, शिक्षण शुल्क समितीचा जो आदेश आहे तो असाच आहे. तो मी वाटल्यास आपल्याला येथे वाचून दाखवितो. त्या आदेशानुसार जे विद्यार्थी फेल होतात आणि रिपीटर म्हणून येतात तेव्हा त्यांना नवीन फी लागू होणार. ...

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, केवळ ही तीन कॉलेजेसच नाहीत तर अशी आणखीही काही कॉलेजेस आहेत. उदा. पुण्यातीलच छ.शाहू महाराज इंजिनिअरींग कॉलेज, जयवंतराव भोसले कॉलेज, डी.वाय.पाटील इंजिनिअरींग कॉलेज, सूर्यदत्ता कॉलेज, सिंहगड कॉलेज इ. या कॉलेजांना आपल्या शिक्षण शुल्क समितीने डायरेक्शनस् दिल्यानंतरही ही कॉलेजस विद्यार्थ्यांची फसवणूक कशी करतात ते मी आपल्याला सांगतो. ..

( **सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री. भास्कर जाधव** )

सभापती महोदय, कॉलेजमध्ये मैदान आहे का ? कॉलेजमध्ये ग्रंथालय आहे का ? कॉलेजमध्ये प्रयोगशाळा आहे का ? कॉलेजमध्ये कार्यशाळा आहे काय ? या सगळ्या अभियांत्रिकी कॉलेजांना लागू असलेल्या गोष्टी आहेत, पण या आणि अशा आणखीही काही सुविधा कॉलेजांमध्ये असल्या

...... ओओ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत .....

पाहिजेत असा निकष फी ठरविताना लक्षात घेतला जातो. आता याबाबतीत असे होते की, ज्या दिवशी शिक्षण शुल्क समिती कॉलेजची पाहणी करण्यासाठी भेट देणार असते त्या दिवशी मॅनेजमेंटकडून कॉलेजमध्ये तात्पुरती संगणकाची प्रयोगशाळा उभी केली जाते. त्या ठिकाणी भाड्याने संगणक आणले जातात आणि समितीचा पाहणी दौरा आटोपल्यानंतर, या सगळ्या सुविधा कॉलेजकडे आहेत हे समितीने पाहिल्यानंतर, दुसऱ्या दिवशी भाड्याने आणलेल्या या सगळ्या गोष्टी परत केल्या जातात आणि समिती मात्र त्या कॉलेजांमध्ये त्या त्या सुविधा आहेत असे समजून त्यानुसार त्या कॉलेजची फी ठरविते. काही संस्था तर याबाबतीत वेगळी चलाखी करतात. खरे तर या सगळ्या सोयी-सुविधा संस्था-कॉलेजच्या प्रांगणामध्ये असणे आवश्यक असते. पण समितीच्या भेटीच्या वेळी मॅनेजमेंट समितीला सांगते की, आमचे मैदान, आमचे ग्रंथालय, प्रयोगशाळा अमुक ठिकाणी आहे. शिक्षण शुल्क समिती देखील त्यावर विश्वास ठेवते आणि या सगळ्या सुविधा नसताना देखील मोठी फी आकारली जाऊन त्यात विद्यार्थी भरडले जातात. त्याची आपण दखल घेणार का ? आता हे जे 24 रिपोटर्स विद्यार्थी आहेत त्यांच्या पुरताच हा प्रश्न मर्यादित नाही. या कॉलेजांनी तर विद्यार्थ्यांकडून अगोदरच कोऱ्या कागदावर फॉर्म भरून घेतला होता की, शिक्षण शुल्क समितीने ठरवून दिलेली वाढीव फी आम्ही भरू. म्हणजे ही त्यांच्यावर एक प्रकारे सक्तीच झाली. सभापती महोदय, शिक्षण शुल्क समितीने अभियांत्रिकी महाविद्यालयांना 80 हजार रूपये फी आकरली ती त्या संस्थेला सोयीस्कर आहे म्हणून सांगतात आणि 50-50 हजार रूपये वाढवून विद्यार्थ्यांकडे मागतात. परंतु त्याच शुल्क समितीने वैद्यकीय कॉलेजांच्याबाबतीत जी फी सांगितली असेल त्याबाबतीत मात्र समितीचे निर्देश कॉलेजेस-संस्था पाळत नाहीत. त्याबद्दल आपण काय कारवाई त्यांचेवर करणार आहात ? जी अभियांत्रिकी कॉलेजेस अशा प्रकारे फसवणूक करून फी आकारतात त्यांच्याबाबतीत आपण काय करणार आहात ?

( यानंतर श्री. सरफरे .... पीपी 1 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये मेडिकल, इंजिनिअरींग, मॅनेजमेंट, डेंटल, होमियोपॅथिक इत्यादी प्रोफेशनल कॉलेजेस आहेत त्यांच्याकरिता शिक्षण शुल्क समितीने फी ठरविली आहे त्याप्रमाणे त्यांना विद्यार्थ्यांकडून फी घ्यावी लागेल. त्यापेक्षा एक पैसा देखील जास्त ते घेऊ शकत नाहीत. शासनाकडे फक्त तीन तक्रारी आल्या होत्या त्या शिक्षण शुल्क समितीकडे पाठविण्यात आल्या आहेत. आपण मघाशी ज्या आठ-दहा कॉलेजेसची नावे घेतली त्यांच्या तक्रारी शासनाकडे आलेल्या नाहीत. माननीय सदस्यांनी याठिकाणी जे निवेदन केले आहे ते तपासून पाहिले जाईल. माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, औरंगाबाद हायकोर्टाचे जस्टिस श्री. वजिफदार यांनी असा निकाल दिला आहे की, कित्येक संस्थांमध्ये जे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत त्यांच्या संबंधित शिक्षण संस्थेविरुध्द जर काही तक्रारी असतील तर ते स्वत: शिक्षण शुल्क समितीपुढे जाऊन आपली तक्रार नोंदवू शकतात. आणि शिक्षण शुल्क समितीमार्फत त्याबाबत पूर्ण चौकशी करुन तक्रारीमध्ये तथ्य आढळल्यास त्या संस्थेविरुध्द समिती कारवाई करु शकते. अशाप्रकारे औरंगाबाद हायकोर्टाने दहा दिवसापूर्वी निर्णय दिला आहे. काही संस्था वेगवेगळया हेडखाली पैसे घेत असतील हे मी नाकारीत नाही. परंतु शिक्षण शुल्क समितीने प्रत्येक कॉलेजने फी फिक्सेशन कसे करावे यासंबंधी प्रिन्सिपल ठरवून दिले आहे, ते मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. त्यामुळे शिक्षण शुल्क समितीने ठरवून दिलेल्या फीच्या रकमेपेक्षा एक रुपया जरी त्या संस्थेने घेतला तर त्या संस्थेविरुध्द कारवाई केली जाईल.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, सहा विद्यार्थ्यांच्या तक्रारीसंबंधी मला प्रश्न विचारावयाचा आहे. निवेदनामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, 2002-03 पूर्वी ज्यांनी प्रवेश घेतला आहे त्यांना पूर्वलक्षीप्रभावाने फी आकारु नये. याठिकाणी साडे सतरा हजार फी भरावयाची आहे, तिच्या अगेन्स्ट 55 ते 60 हजार रुपये वेगळी फी भरावयाची आहे. चार महिन्यापूर्वी ही तक्रार घेऊन ते विद्यार्थी आम्हाला भेटले आहेत. आणि आता आपण कारवाई करतो म्हणत आहात? शासनापेक्षा शिक्षण शुल्क समिती मोठी आहे काय? निवेदनाच्या शेवटच्या वाक्यामध्ये असे म्हटले आहे की, "खाजगी अभियांत्रिकी अथवा वैद्यकीय महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निश्चित करणे/त्यामध्ये वाढ करणे ही सर्वस्वी शिक्षण शुल्क समितीच्या अखत्यारीतील बाब असून, याबाबत शासन कोणताही हस्तक्षेप करु शकत नाही". परंतु त्याठिकाणी शिक्षण संस्थांनी जोपर्यंत तुम्ही फी भरणारी नाही तोपर्यंत तुम्हाला प्रॅक्टिकल्सच्या परिक्षेला बसू देणार नाही अशाप्रकारचा धाक दाखवून त्यांच्याकडून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे...

फी वसूल केली आहे. त्यामुळे या सहा विद्यार्थ्यांच्या तक्रारीबाबत एक महिन्याच्या आत कारवाई करुन त्या संस्था चालकांकडून फी वसूल केली जाईल काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सहा विद्यार्थ्यांच्या तक्रारीची माहिती शासनाकडे असून त्यासंबंधी चौकशी करुन नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

श्री. वसंतराव खोटरे : विश्वकर्मा इंस्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे या इंजिनिअरींग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी फीमध्ये वाढ करु नये याकरिता आंदोलन केले होते हे खरे आहे काय? निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, "सन 2002-03 अथवा त्यापूर्वी अभियांत्रिकी महाविद्यालयांत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून त्यावेळी लागू असलेले शुल्क आकारण्यात यावे. तसेच यांना पूर्वलक्षी प्रभावाने नव्याने निश्चित केलेले शुल्क आकारु नये." असे असतांनाही शुल्क आकारण्यात आले असून त्याच्या पावत्या माझ्याकडे आहेत. तेव्हा या संस्थेमार्फत आकारण्यात आलेल्या शुल्काचे पैसे हे अधिवेशन संपण्यापूर्वी परत करण्यात येतील काय?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी त्यांच्याकडील तक्रारी माझ्याकडे दिल्यानंतर त्या तपासून योग्य ती कारवाई केली जाईल.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय मी औचित्याच्या मुद्याद्वारे हा प्रश्न उपस्थित केलेला होता. शिक्षण शुल्क समितीने आपल्याला कळविले होते की, नासिक येथील मेडिकल कॉलेज आणि धुळे येथील फार्मसी कॉलेज यांनी फी जास्त घेतलेली आहे. फीच्या रिसिटची कॉपीही दिलेली होती. शिक्षण शुल्क समितीने कळविले की, 1 लाखापेक्षा जास्त म्हणजे 2 लाख 63 हजार इतकी फी घेतलेली आहे. अशाप्रकारे त्यांनी कळवून देखील त्या संस्थांवर का कारवाई केली जात नाही ? ही कारवाई किती दिवसामध्ये करणार आहात ?

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांनी धुळे येथील फार्मसी कॉलेज आणि नासिक येथील मेडिकल कॉलेज या संबंधीची माहिती दिलेली होती. त्या संदर्भाने शिक्षण शुल्क समितीकडे पुन्हा बैठक घेतली. त्यानंतर शिक्षण शुल्क समितीने जो निर्णय दिलेला आहे, त्यांची माहिती सदस्यांना सांगेन.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, मला खुलासा करावयाचा आहे की, नासिक मेडिकल कॉलेजचा या ठिकाणी उल्लेख करण्यात आला, म्हणून मला सांगावयाचे आहे की, नासिक मेडिकल कॉलेजने शिक्षण शुल्क समितीने ठरवून दिलेल्या फी पेक्षा जास्त फी घेतलेली नाही. माननीय मत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. त्याचा अर्थ खोलामध्ये जाऊन लक्षात घ्यायला पाहिजे. सन 2002-2003 या वर्षामध्ये ज्यांनी ॲडमिशन घेतली होती, त्यावेळेस जी फी लागू होती तीच फी त्यांच्याकडून घेण्यात यावी. पण जो विद्यार्थी ज्यावेळेस सन 2003-04, 2004-05, 2005-06 मध्ये जातो, त्यावेळेस शिक्षण शुल्क समितीने निर्धारित केलेलीच फी द्यावी लागेल, असा अर्थ निघतो, हे लक्षात घेतले पाहिजे. परंतु विद्यार्थ्यांचे पालक जागरूक असतात, पालक जास्त फी भरण्यास तयार नसतात. आता देखील 20 विद्यार्थी कॉलेजच्या विरुध्द हायकोर्टामध्ये गेले. त्याच मुद्यावर त्यांचा हायकोर्टाने रिट पिटिशन फेटाळला आणि फी भरण्याचे आदेश दिले.

श्री.विनोद तावडे : ही चुकीची माहिती आहे.

**तालिका सभापती** (श्री.भास्कर जाधव) : सन्माननीय सदस्यांनी आपली माहिती दिली.

श्री.विनोद तावडे : शिक्षण शुल्क समितीने ठरविलेल्या फीपेक्षा जास्त फी घेतलेली आहे त्याची माझ्याकडे रिसिट आहे. ती मी आपल्याकडे पाठवितो. तसे शिक्षण शुल्क समितीनेही शासनाला कळविलेले आहे. शिक्षण शुल्क समितीने दिलेल्या निर्णयाप्रमाणे त्या संस्थांवर आपल्या विभागामार्फत केव्हा कारवाई करणार आहात ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

श्री.सुरेश शेट्टी : नासिक मेडिकल कॉलेज आणि धुळे फार्मसी कॉलेज यांच्या संबंधाने पुन्हा शिक्षण शुल्क समितीकडे प्रकरण पाठवितो.

श्री.विनोद तावडे : त्यांच्याकडून निर्णय फिरवून घेणार नाही कशावरून ?

श्री.सुरेश शेट्टी : शिक्षण शुल्क समितीला सुप्रीम कोर्टाने यासंबंधीचे सगळे अधिकार दिलेले आहेत. आमच्याकडे तक्रार आल्यानंतर आम्ही ती तक्रार त्यांच्याकडे पाठवितो. आम्ही फक्त पोस्टमनचेच काम करतो. शिक्षण शुल्क समितीच निर्णय घेते.

---

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

**पृ. शी**. : यवतमाळ जिल्ह्यातील उच्च प्राथमिक मराठी शाळा,बेलोरी, पंचायत समिती कळंब येथील मुख्याध्यापकांनी केलेली आत्महत्या.

**मु. शी**. : यवतमाळ जिल्ह्यातील उच्च प्राथमिक मराठी शाळा,बेलोरी, पंचायत समिती कळंब येथील मुख्याध्यापकांनी केलेली आत्महत्या, यासंबंधी सर्वश्री शिवाजीराव पाटील,जितेंद्र आव्हाड,शरद पाटील, जयंत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.शिवाजीराव पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" यवतमाळ जिल्ह्यातील उच्च प्राथमिक मराठी शाळा बेलोरी पंचायत समिती कळंब येथील उच्च श्रेणी मुख्याध्यापक श्री.सुधाकर ठाकरे यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी निलंबनाची धमकी दिल्यामुळे जिल्हा परिषद शाळेत दिनांक 14 मार्च, 2007 रोजी विष प्राशन करुन केलेली आत्महत्या, मानसिक त्रास असह्य झाल्यामुळे श्री.सुधाकर ठाकरे यांनी आत्महत्या केली असा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघटनेने केलेला आरोप, चुकीच्या पध्दतीने प्रशासनाची काम करुन घेण्याची पध्दत असल्यामुळे अशाप्रकारची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून दिनांक 23 मार्च, 2007 रोजी जिल्हापरिषद कार्यालय यवतमाळ समोर, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघातर्फे भव्य मोर्चाचे केलेले आयोजन, श्री.सुधाकर ठाकरे यांच्या आत्महत्त्येस जबाबदार असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांविरुध्द चौकशी करण्याची होत असलेली मागणी, परिणामी स्थानिक शिक्षक वर्गात पसरलेला तीव्र असंतोष व चिंतेची भावना, यावर शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

श्री.शिवाजीराव पाटील : सभापती महोदय, बेलोरी पंचायत समिती] कळंब येथील उच्च श्रेणी मुख्याध्यापकांनी आत्महत्या केलेली आहे. आत्महत्या का केली ? या संबंधीची कारणे का देण्यात आली नाहीत ? आतापर्यन्त बांधकामाच्या संदर्भाने किती शिक्षकांनी आत्महत्या केलेल्या आहेत ?

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव पाटील ......

सरपंच, गट शिक्षण अधिकारी आणि बांधकाम इंजिनियर यांना याबाबतीत दोषी धरले की नाही ? कोणावर कारवाई केली याची माहिती निवेदनामध्ये दिलेली नाही. जे शिक्षक मयत झाले त्यांच्या वारसाला नोकरी मिळणार काय ? या बांधकामाच्या जबाबदारीतून शिक्षकांना बाहेर काढणार काय ? शिक्षक हे बांधकामातील तज्ज्ञ आहेत काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मुख्याध्यापक श्री. सुधाकर ठाकरे यांनी विष प्राशन करुन आत्महत्या केलेली आहे ही गोष्ट खरी आहे. त्यांनी एक चिठ्ठी लिहून ठेवली होती. त्या चिठ्ठीमध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, श्री. नितीन शहाडे,कनिष्ठ अभियंता आणि श्री. रामदास फुणे, गवंडी या दोघांनी सर्व शिक्षा अभियान खोल्या बांधकाम यामध्ये मला मनस्ताप दिलेला होता त्यामुळे मी आत्महत्या करीत आहे. त्या दोघांना अटक झाली असून श्री. शहाडे यांना 2 एप्रिलला जामीन मिळालेला आहे. त्यांच्या घरामध्ये एक मुलगा आणि मुलगी आहे त्यांच्यापैकी मुलीला नोकरी द्यावी अशी संघटनेची मागणी आहे. त्यांचा मुलगा राहूल हा बी.ई. करत आहे. मुलगी संजीवनी ही संगीत विशारद आहे. त्या जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळा आहेत. संगीत विशारदची एक जागाही रिक्त आहे. परंतु त्या जागेवर मेरिटवर भरती होत असल्यामुळे याबाबतीत त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करु.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शिवाजीराव पाटील यांनी विचारलेला प्रश्नांना माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले नाही. त्यांच्या आत्महत्येला खरोखर कोण कारणीभूत होते याचा खुलासा निवेदनामध्ये करण्यात आलेला नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी निवेदनामध्ये तिघांची नावे सांगितलेली आहेत. सगळ्यात महत्वाचा प्रश्न असा आहे की, कै. सुधाकरराव ठाकरे हे एकमेव मुख्याध्यापक बळी पडलेले आहेत असे नाही तर राज्यामध्ये प्रत्येक ठिकाणी अशा प्रकारच्या घटना घडू लागलेल्या आहेत. सांगली जिल्ह्यामध्ये देखील अनेक मुख्याध्यापकांना सरपंच आणि ग्राम शिक्षण समिती यांच्याकडून तसेच तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांकडून शाळा खोल्या बांधकामाच्या बाबतीत अनेक प्रकारचा त्रास दिला जातो. हे मुख्याध्यापक ग्राम शिक्षणसमितीचे सचिव असल्यामुळे त्यांच्या सल्ल्याने बँकेतून पैसे काढावे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

प्रा. शरद पाटील ....

लागतात. ते पैसे काढण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणला जातो आणि त्यांचा मानसिक छळ केला जातो. म्हणून या मुख्याध्यापकांची या जबाबदारीतून मुक्तता करण्यासंबंधी शासन विचार करील काय ? श्री. ठाकरे यांच्या आत्महत्येला कारणीभूत झालेले जे अधिकारी आहेत त्यांच्यावर कोणकोणत्या कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ही आत्महत्या झालेली आहे ही गोष्ट खरी आहे परंतु ही एकच आत्महत्या झालेली आहे. राज्यामध्ये इतर ठिकाणी अशा आत्महत्या झालेल्या नाहीत. परंतु हेही खरे आहे की, ग्राम शिक्षण समिती आणि सरपंच यांच्याबाबतीत पैसे घेण्याच्या संदर्भात सातत्याने तक्रारी येत आहेत. यामध्ये दोघांना अटक झालेली आहे.

प्रा. शरद पाटील : ज्या तक्रारी येत आहेत त्याबाबत शासन काय करणार आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : संघटनेची अशी मागणी आहे की, मुख्याध्यापकांना या कामातून बाजूला करावे. सर्व शिक्षा अभियानाच्या बाबतीत केंद्र शासनाची जी मार्गदर्शक तत्वे आहेत त्यामध्ये ते आहे. याबाबत काय करावयाचे यासंदर्भात आपल्या शिक्षण विभागाचे प्रधान सचिव श्री. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात येईल आणि त्या समितीचा अहवाल आल्यानंतर मुख्याध्यापकांना बाजूला करण्याबाबत निश्चितपणे विचार करण्यात येईल.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, शिक्षकांना बांधकामाचे काम देणे योग्य नाही. आधीच त्यांच्याकडे 38 कामे आहेत. त्यांच्याकडील ही 38 कामे कमी केलेली नाहीत आणि पुन्हा त्यांच्याकडे बांधकाम करण्याचे काम दिलेले आहे. इतके पैसे दिल्यानंतर सुध्दा श्री. ठाकरे यांनी आत्महत्या केली. त्यामध्ये कनिष्ठ अभियंता श्री. शहाडे, गवंडी श्री. फुणे आणि गट शिक्षण अधिकारी श्री. मंगल मेश्राम यांनी एकमत करुन त्यांच्यावर दबाव आणला की, पैसे काढून आम्हाला त्यातील काही हिस्सा दिला तरच आम्ही काम करु असे दडपण आणल्यामुळे त्यांनी आत्महत्या केली.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 16:40

(श्री. वसंतराव खोटरे...

माझा प्रश्न असा आहे की, या तिघांना ताबडतोबीने निलंबित करुन त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल काय ? निवेदनामध्ये "कै. ठाकरे यांच्या कुटुंबियांना कुंटुंब निवृत्तीवेतन दरमहा रुपये 5,438 व उपदान रु. 2,50,000/- मंजूर केले आहेत" असे नमूद केलेले आहे. हे त्यांचेच पैसे त्यांना दिलेले आहेत. हे पैसे देऊन शासनाने काही उपकार केलेले नाहीत. माझा प्रश्न असा आहे की, ज्याप्रमाणे शेतक-यांनी आत्महत्या केल्यानंतर त्यांच्या कुटुंबियांना 1 लाख रुपये मदत दिली जाते त्याप्रमाणे या आत्महत्या केलेल्या मुख्याध्यापकाच्या कुटुंबियांना शासन 1 लाख रुपये मदत देईल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : मी मुख्याध्यापकांचे पत्र वाचून दाखवितो. .."सविनय विनंती, एसएसअे मार्फत मिळालेली रक्कम 13,500/- ही सर्व खर्च झाली आहे. बांधकाम ठेकेदार, कनिष्ठ अभियंता श्री. शहाडे व संबंधित बांधकाम गवंडी श्री. रामदास फुणे यांच्यामुळे ते काम थांबलेले आहे.." (अडथळा).. त्यांनी पैसे मागितले असे चिठ्ठीमध्ये लिहिलेले नाही.

श्री. वसंतराव खोटरे : मुख्याध्यापकाने आत्महत्या केलेली आहे...

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी वस्तुस्थिती सांगत आहे. मुख्याध्यापकानी आत्महत्या केली ही दुर्दैवी घटना आहे. त्यांनी खर्च लिहून ठेवलेला आहे. त्यामध्ये सिमेंटची पोती पहिल्यांदा ज्यादा आणली होती ती पडून होती. इंजिनिअरने देखील सिमेंटची पोती ज्यादा आणलेली आहेत, असे म्हटलेले होते. ही सिमेंटची ज्यादा पोती आणली नसती तर आत्महत्या झाली नसती. ते खूप भावनाप्रधान होते. खोल्यांचे बांधकाम थांबल्यामुळे कारवाई होईल असे त्यांना वाटले आणि त्यामुळे त्यांनी आत्महत्या केली.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : माननीय मंत्री महोदय आपले काम केन्द्राकडे ढकलत आहेत. सर्व शिक्षा अभियानाच्या संदर्भातील मार्गदर्शिका माझ्याकडे आहे. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांनी एक कमिटी नेमलेली आहे. त्या कमिटीमध्ये सरपंच हा अध्यक्ष असतो आणि मुख्याध्यापक हा सचिव असतो. परंतु त्यांच्यावर बीईओचे वर्चस्व असते. तेव्हा हे माती, दगड, गोठा जमा करण्याचे काम मुख्याध्यापकाकडे न देण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय ?

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सन्माननीय सदस्य सांगतात ही वस्तुस्थिती नाही. आपल्याला पाहिजे तशा खोल्या बांधून घेता याव्यात यासाठी मुख्याध्यापक ग्राम शिक्षण समितीमध्ये असणे आवश्यक आहे असेही काहींचे म्हणणे आहे...(अडथळा)...

श्री. शिवाजीराव पाटील : शिक्षक हा बांधकामातील तज्ज्ञ नाही. या बांधकामाच्या संदर्भातील जबाबदारी शिक्षकांवर का टाकलेली आहे ? गुजरात राज्यामध्ये सर्व शिक्षा अभियानांतर्गत कामे एकत्रितपणे मोठ्या ठेकेदाराला दिली जातात. महाराष्ट्रामध्ये अशी कामे मोठ्या ठेकेदाराकडे दिली जातील काय ?

श्री. हसन मुश्रीफ : याबाबतीत शिक्षण विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमण्यात येईल. परंतु मी सांगू इच्छितो की, मुख्याध्यापक हे चांगले काम करीत आहे असा अनुभव आहे.

---

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेख</u>**

**पृ.शी.** : राज्यात कुपोषणामुळे वाढत असलेले बालमृत्युचे प्रमाण.

**मु.शी.**: राज्यात कुपोषणामुळे वाढत असलेले बालमृत्युचे प्रमाण याबाबत श्री.संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, गेल्या वर्षभरात 3650 बालकांचा कुपोषणाने मृत्यू झाल्याने उत्तर महाराष्ट्रात अक्षरश: मेळघाटसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. जळगाव जिल्हयात 864 बालमृत्यू झाले असून नाशिक, नंदूरबार, धुळे आणि नगर जिल्हयांमध्ये तब्बल 8 हजार कुपोषित बालके मृत्यूशी झुंज देत आहेत. विशेष म्हणजे ही खळबळजनक आकडेवारी दडपण्याचा शासकीय यंत्रणा प्रयत्न करीत आहेत. नंदूरबारमध्ये 1422 व धुळयात 864 तर जळगावात 104 आणि नगरमध्ये 195 बालमृत्यू झालेले आहेत. जिल्हा परिषदेच्या आरोग्य आणि महिला बालविकास या दोन विभागाच्या माध्यमातून अनेक उपक्रम राबविले जात असताना कुपोषणग्रस्त बालकांची संख्या कमी होत नाही असे नाशिक विभागाच्या आयुक्तांनी नेमलेल्या तपासणी पथकाच्या पाचही जिल्हयांच्या अहवालावरुन स्पष्ट झाले आहे. मातृत्व अनुदान यासारख्या योजनेवर कोट्यावधी रुपयांचा खर्च होऊनही हे अनुदान लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नसल्याच्या तक्रारी शासनाकडे करण्यात आल्या आहेत. राज्याच्या अर्थसंकल्पात आदिवासींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात म्हणजेच 9.27 टक्के इतकी आर्थिक तरतूद आदिवासी विभागासाठी केली असताना दुसरीकडे आदिवासींमधील कुपोषणाचे प्रमाण कमी झालेले नाही. नाशिक विभागाच्या आयुक्तांनी उत्तर महाराष्ट्रातील कुपोषणास आळा घालण्यात प्रशासकीय यंत्रणेला अपयश आल्याची कबुली दिली असल्याने जनतेत खळबळ उडाली आहे. शासन जर मोठ्या प्रमाणात कुपोषणाच्या योजनांवर निधी खर्च करीत असेल तर त्याचा असर दिसून आला पाहिजे. अन्यथा योजना कागदावरच राहिल्या आहेत असे स्पष्ट होते. कुपोषणासारख्या अत्यंत गंभीर व राज्यात ठिकठिकाणी सतत घडत असणा-या या संवेदनशील विषयावर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी विशेष उल्लेख सादर करीत आहे.

-------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित केलेल्या मुद्यांना नेहमी वाटाण्याच्या अक्षता लावल्या जातात. मंत्रीमहोदयांनी मुद्दा मांडल्यानंतर नियम 101(इ) प्रमाणे त्वरित तोंडी उत्तर दिले पाहिजे व एका महिन्यात लेखी उत्तर पाठविले पाहिजे. परंतु सभागृहात कोणत्याही प्रकारचे उत्तर दिले जात नाही हे मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.** : गोरेगाव येथील आरे दुग्ध वसाहतीतील मोकळी जमीन विकण्याचा होत असलेला प्रयत्न.

**मु.शी.** : गोरेगाव येथील आरे दुग्ध वसाहतीतील मोकळी जमीन विकण्याचा होत असलेला प्रयत्न याबाबत श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, गोरेगाव येथील आरे कॉलनी नावाची शासकीय दुग्धशाळा असणे, या आरे दुग्धशाळेची स्थापना 1967 साली झाली. या दुग्धयोजनेमागे दुग्ध व्यवसायवाढीला चालना मिळावी हा शासनाचा उद्देश होता. परंतु दुग्धशाळेतील यंत्रसामुग्री जुनी होऊ लागली तसा त्याचा परिणाम उत्पन्नावर होऊ लागला व हा शासकीय व्यवसाय तोट्यात जात असल्याचे शासनाकडून सांगण्यात येऊ लागले. हा दुग्ध व्यवसाय बंद करुन शासन दुग्धशाळेच्या कर्मचाऱ्यांच्या व कॉलनीत असणाऱ्या झोपड्यांच्या विकासाचे कारण पुढे करुन एस.आर.ए.स्कीमच्या अंतर्गत बिल्डरना आणून आरे कॉलनीचा हा हरीत पट्टा विकण्याच्या मार्गावर आहे. हा संपूर्ण परिसर ना विकास क्षेत्रात येत असून गैरव्यवहार करण्यात येत आहे. सदर जमीन बिल्डरना विकून त्यावर बिल्डर टोलेगंज टॉवर बांधतील व मुंबई राहिलेला एकमेव हरितपट्टा संपून जाण्याची भिती निर्माण झाली आहे. यामुळे मुंबईतील जनतेच्या मनात निर्माण झालेला असंतोष व संतापाची भावना, सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो मी विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, गोरेगाव येथे आरे कॉलनीच्या सुमारे 6500 हेक्टर जमिनीवर बड्या बिल्डरांचा डोळा असून अत्यंत पध्दतशीरपणे ही जागा हडप करण्याचा त्याठिकाणी कट रचला जात आहे. यामध्ये बिल्डर, काही उच्चपदस्थ मंत्रालयातील अधिकारी सहभागी आहेत. आरे कॉलनीची जागा मिळावी यासाठी 65 प्रस्ताव आलेले आहेत. काही दिवसांपूर्वी या सभागृहात मी हा प्रश्न उपस्थित केला असताना......................

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

दुग्धविकास मंत्री श्री. अनिस अहमद यांनी सध्यातरी कोणाला जमीन देण्याचा प्रस्ताव नाही असे सभागृहात स्पष्ट सांगितल्यानंतरही जमीन विकण्याचा घाट घातला जात आहे. गोरेगाव येथे आरेच्या सुमारे 4500 हेक्टरवर बडया बिल्डांचा डोळा असून अत्यंत पध्दतशीरपणे ही जागा हडपण्याचा कट रचला जात आहे. आरे कॉलनीत सुमारे पावणेपाच हजार झोपडयांसाठी एसआरए योजना राबविण्यासाठी शासनाच्या दुग्ध विभागाच्या परवानगी शिवाय परस्पवर झोपडयांची मोजणी सुरु झाली आहे. येथील झोपडया हटविण्यासाठी एका बिल्डरला एसआरए योजना राबविण्यासाठी गोरेगाव हायवे नजिक मोकळी जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, सदर जागा ताब्यात घेण्यसाठी संबंधित बिल्डरकडून पैसे स्वीकारण्यात आले आहेत. दुग्ध विकास विभागाने पैसही घेतले. या बिल्डरला सुमारे 1500 कोटी रुपयांचा फायदा होणार आहे. एसआरए योजनेच्या नियमा प्रमाणे झोपडया असलेल्या ठिकाणीच पुनर्वसनाची इमारत बांधणे आवश्यक असते. परंतु आरेची गोरेगाव येथील जागा ना विकास क्षेत्र तसेच हरित पट्टयात येत असल्यामळे गोरेगाव हायवे जवळील जागा बिल्डरला देण्यात आली आहे. आरे लगत असलेल्या एका हॉटेलसाठी रस्त्याची जागा देण्याचा निर्णय घेतला. सुरवातीला या हॉटेलसाठी 4500 चौ. फूट जागा करण्यात आल्यानंतर त्यांना 11,500 चौ.फूट जागा देण्याची ऑर्डर जारी करण्यात आली व प्रत्यक्ष 17,500 चौ. फुट जागा देण्यात आली. हे प्रकरण अतिशय गंभीर असल्यामुळे शासनाने आज त्यासंबंधी निवेदन करावे अशी माझी आग्रहाची मागणी आहे.

श्री. हसन मुश्रीफ : नोंद घेण्यात आली आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी 4500 चौ.फुट जागा दाखवली गेली. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे पर्यायी जागा त्या ठिकाणीच दिली पाहिजे. या जागेसाठी एकूण 65 बिल्डर समोर आले होते. या जागेची विक्री करता येत नाही. त्यामुळे या सर्व प्रकरणाची चौकशी करण्याची नितांत आवश्यकता आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सदर प्रकरणाची चौकशी करण्यात येईल.

----------

...2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : नाशिक महानगरपालिकेतील 40 उपशिक्षकांवर झालेला अन्याय.

**मु. शी.** : नाशिक महानगरपालिकेतील 40 उपशिक्षकांवर झालेला अन्याय याबाबत श्री.प्रतापराव सोनवणे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. प्रतापराव सोनवणे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचनाा दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. प्रतापराव सोनवणे ( नाशिक विभाग शिक्षक ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

नाशिक महानगरपालिकेतील शिक्षण विभागात सुमारे 7 ते 10 वर्षापासून सेवेत असलेल्या 40 उपशिक्षकांना झालेल्या अन्यायासंदर्भातील विषय मी आपल्या परवानगीने सदनासमोर मांडीत आहे.

सदर 40 शिक्षकांची नियुक्ती सन 1996 ते 1999 या कालखंडात रोजंदारी तत्वावर झालेली असून त्यांना वेळोवेळी मुदतवाढ मिळालेली आहे.

शिक्षण संचालक नाईक यांनी दि. 20 जून, 2003 अन्वये नाशिक महानगरपालिकेस सूचना देऊन शाळेतील विषयांची गरज, अनुशेष व रिक्त पदे यांचा विचार करुन सदर 40 उपशिक्षकांना सामावून घेण्याबाबत कारवाई करण्यास सांगितले.

या सूचनेवर आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी दिनांक 22 जुलै, 2004 रोजी कक्ष अधिकारी नगरविकास विभाग, मंत्रालय यांना पत्र लिहून या संदर्भात त्यांचे मार्गदर्शन मागविले. या संदर्भात नगरविकास विभागाने शासन निर्णय दि. 10 मे, 2003 प्रमाणे परिपत्रक काढले.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रतापराव सोनवणे........

त्या परिपत्रकानुसार माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी 40 शिक्षकांना महानगरपालिकेच्या सेवेत कायम स्वरुपी करण्याचे आदेश दिलेले आहेत. माननीय मंत्रिमहोदयांनी निर्णय दिल्यानंतरसुध्दा या शिक्षकांना कायम स्वरुपी सेवेत घेण्यास महानगरपालिका टाळाटाळ करीत आहे. परिणामी या संकटग्रस्ट शिक्षकांनी दिनांक 14 एप्रिल, 2005 रोजी साखळी उपोषण केले. त्याचा उपयोग झाला नाही म्हणून पुन्हा या सर्व पिडीत मंडळीं दिनांक 13 ऑक्टोबर 2006 रोजी आमरण उपोषणास बसली. त्यावेळी असत्य आश्वासन देऊन त्यांचे उपोषण मागे घ्यायला लावले आणि आजही शिक्षक मंडळी परत आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत.

या 40 शिक्षकांवर मोठा अन्याय होत असून त्यांच्यामध्ये नैराश्याची भावना तयार झालेली आहे. त्यांच्या या मानसिकतेमुळे शिक्षणाच्या दर्जावर परिणाम होत आहे. शासन एका बाजूला गुणवत्तावाढीचा, दर्जा सुधारणयाच्या गोष्टी करीत असताना प्रत्याक्षात चित्र वेगळे दिसत आहे.

या 40 शिक्षकांना तातडीने कायमस्वरुपी नियुक्ती देऊन त्यांच्यावरील अन्याय त्वरित दूर करावा अशी मी विशेष उल्लेखाद्वारे मागणी करीत आहे.

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नवी मुंबईतील बेलापूर येथे रेल्वे ओव्हर ब्रिज उभारणेबाबत

**मु. शी.** : नवी मुंबईतील बेलापूर येथे रेल्वे ओव्हर ब्रिज उभारणेबाबत श्रीमती मंदा म्हात्रे वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती ( श्री.भास्कर जाधव )** : मा-ा-ीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यां-ी एज विशेष उल्लेजाची सूच-ाा दिली आहे. त्यां-ी ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे ( विधानसभेने निवडलले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेजाची सूच-ाा मांडते.

" नवी मुंबईतील बेलापूर येथे रेल्वे क्रॉसिंग करताना रोज अपघात होत आहेत. तेथील आयकर कॉलनीतील रहिवाशांना तसेच विद्यार्थ्यांना सुध्दा रेल्वे क्रॉसिंग करुनच जावे लागते. रेल्वे लाईन क्रॉस करताना दिवसातून किमान एक-दोन जणांचा बळी जात आहे. तेव्हा माझी शासनाला विनंती आहे की, त्याठिकाणी भुयारी मार्ग करावा किंवा ओव्हर ब्रिज तरी करावा जेणेकरुन तेथील नागरिकांचा रेल्वे क्रॉसिंगचा प्रश्न सुटू शकेल.

----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : विजयदुर्ग-खारेपाटण खाडीलगत असलेल्या मुटाट येथील खार बंधाऱ्याची दुरुस्ती करणे

**मु. शी.** : विजयदुर्ग-खारेपाटण खाडीलगत असलेल्या मुटाट येथील खार बंधाऱ्याची दुरुस्ती करणे याबाबत श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा-ा-ीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यां-ी एज विशेष उल्लेजाची सूच-ा दिली आहे. त्यां-ी ती मांडावी.

श्री.परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेजाची सूच-ा मांडतो.

" विजयदुर्ग खारेपाटण या खाडीलगत असलेल्या मुटाट येथील सुमारे 18 वर्षापूर्वी बांधलेला खार बंधारा खाडीत येणाऱ्या पुरामुळे गेल्या वर्षी फुटल्याने शेतीमध्ये खारे पाणी शिरल्यामुळे जवळपास 200 शेतकऱ्यांच्या जमिनी नापिकी झालेल्या आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यात समुद्र किनारी बांधलेले सर्व खार बंधारे जीर्ण झालेले आहेत. या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी देण्याची आवश्यकता आहे. जमिनी नापिकी झाल्यामुळे तेथील शेतकऱ्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतलेला आहे. याठिकाणी मंत्रिमहोदय उपस्थित आहेत. त्यांनी या गोष्टीची दखल घ्यावी अशी माझी आपल्यामार्फत त्यांना विनंती आहे.

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सन 2007 चे वि.स.वि.क्र. 11 व सन 2005 चे वि.स.वि.क्र. 73 बाबत**

**तालिका सभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेली सन 2007 चे वि.स.वि.क्र.11 व सन 2005 चे वि.स.वि.क्र. 73 ही विधेयके आज घेण्यात येणार नाहीत...

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, वि.स.वि.क्र. 73- महाराष्ट्र मालकी हक्कांच्या सदनिकांबाबतचे विधेयक मागील दोन वर्षापासून कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात येत आहे. परंतु अद्यापपर्यंत त्या विधेयकावर चर्चा झालेली नाही. हे विधेयक चर्चेला येऊ नये म्हणून बिल्डरलॉबी प्रयत्न करीत आहे...

**तालिका सभापती** : हे विधेयक घ्यायचे नाही अशी शासनाची भूमिका नाही, फक्त आज या विधेयकावर चर्चा न होता ती उद्या होईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, बिल्डर मंडळी शासन चालवितात काय ? हे विधेयक आज का घेण्यात येत नाही ? सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी या विधेयकाला अमेंडमेंट दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सुध्दा अमेंडमेंट दिलेली आहे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, मी या विधेयकाला अमेंडमेंट दिलेली आहे त्यास सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे यांनी अनुमोदन दिलेले आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : ज्या सन्माननीय सदस्यांनी सुधारणा दिलेल्या आहेत त्या कार्यक्रमपत्रिकेवर असणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या नावाचा उल्लेख कामकाजपत्रिकेवर आलेला आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांच्या नावाचा उल्लेख कामकाजपत्रिकेवर नाही.

**तालिका सभापती** : या सभागृहामध्ये विधेयकावरील सुधारणांची कॉपी सर्क्युलेट केली जाते. त्यामुळे विधेयकाला सुधारणा देणाऱ्या सन्माननीय सदस्यांचे नाव कामकाजपत्रिकेवर येत नाही.

---------------------

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>सभागृहाच्या कामकाजाबाबत.</u>

**तालिका सभापती** : दिवसाच्या कामकाजाच्या क्रमामध्ये क्रमांक सातवर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार व अन्य सन्माननीय सदस्यांनी जो महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे तो व क्रमांक आठवर सर्वश्री मुझफ्फर हुसेन व अन्य सदस्यांनी जो महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे, या दोन्ही प्रस्तावावर आज चर्चा होणार नाही. या प्रस्तावांवर नंतर चर्चा करण्यात येईल.

आता आपण मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक स्थगित न करता नियम 92 अन्वये अर्धा-तासाच्या चर्चा विचारात घेऊ.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## अर्धातास चर्चा

**पृ. शी.** : पिंपळनेर, ता.शिरुर या गावातील जीवन प्राधिकरण कार्यालय बीडमार्फत पाणी पुरवठयाची योजना पूर्ण करणे

**मु. शी.** : पिंपळनेर, ता.शिरुर या गावातील जीवन प्राधिकरण कार्यालय बीडमार्फत पाणी पुरवठयाची योजना पूर्ण करणे यासंबंधी स-मा-ा-ीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे, वि.प.स. यां-ी उपस्थित जेलेली अर्धा-तास चर्चा.

श्रीमती उषाताई दराडे (विधानसभेने निवडलेले) : अध्यज्ञ महाराज, मी आपल्या अ-ुमती-े ि-यम 92 अ-वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित जरते :-

"पिंपळनेर (ता.शिरुर, जि.बीड) या गावासाठी जीवन प्राधिकरण कार्यालय बीड मार्फत पाणी पुरवठ्याची योजना पूर्ण केलेली असणे, परंतु ही योजना टेस्ट न करता गुत्तेदारास बील अदा करण्यात येणे, योजना पूर्ण होऊनही कार्यान्वित होत नसल्याने ग्रामस्थांना मात्र पिण्याचे पाणी उपलब्ध न होणे, पिण्याच्या पाण्याची समस्या कायमची दूर करण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, पिंपळनेर, ता.शिरुर या गावासाठी जीवन प्राधिकरण कार्यालय बीड मार्फत पाणी पुरवठयाची योजना आहे, परंतु त्यापासून पाणी मिळत नाही. यासंदर्भात मला एकच विनंती करावयाची आहे की, त्या योजनेतून पाणी मिळण्याची शक्यता नसल्यामुळे ती योजना टेस्ट झाली पाहिजे, अशी गावकऱ्यांची तक्रार आहे. त्यामुळे या योजनेचा भारत निर्माण या योजनेमध्ये समावेश करुन पाणी उपलब्ध करुन द्यावे, ही विनंती.

श्री.अजित पवार ( जलसंपदा मंत्री ) : सभापती महोदय, 10 टक्के लोकवर्गणी त्या गावाने भरली तर आम्ही त्या योजनेस महाजल किंवा जल स्वराज्यच्या माध्यमातून मंजूरी देऊन योजना करुन घेऊ.

श्रीमती उषाताई दराडे : ते गाव 10 टक्के लोकवर्गणी भरण्यास तयार आहे.

श्री.अजित पवार : 10 टक्के लोकवर्गणीतून पैसा भरण्यास ते गाव तयार असेल तर त्या योजनेस आम्ही मंजूरी देऊ.

**तालिका सभापती** : अर्धा-तास चर्चा संपली आहे.

---------

..3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : राज्यात शिक्षण सेवक योजना लागू झाल्यापासून मागासवर्गीयांच्या जागेवर अमागासवर्गीयांची नेमणूक करण्याची तरतूद रद्द होणे

**मु. शी**. : राज्यात शिक्षण सेवक योजना लागू झाल्यापासून मागासवर्गीयांच्या जागेवर अमागासवर्गीयांची नेमणूक करण्याची तरतूद रद्द होणे यासंबंधी स-मा-ा-ीय सदस्य श्री.रामनाथ मोते, वि.प.स.यां-ी उपस्थित ेलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : अध्यज महाराज, मी आपल्या अ-ुमती-े -ियम 94 अ-वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित ्रतो :-

"राज्यात शिक्षण सेवक योजना लागू झाल्यापासून मागासवर्गीयांच्या जागेवर अमागासवर्गीयांची नेमणूक करण्याची तरतूद रद्द होणे. शिक्षण सेवक योजनेनुसार मागासवर्गीय प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध न झाल्यास अप्रशिक्षित मागासवर्गीय शिक्षक नेमण्याचे बंधन आल्याने राज्यात हजारो शिक्षक अप्रशिक्षीत असणे, त्यांना डी.एड. प्रशिक्षणासाठी 3 वर्षाची मुदत देण्यात येणे. त्यामुळे डी.एड. प्रशिक्षणासाठी गेल्या 2 वर्षापासून नोटीफीकेशन न निघणे, त्यामुळे प्रशिक्षणाची सोय नसणे, प्रशिक्षण पूर्ण न झाल्याने अनेकांना सेवा मुक्ती मिळाल्याची परिस्थिती उद्‌भवणे, तरी डी.एड. पूर्ण होण्यासाठी तीन प्रयत्नात उत्तीर्ण न झाल्यास पुन्हा संधी न मिळाल्याने अनेक शिक्षकांचे जीवन उध्वस्त होण्याची वेळ येणे, त्यामुळे डी.एड. प्रशिक्षणाची सोय उपलब्ध होण्यासाठी व वाढीव संधी मिळण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

..4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

10-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) WW-4

SSP/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.अजित.. 17:00

श्री.रामनाथ मोते.....

सभापती महोदय, राज्यातील मागासवर्गीय अप्रशिक्षित शिक्षकांना पत्राद्वारे डी.एड.ची सोय होण्याच्या दृष्टीने मी याठिकाणी अर्धा-तासाची चर्चा उपस्थित केलेली आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाने सन 2006 पासून महाराष्ट्र राज्यात शिक्षण सेवक योजना लागू केली. ही योजना येण्यापूर्वी प्रशिक्षित शिक्षक मिळाले नाही किंवा मागासवर्गीय शिक्षक त्या त्या पात्रतेचे मिळाले नाहीतर डी.एड. शिक्षकांच्या जागेवर बी.एड. शिक्षक नेमण्याची तरतूद होती. त्याप्रमाणे शासनाकडून अशा डी.एड.च्या जागेवर बी.एड. शिक्षकांना मान्यता दिली जात होती. परंतु जून 2006 पासून राज्यामध्ये जी शिक्षण सेवक योजना आली, त्यामध्ये अशाप्रकारे डी.एड.च्या जागेवर बी.एड. शिक्षक नेमण्यास प्रतिबंध केलेला आहे. परिणाम: ज्या ज्या ठिकाणी डी.एड.च्या जागेवर त्या त्या ठिकाणी आरक्षणाच्या बिंदु नामावलीनुसार आरक्षित जागेवर मागासवर्गीय शिक्षक नेमण्याची तरतूद आहे. त्या त्या ठिकाणी मागासवर्गीय शिक्षक मिळाले नाही, ट्रेंड शिक्षक मिळाले नाहीतर त्या जागेवर जे शिक्षक अप्रशिक्षित आहेत अशा शिक्षकांनासुध्दा नेमण्याची तरतूद होती. सुरुवातीस दि.27 फेब्रुवारी,2003 चा जो जी.आर. आहे त्यामध्ये मॉडिफीकेशन करण्यात आले. न्यायालयाच्या निर्णयानुसार दि.13 ऑक्टोबर,2000 ला शासनाने जी.आर. काढला. त्या जी.आर.मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, "अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती या संवर्गातील प्रशिक्षित उमेदवारांची नावे जिल्हा समाजकल्याण अधिकारी, अन्य संस्था यांच्या कार्यालयाकडून मागविण्यात यावीत व प्रशिक्षित उमेदवार उपलब्ध नसल्याची पूर्ण खात्री झ ााल्यानंतरच शिक्षणाधिकारी यांनी संस्थेने केलेल्या अप्रशिक्षित शिक्षकांच्या नियुक्तीस मान्यता द्यावी."

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ......

राखीव जागेवर प्रशिक्षित शिक्षक मिळाले नाही तर अप्रशिक्षित शिक्षक नेमण्याची शासनाने तरतूद केलेली आहे. परंतु या शिक्षकांच्या संदर्भात पुढील क्लॉज असे टाकण्यात आले आहे की, प्रत्येक वेळी अप्रशिक्षित उमेदवारांना दुसऱ्यांदा किंवा त्यानंतर पुढील प्रत्येक वेळी नियुक्ती देताना त्या वेळीही त्या संवर्गातील प्रशिक्षित उमेदवार उपलब्ध नाही याची खात्री करुन घ्यावी . प्रशिक्षित उमेदवार असतील तर प्रशिक्षित उमेदवारास नियुक्ती द्यावी असे म्हटले आहे. प्रशिक्षित उमेदवार मिळाले नाही आणि पुन्हा अप्रशिक्षित शिक्षकांनाच पुढे नियमित केले जाते. यामुळे शिक्षण सेवकांना साधारणतः तीन वर्षापर्यंत काम करता येते. याच अटीवर या अप्रशिक्षित मागासवर्गीय शिक्षकांना शासनाकडून नियुक्ती करण्यात येते. शिक्षण सेवक योजनेनुसार मागासवर्गीय प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध न झाल्यास अप्रशिक्षित मागासवर्गीय शिक्षक नेमण्याचे बंधन घालण्यात आले आहे. तसेच या अप्रशिक्षित शिक्षकांनी 3 वर्षाच्या कालावधीमध्ये स्वखर्चाने व स्वप्रयत्नाने प्रशैक्षणिक अर्हता प्राप्त केली पाहिजे. त्यांनी विहित कालावधीत प्रशैक्षणिक अर्हता प्राप्त केली नाही तर त्यांना नियमित सेवेमध्ये सामावून घेतले जाणार नाही व पुनर्नियुक्तीवर अशा उमेदवारांचा हक्क राहणार नाही.

सभापती महोदय, यामध्ये अशी अडचण निर्माण झालेली आहे की, सन 2000 पासून महाराष्ट्रामध्ये शिक्षण योजनेनुसार अनेक मागासवर्गीय अप्रशिक्षित शिक्षक प्राथमिक शाळेमध्ये, जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये, माध्यमिक शाळेमध्ये नेमलेले आहेत. या शिक्षकांना पत्राद्वारे डी.एड.चे प्रशिक्षण पूर्ण करण्याची सोय उपलब्ध करुन देणे ही महाराष्ट्र शासनाची जबाबदारी आहे. गेल्या 3 वर्षामध्ये महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणाची सोय करणे, त्यांचे डी.एडचे नोटीफिकेशन काढणे ही सर्व महाराष्ट्र स्टेट एक्झाम काउन्सिल या संस्थेची जबाबदारी आहे. महाराष्ट्र स्टेट एक्झाम काउन्सिल या संस्थेकडून दोन ते तीन वर्षामध्ये नोटीफिकेशन निघाले नाही. शासनाने शैक्षणिक सोयी न केल्यामुळे या शिक्षकांना प्रशिक्षण पूर्ण करता आलेले नाही. त्याचा परिणाम असा झाला आहे की, एका बाजूला 3 वर्ष आणि जास्तीत जास्त पुन्हा एक वर्ष असे एकूण 4 वर्षामध्ये डी.एड चे प्रशिक्षण पूर्ण झाले नाही तर या सर्व मागासवर्गीय शिक्षकांना नोकरीतून

...2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ......

बाहेर पडावे लागणार आहे. सभापती महोदय, या शिक्षकांचा कोणत्याही प्रकारचा दोष नाही. त्यांचा दोष एवढाच आहे की, ते शिक्षक मागासवर्गीय आहेत. शासनाने अप्रशिक्षित शिक्षकांच्या डी.एडच्या प्रशिक्षणाची सोय केलेली नाही आणि त्यामुळे अप्रशिक्षित शिक्षकांचे प्रशिक्षण होऊ शकले नाही. शिक्षण सेवक म्हणून या शिक्षकांना मिळालेली संधी त्यांना गमवावी लागली आहे. म्हणून या सर्व शिक्षकांना डी.एडच्या प्रशिक्षणाची सोय शासनाने करुन देणे अत्यंत आवश्यक आहे. सभापती महोदय, या चर्चेच्या माध्यमातून माझा पहिला प्रश्न संबंधित मंत्रीमहोदयांना असा आहे की, सर्व मागासवर्गीय अप्रशिक्षित शिक्षकांना डी.एड पत्राद्वारे पूर्ण करण्याची संधी किती दिवसामध्ये उपलब्ध करुन देणार आहात ? आणि जे मागासवर्गीय शिक्षक आजही अप्रशिक्षित आहेत त्यांच्याकडे शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे या शिक्षकांचे प्रशिक्षण होऊ शकलेले नाही. या सर्व मागासवर्गीय शिक्षकांना सरकार संरक्षण देणार आहे का ?

मध्यंतरी शासनाने एक जी.आर. काढला होता. त्या अनुषंगाने महाराष्ट्र स्टेट कौन्सिलने दिनांक 11.5.2004 रोजी एक परिपत्रक काढले होते. त्यानुसार या परीक्षेस जे विद्यार्थी बसतात, त्यांना पहिल्यांदा परीक्षेस बसल्यानंतर दोनदा संधी मिळते.

यानंतर श्री. रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(**सभापतीस्थानी तालिका सभापती**, **श्री.उल्हास पवार**)

श्री.रामनाथ मोते..........

काही विद्यार्थी कौटुंबिक अडचणीमुळे, आजारपणामुळे काही विषयांच्या परीक्षेला बसू शकत नाहीत. अपरिहार्य कारणामुळे परीक्षेला मुकावे लागले तर त्यांना पुन्हा परीक्षेला बसण्यासाठी दोन वेळा संधी मिळते. पहिली संधी आणि त्यानंतर दोन संधी अशा प्रकारची मर्यादा शासनाने घातली आहे. हा प्रोफेशनल कोर्स आहे, उमेदवारांनी आपल्या जीवनाचा मार्ग निवडलेला आहे, शिक्षक होण्यासाठीच डी.एड.प्रशिक्षण आहे. त्यामुळे अशा या परीक्षेत ते अपयशी ठरले तर दोन वेळा परीक्षेची संधी मिळेल नंतर मात्र डी.एड.च्या परीक्षेला बसता येणार नाही, अशा प्रकारचे जे बंधन शासनाने घातले आहे ते निश्चितपणे अन्यायकारक आहे. हजारो, लाखो रुपयांचे डोनेशन देणारा हा डी.एड.प्रशिक्षणार्थी सेवेपासून वंचित राहू शकतो. त्यामुळे शासनाने घातलेले हे बंधन काढून टाकण्यात येईल का ?

सभापती महोदय, त्याचप्रमाणे मर्यादित स्वरुपाची संधी देण्याबाबतचा जो शासन निर्णय सन 2004 मध्ये निर्गमित करण्यात आला आहे तो शासनाला पूर्वलक्षी प्रभावाने अंमलात आणता येणार नाही. जे विद्यार्थी सन 2004 पूर्वी परीक्षेला बसलेले होते त्यांच्याबाबत हा शासन निर्णय लागू करता येणार नाही. त्यामुळे हा शासन निर्णय या उमेदवारांना लागू करु नये, अशी माझी विनंती आहे.

----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, दिनांक 10 मार्च 2002 रोजी शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थातील मान्यताप्राप्त अनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकांऐवजी शिक्षण सेवक योजना सुरु केली. या योजनेबाबत उच्च न्यायालयाने आणि सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी सुधारणा केली व त्याप्रमाणे शासनाने काही बदलही केले. राज्यात शिक्षण सेवक योजना लागू झाल्यापासून मागासवर्गीयांच्या जागेवर अमागासवर्गीयांची नेमणूक करण्याची तरतूद रद्द केली आहे. डी.एड.प्रशिक्षित नसेल तर नंतर पत्राव्दारा डी.एड.पूर्ण करण्याची सवलत शासनाने दिली होती. यामध्ये शिक्षण सेवक पदावर नियुक्ती करण्यासाठी विमुक्त जाती, विमुक्त जमाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग किंवा इतर प्रशिक्षित उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर त्या जातीच्या बारावी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची गुणवत्तेवर आणि काही अटी व शर्तीवर नियुक्ती केली जात होती. नंतर त्यांनी डी.एड.प्रशिक्षण पत्राव्दारा तीन वर्षाच्या कालावधीत पूर्ण करावे, अशी शासनाची अपेक्षा होती. जे या तीन वर्षात उत्तीर्ण होणार नाहीत अशा अप्रशिक्षित शिक्षण सेवकांना जास्तीत जास्त एक वर्ष मुदतवाढ देण्यात येत होती व जे उत्तीर्ण झाले नाहीत किंवा होणार नाहीत त्यांची सेवा समाप्त करीत होतो. हे खरे आहे की, सन 2001 पासून एनसीआरटीमार्फत प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली जात होती ती सन 2005-06 पर्यन्त बंद झाली. ज्या शिक्षकांना डी.एड.अर्हता प्राप्त झाली नाही त्यांना पत्राव्दारा डी.एड.करता येणार नाही, त्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती या उमेदवारांवर, शिक्षकांवर अन्याय झाला आहे, हे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. म्हणून सन 2005-2006, 2006-2007 या वर्षामध्ये पत्राव्दारा डी.एड.प्रशिक्षणासाठी प्रवेश देण्यात आला होता व ज्या अप्रशिक्षित शिक्षकांची तीन वर्षे पूर्ण होत आहे, अशा शिक्षकांना प्रवेश देण्याचे ठरले आहे. पत्राव्दारा प्रवेश देण्याचा निर्णय सन 2002, 2003 व 2004 मध्ये घेण्यात आला होता. तसेच सन 2004-2005 मध्ये प्रवेश देण्यात आला होता. त्याप्रमाणे सन 2007-2008 या वर्षात असा प्रवेश देण्याचा शासन विचार करीत आहे आणि तसा प्रवेश देणार आहोत.

यानंतर कुमारी जयश्री.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ......

नवीन अभ्यासक्रमामुळे डी.एडच्या परीक्षेमध्ये नापास झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील दोन वर्ष परीक्षेला बसता येते, अशा विद्यार्थ्यांना शासनास संधी देण्यास काही हरकत नाही, त्यांच्याकरिता शासन मुदतवाढ देऊन संधी वाढविणार आहे. पत्राद्वारे प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना किंवा अप्रशिक्षित शिक्षकांना डी.एडच्या परीक्षेला बसण्याच्या चार संधी मिळूनही जर ते उत्तीर्ण झाले नाहीत तरच त्यांची सेवा समाप्त केली जाईल, असा शासनाने निर्णय घेतलेला आहे. शासन ही पत्राद्वारे प्रशिक्षण घेण्याची योजना पुन्हा सुरु करणार आहे व त्याला मुदतवाढही देणार आहे. पत्राद्वारे प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना व अप्रशिक्षित शिक्षण सेवक यांना डी.एड.च्या परीक्षेला चार वेळा बसण्याची संधी मिळूनही जर ते नापास झाले तर त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल, असा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी उल्लेख केल्याप्रमाणे 3345 जे अप्रशिक्षित उमेदवार नियुक्त केलेले आहेत ते एकूण 4674 अप्रशिक्षित उमेदवारांपैकी नियुक्त केलेले आहेत. हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासनाने आता पावले उचललेली आहेत. जे मागासवर्गीय,भटक्या जातीतील,विमुक्त जमातीतील लोकांना देखील डी.एड. होण्याची संधी उपलब्ध करुन दिलेली आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी मी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो मागासवर्गीय शिक्षकांच्या संदर्भातील आहे. अनट्रेन्ड शिक्षक म्हणून जे आज काम करीत आहेत, त्यांना अल्पसे का होईना पण शासनाकडून वेतन प्राप्त होत आहे, या शिक्षकांचे कुटुंब चालू आहे. ज्या शिक्षकांची चार वर्षापेक्षाही अधिक सेवा झालेली आहे त्यांना अजूनही डी.एड.च्या परीक्षेला बसण्याची संधी मिळालेली नाही व त्यापैकी काही शिक्षक आता घरी बसलेले आहेत व काही घरी बसण्याच्या मार्गावर आहेत आणि म्हणून मी माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारला होता की, या सगळया शिक्षकांना ज्यांना ज्यांना आपण मान्यता दिलेली आहे ,जे जे मागासवर्गीय आहेत ते आपल्या प्रशिक्षणाच्या यादीमध्ये समावेश करुन घेण्यासाठी जे प्रतिक्षा करीत आहेत, ज्यांचा यामध्ये काही दोष नाही त्यांचा म्हणजे या सर्व मागासवर्गीय अप्रशिक्षित शिक्षकांना चार वर्षापेक्षा अधिक सेवा झालेली असली तरी सुध्दा आपण या शिक्षकांना संरक्षण देणार आहात की नाही ? हा सगळयात महत्वाचा प्रश्न आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सन 2005 -2006 व सन 2006 - 2007 या वर्षामध्ये पत्राद्वारे प्रशिक्षण योजनेद्वारे अनेक विद्यार्थ्यांना व अप्रशिक्षित शिक्षकांना प्रवेश देण्यात आलेला होता. ज्या अप्रशिक्षित



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ......

शिक्षकांची तीन वर्ष सेवा पूर्ण झालेली आहे, अशा शिक्षकांना शासन मुदतवाढ देणार आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, शिक्षण सेवक की भरती होने के बाद उनकी तीन साल की सेवा होने के बाद अगर वे डी.एड. करते हैं तो शासन निर्णयानुसार उन्हें परमानेंट किया जाता है. लेकिन कल इस सदन में जो विधेयक पेश किया गया था, उसमें यह प्रावधान है कि अगर शिक्षक की पर्फॉर्मन्स अच्छी नहीं होगी तो उस शिक्षक को परमानेंट नहीं किया जाएगा. इस प्रावधान का शासन कहीं भी उपयोग नहीं कर रहा है. अगर इस प्रावधान का उपयोग हो रहा है तो मैं यह जानना चाहती हूं कि पर्फॉर्मन्स अच्छा न होने की वजह से आज तक कितने शिक्षकों को परमानेंट नहीं किया गया है और वे कौनसे निकष है जिनके आधार पर पर्फॉर्मन्स ठहराया जाता है ? अगर पहली क्लास का शिक्षक है तो विषय की जानकारी वह अपने क्वालिफिकेशन के आधार पर दे सकता है लेकिन शिक्षक को तो रोज रोज पर्फॉर्मन्स देना जरुरी है और शिक्षक का पर्फॉर्मन्स अच्छा है या नहीं, वह बच्चों के पर्फॉर्मन्स से ही सिध्द हो सकता है. इसलिए मैं यह जानना चाहती हूं कि पर्फॉर्मन्स सिध्द करने के लिए कौन कौन से निकष निश्चित किए गए हैं ? यह बहुत अहम समस्या है क्योंकि शिक्षा का दर्जा घसरता जा रहा है.

श्री हसन मुश्रीफ : सभापति महोदय, पर्फॉर्मन्स अच्छा न होने की वजह से कितने शिक्षकों को निकाला गया है, इसकी जानकारी अभी मेरे पास नहीं है. मैं वह जानकारी पटल पर रखूंगा. लेकिन कल जो विधेयक यहां पेश किया गया था, उस विधेयक में यह प्रावधान है कि तीन साल की सेवा के बाद वह शिक्षक हो जाएगा. उसे पर्फॉर्मन्स दिखाने की जरुरत नहीं होगी.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मैंने पर्फॉर्मन्स संबंधी निकष की जानकारी मांगी है वह नहीं मिली.

तालिका सभापति : आपने मांगी हुई जानकारी इस अर्धा तास सूचना से ताल्लुक नहीं रखती है. वह अलग प्रश्न है. आपने जो सवाल उठाया है, वह सवाल आप बाद में दूसरे माध्यम से उठाए.

आता ही अर्धा तास चर्चा संपलेली आहे.

यानंतर श्री.बोरले......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण तालुक्यात खेर्डी-गाणे, खडपोली या एम.आय.डी.सी. भागात बंद असलेले कारखाने.

**मु. शी**. : रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण तालुक्यात खेर्डी-गाणे, खडपोली या एम.आय.डी.सी. भागात बंद असलेले कारखाने यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यां-ी उपस्थित जेलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.भास्कर जाधव (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अ-ुमती-े -ियम 92 अ-वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित जरतो :-

"रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यात खेर्डी-गाणे, खडपोली या एमआयडीसी भागात बंद असलेले कारखाने व सुमारे 17.09 हेक्टर (42.72 एकर) जागेवर फूडपार्क, रेडीमेंड गारमेंट, फिश प्रोसेसिंग, युनिट उभारण्याचा निर्णय घेऊन त्यास मान्यता देण्यात आली. परंतु तेथील वाढती बेकारी, एमआयडीसीमुळे ज्यांच्या जमिनी शासनाने घेतल्या आहेत त्यांना रोजगार मिळण्याबाबत तसेच कोकणात तयार होणाऱ्या काजू, आंबा, कोकम इत्यादी फळांवर प्रक्रिया करण्याबाबत शासनाने सदर विविध उद्योग सुरु करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, मी सन 2006 च्या पावसाळी अधिवेशनामध्ये प्रश्नोत्तराच्या माध्यमातून शासनाला असा प्रश्न विचारला होता की, कोकणामध्ये तीन औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात आली आहेत. त्या ठिकाणी कोकण फूड पार्क झोन स्थापन करण्यात येईल काय ? तेथील कारखाने बंद पडलेले आहेत. जे प्लॉट्स तयार करण्यात आले होते, ते व्यावसायिकांनी घेतलेले नाहीत. काही लोकांनी ते विक्रीसाठी घेतलेले आहेत. त्या प्लॉट्सच्या विक्रीचे व्यवहार सुरु झाले आहेत. शासन ते प्लॉट्स ताब्यात घेऊन त्या ठिकाणी फूड पार्क झोन स्थापन करील काय ? त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी आम्ही यासंदर्भात समिती गठित करु. त्या समितीच्या माध्यमातून माहिती गोळा करु आणि लवकरच त्या ठिकाणी फूड पार्क झोन घोषित करु, निर्णय घेऊ, विकसित करु असे सकारात्मक उत्तर दिले होते. त्याच वेळी मी माननीय मंत्री महोदयांना दुसरा प्रश्न विचारला होता की, त्या इंडस्ट्रीयल एरियातील जमीन पडिक आहे. तेथे इन्फ्रास्ट्रक्चर तयार आहे, डांबरी रस्ते तयार केलेले आहेत, ऑफिसेस आहेत. ज्या ठिकाणी कोयना नदीचे 88 टी.एम.सी. पाणी वाया जाते त्या ठिकाणी कोयना नदीच्या तीरावर इंडस्ट्रीयल एरिया विकसित केला गेला

..2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव .........

आहे. मुंबईतील गिरण्या बंद पडलेल्या आहेत. पूर्वी कोकणातील माणसे मुंबईतील गिरण्यांमध्ये काम करीत होती. कापड कशा पद्धतीने तयार करावे, याचा त्यांना अनुभव आहे. इंडस्ट्रीयल एरियामध्ये जागा, पाणी, रस्ते तयार असल्याकारणाने कोकणातील बेकारी दूर करण्यासाठी त्यांच्या अनुभवाचा फायदा घेऊन शासनाला त्या ठिकाणी रेडीमेट गारमेंट पार्क स्थापन करता येईल काय ? त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होत की, आम्ही फूड पार्क झोन स्थापन करु. परंतु रेडीमेट गारमेंट संदर्भात मला तज्ज्ञांकडून माहिती घ्यावी लागेल. ती माहिती घेतल्यानंतर त्यासंदर्भात भाष्य करता येईल, असे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते. त्याच वेळी मी माननीय मंत्री महोदयांना दुसरा प्रश्न विचारला होता की, कोकणाला 720 किलोमीटर लांबीचा समुद्र किनारा लाभलेला आहे. कोकणामध्ये मासेमारीचा व्यवसाय मोठया प्रमाणावर होतो. कोकणातील मासे बाहेर विकले जातात. त्या ठिकाणी छोटे-छोटे प्रोसेसिंग युनिट नाहीत. चिपळून येथे खेर्डी-गाणे, लोटे परशूरामसारख्या एम.आय.डी.सी. आहेत. खेर्डी एम.आय.डी.सी.ची स्वत:च्या मालकीची 81 हेक्टर जमीन आहे. त्यामध्ये 185 भूखंड पाडले गेले आहेत.

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव......

त्यापैकी 141 भूखंड वितरीत झाले. तेथे 1971 साली पहिला कारखाना स्थापन झाला, अशा पध्दतीने तेथे एमआयडीसी आणण्याचा प्रयत्न झाला. तेव्हापासून आतापर्यंत 62 लोकांनी तेथे कारखाने सुरु केलेले आहेत, परंतु आता त्यापैकी 30-32 कारखाने बंद पडले आहे, त्यामुळे तेथील परिसर रिकामा झालेला आहे.

सभापती महोदय, गाणे या गावामध्ये एमआयडीसीची 76 हेक्टर जमीन आहे. या ठिकाणी 1979 साली पहिला कारखाना सुरु झाला, 182 भूखंड निर्माण केले गेले, त्यापैकी 116 भूखंडाचे वाटप झाले, फक्त 53 लोकांनी कारखाने सुरु केले, त्यापैकी जवळपास 23 कारखाने बंद पडले असून बाकीचे सुरु आहेत. त्यामुळे त्या परिसरातही मोठया प्रमाणावर जागा मोकळी झालेली आहे.

सभापती महोदय, लोटे परशुराम येथे एमआयडीसी आहे. तेथे 519.40 हेक्टर जमीन शासनाने संपादीत केलेली आहे, ही पूर्ण जागा एमआयडीसीच्या ताब्यात आहे. एमआयडीसी परीसरात असलेल्या 23 कि.मी. रस्त्यांपैकी 18 कि.मी. रस्त्याचे डांबरीकरण झालेले आहे. येथील 519.40 हेक्टर जागेवर शासनाने 445 भूखंड तयार केलेले आहेत, त्यापैकी 343 भूखंडाचे वाटप झालेले आहे. या एमआयडीसी परीसरात पहिला कारखाना 1981 साली सुरु झाला आहे. याप्रमाणे एकूण 150 कारखाने या परीसरात सुरु झाले, परंतु आज त्यापैकी 69 कारखाने बंद आहेत, बाकीचे कारखाने जेमतेम चालू आहेत. या एमआयडीसी परीसरातही मोठया प्रमाणावर जागा मोकळी झालेली आहे. येथे सर्व इन्फ्रास्ट्रक्चर तयार आहे, पाण्याचाही तोटा नाही. एमआयडीसी परीसरामध्ये पाणी पुरवठयाची लाईन सर्वत्र फिरविलेली आहे. अशा प्रकारे इन्फ्रास्ट्रक्चर तयार असताना शासनाने त्याचा वापर कोकणातील बेकारी दूर करण्यासाठी केला पाहिजे, तसे शासनाचे धोरण असले पाहिजे. शासनाने फुड पार्क झोन तयार करण्याची घोषणा केलेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे शासनाने याकरिता एक समिती स्थापन केलेली आहे. या समितीची यादी माझ्याकडे आहे. एमआयडीसीचा प्रश्न मी बऱ्याच वेळा उपस्थित केलेला आहे. मला या समितीमध्ये बोलावले असते तर कदाचित या कामाला अधिक गती मिळाली असती. या समितीमध्ये विविध अधिकारी आहेत, त्यांच्यामार्फत कामकाज केले जात आहे, त्याबद्दल मला वाईट वाटायचे कारण नाही.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MHM/

श्री.भास्कर जाधव......

सभापती महोदय, शासनाने हा परिसर फुड पार्क झोन म्हणून जाहीर केलेला आहे परंतु तेथे कोणते कारखाने आणणार आहात ? हे आम्हाला सांगितले पाहिजे. जे कारखाने येणार आहेत, ते सध्या कोणत्या स्टेजला आहे ? हे आम्हाला कळाले पाहिजे. या ठिकाणी फिश प्रोसेसिंग युनिट आणावे अशी माझी आग्रहाची मागणी आहे. कारण तेथे मासे मिळतात, मोठया प्रमाणावर पाणी उपलब्ध आहे, बर्फाचे कारखाने उपलब्ध आहेत. याबाबत मी विचारु इच्छितो की, या वर्षी फिश प्रोसेसिंग युनिट आणण्यासाठी शासन कोणते प्रयत्न करणार आहे ?

सभापती महोदय, मुंबईत कापड गिरण्या मोठया प्रमाणावर बंद पडलेल्या आहेत, बंद कापड गिरण्यातील कामगारांचा उपयोग कोकणातील रेडीमेड गारमेंट व्यवसायात केला जाऊ शकतो. शासन गिरणी कामगारांचा उपयोग रेडीमेड गारमेंट व्यवसायात करणार का ? याबाबत माहिती घेऊन मंत्री महोदयांनी उत्तर दिले पाहिजे. तसेच मी उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या बाबतीत शासनाने कोणती प्रगती केलेली आहे, याचीही माहिती मंत्री महोदयांनी दिली पाहिजे.

--------------

नंतर श्री.सुबंरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, याच सभागृहामध्ये यापूर्वी खेर्डी-गाणे-खडपोली या एमआयडीसी एरियाच्या संबंधात चर्चा उपस्थित केली होती तेव्हा आश्वासन दिल्यानुसार आपण ग्लोबल अॅग्रोसिस्टिम प्रायव्हेट लिमिटेड या दिल्लीस्थित सल्लागार कंपनीकडे तेथे फूडपार्क स्थापन करण्याच्यादृष्टीने माहिती गोळा करण्याचे काम दिले होते. त्यांचा प्रकल्प अहवाल काही दिवसापूर्वीच मिळाला आहे. याबाबतीत त्यांचे म्हणणे असे आहे की, यासाठी किमान 54 हेक्टर जमीन लागेल आणि 27 कोटी रूपयापर्यंत या प्रकल्पाची किंमत होईल. अशा प्रकारचा अहवाल त्यांनी सादर केलेला आहे. परंतु या स्पेसिफिक एमआयडीसी एरियामध्ये 17-18 हेक्टरपेक्षा अधिक जागा नसल्यामुळे आजूबाजूकडील 54 हेक्टर जागा मिळते काय हे आम्ही पाहत आहोत आणि त्या दृष्टीने एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना आपण सूचना दिलेल्या आहेत. सभापती महोदय, पुढील काळामध्ये फूडपार्क, मग तेथे आंबा तसेच इतर शेती मालावर प्रोसेसिंग असेल वा माशांवर प्रोसेसिंग असेल असे उद्योग त्या फूडपार्कमध्ये आणण्याचा विचार आपण करू शकू तसेच त्यासाठी खास सवलती देण्याचा देखील आपण प्रयत्न करू. सभापती महोदय, 2006 च्या आपल्या औद्योगिक धोरणामध्ये असे आपण ठरविले आहे की, एखादे क्लस्टर वन स्टेप अप करावयाचे. म्हणजे हा भाग सध्या सी झोन मध्ये आहे त्यामुळे त्याला एक स्टेप पुढील म्हणजेच डी झोन मधील सवलती वा फायदे मिळू शकतील. त्यात इलेक्ट्रिसिटी, स्टॅम्पड्युटी एक्झम्प्शन, क्वालिटी सर्टिफिकेशन वगैरे देखील मिळू शकतील. पैकी क्वालिटी सर्टिफिकेशन घ्यायचे असेल तर 50 टक्के खर्च आपण करतो. या प्रकारे केल्यानंतर मला खात्री आहे की, बाहेरचे उद्योग येथे येऊ शकतील. सभापती महोदय, खरे म्हणजे एकदा हा प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर तेथील लोकप्रतिनिधींना एकत्र आणून त्यांच्याशी याबाबत चर्चा करणे गरजेचे आहे आणि त्या दृष्टीने जरूर त्यांची एक बैठक घेण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे तेथे इन्फ्रास्ट्रक्चर तयार आहे पण असे असले तरी तेथे उद्योग आणण्यासाठी लोकप्रतिनिधींची फार मोठी गरज भासणार आहे. त्यामुळे आपण त्यांना आवर्जून बोलावून, त्यांना तेथील परिस्थिती दाखवून आणावे लागणार आहे. तेथे रेडीमेड गार्मेंट उद्योग आणण्याच्या दृष्टीने जागा उपलब्ध असल्याने विचार करणे शक्य आहे. त्यापूर्वी यासाठी कोणी इच्छुक असतील अशा लोकांना पुढे यावे लागेल आणि मग अशा लोकांची एक बैठक घेऊन येथे खरोखरी अशा प्रकारचे टेक्स्टाईल पार्क म्हणून केंद्र सरकारची जी योजना आहे त्या योजनेंतर्गत कोणाला युनिट टाकावयाचे असेल तर एमआयडीसीच्या माध्यमातून

....... 3सी 2 ...

श्री.राणा जगजितसिंह पाटील .....

जास्तीत जास्त मदत आपल्याला करता येईल. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी असाही विषय येथे मांडला आहे की, तेथील बरेच उद्योग बंद झाले आहेत त्यामुळे तेथे त्यांची जागा मोकळी झालेली आहे. परंतु अशा जागा परत मिळविण्यासाठी एमआयडीसीच्या दृष्टीने सोयीचे राहत नाही. कारण त्या जागांवर बँकांचे कर्ज असल्याने त्या जागा गहाण असतात. परंतु त्या भागात नवीन जागा आहे किंवा काय, जेणे करून तेथे फूड पार्क वा रेडीमेड गार्मेंटस् सारखे उद्योग येऊ शकतील, यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत. परंतु फूड पार्कसाठी 54 हेक्टर जागा लागणार आहे आणि पुढील महिनाभरामध्ये यासाठी सर्व्हे करून कोठली जागा योग्य राहील याचा निर्णय आपण घेऊ. त्यासाठी तेथील लोकप्रतिनिधींचे देखील सहकार्य घेतले जाईल आणि त्याबाबत कारवाई करून आराखडा तयार करू.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आम्ही या संदर्भात येथे 6-7 महिन्यांपूर्वी प्रश्न उपस्थित केला होता तेव्हा माननीय राज्यमंत्री महोदय नवीन होते आणि त्यामुळे त्यांनी लगेच याबाबत 'होय' म्हटले होते. परंतु आता या वेळी मात्र त्यांनी अतिशय सावधगिरीने उत्तर दिले आहे. आता ते म्हणताहेत की, यासाठी 54 हेक्टर जागा असायला पाहिजे. परंतु माझ्या माहितीप्रमाणे गाणे-खडपोली येथील एमआयडीसी मध्ये 76 हेक्टर जागा एमआयडीसीच्या ताब्यात आहे आणि त्यामध्ये जवळपास 182 भूखंड तयार झाले असून त्यातील जवळपास 129 भूखंड पूर्णपणे मोकळे आहेत शिवाय तेथे असलेल्या 53 मधील 23 कारखाने सध्या बंद आहेत. दुसरे असे की, जी समिती या संबंधात शासनाच्या वतीने नेमलेली आहे त्या समितीचा अहवाल शासनाकडे आलेला आहे, माननीय राज्यमंत्र्यांपर्यंत कदाचित तो आला नसेल, पण माझ्या माहिती प्रमाणे समितीने शासनाला अहवाल दिलला आहे आणि त्यात त्यांनी स्पष्ट म्हटलेले आहे की, या ठिकाणी फूड पार्क झोन होण्यासाठी आवश्यक ती सर्व जमीन आपल्या ताब्यात आहे. तो अहवाल माननीय राज्यमंत्र्यांच्या कदाचित नजरेस आलेला नसेल वा आणला गेला नसेल पण मी येथे जबाबदारीने माहिती देत असल्याने त्याचा आधार घेऊन आपण याची माहिती घ्यावी आणि तशा पद्धतीची आवश्यक जागा आपल्याला तेथे मिळत असेल वा मिळाली असेल तर तेथे फूड पार्क झोन वा फिश प्रोसेसिंग युनिट सुरू करण्याच्या दृष्टीने आपण कारवाई करणार आहात का ?

( यानंतर श्री. सरफरे .... 3डी 1 ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, माझ्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार साधारणपणे 17 हेक्टर मोकळी जमीन शिल्लक आहे. त्यामध्ये खेर्डी-गाणे, खडपोली या दोन गावांचा समावेश आहे. या संदर्भात शासनाकडे दोन प्रकारचे अहवाल प्राप्त झाले आहेत. यापैकी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील एका समितीमध्ये तेथील स्थानिक आमदारांचा समावेश होता. त्याचबरोबर त्यामध्ये व्ही.आय.टी. चे जनरल मॅनेजर, एम.आय.डी.सी. चे एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर होते. त्यांनी त्याठिकाणी फूड पार्क करावयास हरकत नाही अशाप्रकारची शक्यता वर्तविली. असून समितीने आपल्या अहवालात तो म्हटले आहे. परंतु ग्लोबल ॲग्रोसिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड कंपनी ही फूड पार्क स्थापन करण्याकरिता कन्सल्टन्सी म्हणून काम करते. या कंपनीने आवर्जून सांगितले आहे की, फूड पार्क करण्याकरिता 54 हेक्टर जमीन आवश्यक आहे. इतकी जमीन मिळण्यामध्ये अडचण नाही. ही जमीन कुठे घ्यावयाची यासंबंधी एक महिन्यात निर्णय घेण्यात येईल. शासनाने त्याठिकाणी फूड पार्क करावयाचे ठरविले असल्यामुळे त्याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. याकरिता त्या भागातील लोकप्रतिनिधी आणि आमदार महोदयांबरोबर एक बैठक घेऊन दोन ते तीन महिन्यात कोणत्या स्टेप्स घ्यावयाच्या याबाबत कालबध्द कार्यक्रम ठरवून त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात येईल.

**तालिका सभापती** : अर्धा-तास चर्चा संपली आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: रोजंदारीवरील वन कामगारांना सेवेत कायम करणे

**मु.शी.**: रोजंदारीवरील वन कामगारांना सेवेत कायम करणे यासंबंधी डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करते.

"महाराष्ट्रातील 1500 रोजंदारी वन कामगारांना कायम करण्याबाबत शासनाने 1996 मध्ये सलग पाच वर्षे व 240 दिवस भरलेल्या कामगारांना सेवेत कायम करण्याचे तत्वत: मान्य केले त्यानुसार मुख्यमंत्री, वने मंत्री यांच्या समवेत कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या झालेल्या वेळोवेळी बैठका, त्यानंतर शासनाने घाणेकर समितीच्या अहवालानुसार मानदंडाप्रमाणे कायम करण्यासाठी किती रोजंदारी कामगार वन विभागात आवश्यक आहेत, त्यानुसार वन विभागाने शासनाला सुमारे 1500 रोजंदारी वन कामगारांचा सादर केलेला प्रस्ताव, सदर प्रस्तावाला वित्तीय मान्यता देण्यासाठी वन विभागाने तो वित्त विभागाकडे पाठवून तो तसाच पडून असल्याने वन मजूरात निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची लाट, सदर प्रस्ताव तातडीने मंजूर करण्यास अक्षम्य विलंब झाल्याने तेथील कामगारांनी सुरु केलेले संप, आंदोलने, याबाबत शासनाची भूमिका व शासनाने करावयाची उपाययोजना".

सभापती महोदय, अनेक वर्षापासून दुर्लक्षित असलेल्या या प्रश्नाची माहिती मंत्रिमहोदयांना चांगल्या प्रकारे आहे असे मला वाटते. या संदर्भात राज्य सरकारी वन कामगार सुविधा मंच यांच्या वतीने महाराष्ट्र शासनाला अनेक निवेदने देण्यात आली आहेत. आपण एका बाजूला वन संपत्तीचा संकोच होत आहे, वनांवर आक्रमण होत आहे असे नेहमी म्हणत असतो. आणि दुसऱ्या बाजूला या वनांची व्यवस्था बघण्यासाठी त्यांची निगराणी करण्यासाठी नेमण्यात आलेले वन मजूर अतिशय वाईट अवस्थेमध्ये रोजंदारीवर काम करीत आहेत ही वस्तुस्थिती आहे. औरंगाबाद येथील उप वन संरक्षक यांच्या कार्यालयामध्ये रोजंदारीवर असलेल्या एका मजूराने वेळेवर पगार होत नसल्यामुळे विष प्राशन करुन आत्महत्त्या करण्याचा प्रयत्न केला. सोलापूर जिल्हयातील मोहोळ तालुक्यातील हिवरे गावातील दत्तू श्रीमंत कोळी याने 15 वर्षे मजूर म्हणून काम केल्यानंतर त्याला कायम न केल्यामुळे वन मंत्री व वन उपसंरक्षक, सोलापूर यांच्या नावाने चिठ्ठी लिहून आत्महत्त्या केली. या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

दोन्ही घटनांमध्ये वन मजुरांची मागणी सारखी आहे. 31 जानेवारी 1996 रोजी शासनाने 5 वर्षे सलग सेवा केलेल्या व 240 दिवस भरलेल्या 11 हजार 438 वन मजुरांना कायम करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर वेळोवेळी माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे व वनमंत्री माननीय श्री. बबनराव पाचपुते यांच्याबरोबर महत्वाची बैठक झाली. आज वस्तुस्थिती अशी आहे की, साडे नऊ हजार वन कामगार आहेत. त्यांच्यापैकी 1994 पूर्वीचे नजर चुकीने राहिलेले 3200 वन कामगार व 1994 नंतरचे परंतु 30 जून 2000 पर्यंत पात्र असलेले 4550 वन मजूर व वन विकास महामंडळाचे 1750 मजूर असे मिळून साडे नऊ हजार वन कामगार रोजंदारीवर काम करतात. राज्य सरकारी वन कामगार सुविधा मंच, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अध्यक्ष श्री. बबनराव जाधव आहेत. मी महिलांच्या विविध प्रश्नांबाबत काम करीत असले तरी औपचारीक अध्यक्षा म्हणून त्यांनी माझ्यावर जबाबदारी सोपविली आहे. त्यांच्या मनामध्ये नैराश्य आहे. या प्रश्नाकरिता बैठकामागून बैठका होतात, परंतु सरकार सारखी कारणे सांगत आहे. वित्त विभागाकडे प्रस्ताव प्रलंबित आहे असे सांगितले जाते. त्या प्रस्तावाचे पुढे काय झाले? त्याबाबत निर्णय कां होत नाही? यामध्ये खरे तर वन विभागाबरोबर माननीय अर्थमंत्री सुध्दा जबाबदार आहेत. याकरिता मी ही अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)**

या प्रश्नाचा पाठपुरावा झाला नाही तर चर्चेमागून चर्चा होतात परंतु त्यामधून काही निष्पन्न होत नाही ही वस्तुस्थिती आहे. दुसरे असे की, कोणत्याही रोजंदारीवरील कामगारांना कायम करीत असतांना ते शासनावर बंधनकारक नाही असे कोर्टाचे म्हणणे अनेक वेळा सांगितले जाते.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (पुढे सुरु...

कर्नाटक राज्यामध्ये उमादेवी प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे कोणत्याही रोजंदारी कामगारांना कायम करणे हे शासनावर बंधनकारक नसल्याचा मुद्दा उपस्थित केला. त्यामध्ये पूर्वलक्षी प्रभाव नाही व महाराष्ट्र शासनाने अगोदरच रोजंदारी वन मजुरांना कायम करण्याचे तत्व मान्य करून प्रस्ताव मागविलेला असल्यामुळे तो निर्णय लागू होत नाही. मला वाटते या खेरीज वन विभागाकडून रेकॉर्डच्या संदर्भात खूप हेळसांड झालेली आहे. अनेक वन विभागामधून वन मजुरांची माहिती पाठवितांना मस्टरसारखे रेकॉर्ड नष्ट करण्यात आलेले असल्याचे खूप पात्र वन मजुरांवर अन्याय झालेला आहे. धुळे वन विभागात रेकॉर्ड रुमला 2004 मध्ये आग लागून मस्टर नष्ट झाले. सातारा वन विभागात उप वनसंरक्षकांच्या परवानगीशिवाय मस्टरचे जुने रेकॉर्ड गोडोली नर्सरीमध्ये जाळून नष्ट करण्यात आले. प्रत्येक गोष्टींची रेकॉर्डवर 100 टक्के नोंदी केलेल्या नाहीत. आज 50 टक्के वन मजूर 50 वर्षापर्यन्त पोहोचलेले आहेत. ते लवकरच निवृत्त होतील. अशा परिस्थितीत 9500 वन मजुरांच्या प्रश्नावर शासनाने कोणता निर्णय घेण्याचे ठरविलेले आहे ? वनमंत्र्यांनी घाणेकर समिती नेमली. त्यांच्या माफदंडाप्रमाणे रोजंदारी वनमजुरांचे प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे प्रलंबित आहेत. माननीय वनमंत्री श्री.बबनराव पाचपुते यांच्या अध्यक्षतेखाली मार्च 2005 मध्ये समिती नेमलेली होती. दोन वर्षामध्ये या संदर्भात कोणता निर्णय झाला, हे चित्र स्पष्ट झालेले नाही. म्हणून ही अर्धातासाची चर्चा उपस्थित करीत आहे. एका बाजूला राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करतो आहोत. किती वन कामगार कायम होण्यास पात्र आहेत, याबद्दलचा कोणताही निर्णय केलेला नाही. घाणेकर समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यात राजकीय इच्छा शक्ती नाही. वन कामगारांची सेवानिवृत्ती होण्यापर्यन्त शासन वाट पहाणार आहे काय ? आमची शिवसेनेची भारतीय कामगार सेना प्रणित संघटना आहे, त्याचप्रमाणे वन कामगारांच्या बाबतीत सर्व पक्षांशी संबंधित युनियन्स आहेत. अशी संघटना उभी करणे किती कष्टप्रद आहे, याची मला कल्पना आहे. राज्यभर पसरलेल्या वन कामागरांची सघटना करणे सोपे नाही. अशा वेळेला या संघटित झालेल्या लोकांमध्ये जर न्यूसन्स व्हॅल्यू नसेल, ते जर दगडफेक करणारे नसतील तर त्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करावे असे नाही. लोकशाही आणि विकासाचे अधिकार या दृष्टीकोनातून वन कामगारांना कायम करून घ्यावे, अशाप्रकारची अर्धा-तासाच्या माध्यमातून चर्चा उपस्थित करीत आहे. धन्यवाद.

---

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रविशेठ पाटील (वन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम ताई गोऱ्हे यांनी वन कामगारांच्या प्रश्नाबाबत अर्धा-तासाची चर्चा उपस्थित केलेली आहे. त्यांना मला सांगितले पाहिजे की, हा गरिबांचा महत्वाचा प्रश्न आहे. या सदर्भाने विधी व न्याय विभागाचा अभिप्राय मागविला होता. विधी व न्याय विभागाने असे सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा विचार करता, सदरहू कामगारांना नियमित करणे उचित ठरणार नाही. त्यांनी अभिप्राय दिला म्हणून ही अडचण निर्माण झाली. तरीसुध्दा काही सघटनांनी रोजंदारी कामगांच्या बाबतीत निर्णय घेण्याबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांना निवेदने दिलेली आहेत. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक 13-08-2004 रोजी एक बैठक बोलाविली. या बैठकीमध्ये असे ठरले की, सुप्रीम कोर्टाच्या आदेशाप्रमाणे आपल्याला वागले पाहिजे. परंतु याबाबतीत काही तोडगा काढावा म्हणून वन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 7 एप्रिलला समिती गठीत केली. दिनांक 1-11-1994 ते 30-06-2004 पर्यन्त तुटक पध्दतीने ज्या कामगारांचा पाच वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला आहे, त्यांचा विचार केला पाहिजे. यातून कसा मार्ग काढता येईल...

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविशेठ पाटील ...

या कामगारांचा प्रश्न कसा सोडवावा यादृष्टीने आमची कार्यवाही चालू आहे. ही कमिटी गठीत झाल्यानंतर ए.उमराणी व्हर्सेस रजिस्ट्रार तामिळनाडू या प्रकरणी कोर्टाचा निकाल आलेला आहे. त्या निकालामध्ये असे सांगितले आहे की, या रोजंदारी कामगारांना कायम करणे उचित ठरणार नाही. त्यामुळे आमच्यापुढे प्रश्न निर्माण झाला. परंतु हा प्रश्न कसा सोडवावा याबाबतीत घाणेकर समिती गठीत केली आहे. त्या समितीचा अहवाल आलेला आहे. तो अहवाल वित्त विभागाकडे पाठविलेला आहे. वित्त विभागाकडून त्यांचे अभिप्राय घेण्यात येतील. रोजंदारी कामगारांना लवकरात लवकर न्याय मिळावा अशा पध्दतीने हा प्रश्न सोडवला जाईल.

श्री. धोंडीराम राठोड : सभापती महोदय, आपण दररोज वर्तमानपत्रामध्ये वाचतो तसेच दूरदर्शनवर ऐकतो की, वन कामगार कमी असल्यामुळे वृक्षतोड होत आहे आणि ज्याला आपण वन म्हणतो त्याला आता वन म्हणण्यासारखी परिस्थिती राहिलेली नाही. लाखो वृक्षांची जी कत्तल होत आहे त्याला वन कामगार नसणे हेच मुख्य कारण असताना तांत्रिक मुद्यावर किंवा हायकोर्टाच्या निकालाकडे बोट दाखवून वन कामगार नेमावयाचे नाहीत किंवा रोजंदारीवर असलेल्या कामगारांना कायम करावयाचे नाही काय ? शासनाला दोन्ही बाजूने कसे बोलता येईल ? आपल्याला वन सांभाळावयाचे असेल, पर्यावरणाचा प्रश्न सोडवावयाचा असेल तर या रोजंदारी कामगारांना कायम केलेच पाहिजे परंतु अधिकचे वन कामगार सुध्दा नेमले पाहिजेत. तरच वनाचे रक्षण होणार. यासंदर्भात शासन काय उपाययोजना करणार आहे ?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे विचारले त्यासंदर्भात शासनाची सकारात्मक भूमिका आहे. त्या गरिबांना न्याय मिळाला पाहिजे. परंतु ए. उमराणी व्हर्सेस रजिस्ट्रार तामिळनाडू यांच्या बाबतीत जो निकाल आला त्या निकालामध्ये पाठीमागच्या दरवाज्यातून रोजंदारी कामगारांना कायम करता येणार नाही असा निकाल आल्यामुळे अडचण निर्माण झाली. त्यामुळे त्यांना घेता आले नाही.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. मी सुध्दा अनेक वेळा याबाबत चर्चा केलेली आहे. केवळ एकच नव्हे तर विविध संघटना एकत्र आल्या. श्री. बबनराव जाधव मलाही भेटले. तीन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. उल्हास पवार .....

चार वर्षे रोजंदारीवर काम केल्यानंतर हलाखीच्या परिस्थितीमध्ये असलेले 9 हजार पेक्षा अधिक कामगार महाराष्ट्रामध्ये आहेत. नवीन भरती करताना सुध्दा या रोजंदारी कामगारांचा विचार झाला नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर, सन्माननीय वन मंत्र्यांबरोबर तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांबरोबर अनेक बैठका घेतल्या. माननीय राज्यमंत्री श्री. पाटील साहेबांनी उत्तर देत असताना सुप्रीम कोर्ट आणि इतर कोर्टाच्या निकालाचा आधार घेतलेला आहे. शासनाची भूमिका सकारात्मक असल्याचे जरी माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले असले तरी या कामगारांना न्याय केव्हा मिळणार ? कोर्टाच्या निकालानंतर या गोष्टीमध्ये काही बदल करता येईल काय किंवा काही पर्याय शोधता येईल काय यादृष्टीने शासनाने विचार केला आहे काय ? 9 हजार पेक्षा जास्त कामगार आहेत. त्यांचे सर्व कुटुंबीय बेवारस झाल्यासारखे झालेले आहेत. यामध्ये खूप काळ गेलेला आहे. यासंदर्भात खूप चर्चा झाल्या, खूप बैठका झाल्या. शिष्टमंडळ भेटल्यानंतर माननीय वन मंत्र्यांनी आमच्यासमोर आश्वासन दिले परंतु त्यानंतर काहीही झालेले नाही. त्यादृष्टीने माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे.

**तालिका सभापती** ( श्री. रामनाथ मोते ) : आणखी एक दोन सन्माननीय सदस्य प्रश्न विचारतील आणि त्यानंतर माननीय मंत्रिमहोदय एकत्रित उत्तर देतील.

प्रा. शरद पाटील : माननीय मंत्रिमहोदयांनी घाणेकर समितीचा हवाला दिलेला आहे. हा प्रश्न वर्षानुवर्षे रेंगाळलेला आहे. निरनिराळ्या संघटनांनी हा विषय हाताळलेला आहे. वन दिनाच्या निमित्ताने हिंद मजदूर पंचायत समितीच्या वतीने पुण्यामध्ये आमचे वन कामगार नेते श्री. प्रकाश शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन झाले होते. अशी आंदोलने करुन देखील न्याय मिळाला नाही. त्यामुळे हे वन कामगार आत्महत्या करण्याच्या मन:स्थितीत आले आहेत. घाणेकर समितीचा अहवाल शासनाला केव्हा प्राप्त झाला ? त्यांच्या शिफारशी काय आहेत आणि त्यासंबंधी शासन केव्हा निर्णय घेणार ?

श्री. मधुकर चव्हाण : अनेकवेळा या ठिकाणी न्यायालयाच्या निवाड्याचा आधार दिला जातो. माननीय मंत्रिमहोदयांनी आताही तसा उल्लेख केला. जर न्यायालयाचा निवाडा जनतेच्या हिताचा नसेल तर केंद्र सरकारकडे जाऊन कायद्यात बदल करा असे सांगणार की नाही ?

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 17:50

(श्री. मधुकर चव्हाण...)

सभापती महोदय, मी राजकीय अभिनिवेषाने बोलत नाही. पण आपण सामान्य माणसासाठी आहोत हे विसरता कामा नये. आयुष्यभर काम करुन देखील या मजुरांना कोणत्याही प्रकारचे फायदे उदा.प्रॉव्हीडण्ट फंड, ग्रच्युईटी इत्यादी मिळत नाहीत. मग हे सरकार आपल्या नागरिकांचा विचार करणार आहे की नाही ? हा विषय केन्द्राशी संबंधित आहे असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. आपणास मंत्रिपद मिळावे यासाठी आपण आपल्या नेत्यांकडे जाता ना ? मग हा प्रश्न केन्द्राशी संबंधित असल्याने केन्द्रामध्ये जाऊन या प्रश्नाची सोडवणूक मंत्री महोदयांनी करायला पाहिजे. मंत्री महोदयांच्या टेबलावर महत्वाच्या विषयाच्या आणि धोरणात्मक बाबीसंबंधातील फाईल्स वॉच केसेस म्हणून असतात. त्याबाबतीत त्यांनी तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता असते. तेव्हा या प्रश्नाच्या बाबतीत मंत्री महोदय केन्द्राला शिफारस करुन कायद्यामध्ये बदल करणार आहेत की आपल्या नागरिकांना गुलामासारखे वागवणार आहेत ?

श्री. रविशेठ पाटील : सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील आणि श्री. मधुकर चव्हाण यांनी केलेल्या सूचनांचे मी स्वागत करतो. राज्याचे ॲडव्होकेट जनरल यांचा सल्ला घेऊन हा प्रश्न निकाली काढण्याच्या बाबतीत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

डॉ. नीलम गो-हे : मंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांच्या प्रश्नाला उत्तर दिलेले नाही. घाणेकर समितीच्या शिफारशी काय आहेत हे देखील मंत्री महोदयांनी सांगितलेले नाही. आपण केवळ सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय विचारात घेतला तर घाणेकर समितीच्या शिफारशींना काही अर्थ राहाणार नाही. जॉईण्ट फॉरेस्ट प्रोग्रॅमसाठी पैसे आलेले आहेत. पर्यावरणवादी संघटना देखील विविध माघ्यमातून निधी गोळा करीत असतात. हे पर्यावरण संतुलनाचे काम चांगल्या पध्दतीने होणे आवश्यक आहे. या वन मजुरांच्या बाबतीत वित्त विभागाच्या मर्यादा काय आहेत, घाणेकर समितीच्या शिफारशी कोठे कोठे लागू पडतील, कोणकोणत्या बाबीमध्ये सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाची बाधा येऊ शकेल, या सर्व प्रश्नांच्या बाबतीत तपशीलवार उत्तर माननीय मंत्री महोदयांकडून अपेक्षित आहे.

श्री. रविशेठ पाटील : घाणेकर समितीचा अहवाल सहा-सात महिन्यापूर्वी प्राप्त झालेला आहे. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाच्या संबंधात काय करता येईल याबाबतीत ॲडव्होकेट जनरल यांचा सल्ला घेऊन या प्रकरणी लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल्.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : घाणेकर समितीच्या शिफारशी काय आहेत हे आम्हाला समजलेले नाही. या प्रकरणी किती कालावधीत निर्णय घेण्यात येईल ?

श्री. धोंडीराम राठोड : आणखी काही दिवस हा प्रश्न प्रलंबित ठेवला तर राज्यामध्ये वन शिल्लक राहाणार नाही आणि राज्य शासनाला वन कामगार आणि वन रक्षक नेमण्याची गरज राहाणार नाही ?

श्री. रविशेठ पाटील : पुढील अधिवेशनापर्यन्त निर्णय कसा होईल याची तत्परता आम्ही घेऊ एवढेच आश्वासन मी देत आहे.

**तालिका सभापती** : अर्धा-तास चर्चा संपली आहे.

--

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मराठवाड्यातील गोदावरी नदीच्या महापुरातील पूरग्रस्त शेतकरी आत्महत्येच्या मन:स्थितीत असल्याबाबत

**मु.शी.**: "मराठवाड्यातील गोदावरी नदीच्या महापुरातील पूरग्रस्त शेतकरी आत्महत्येच्या मन:स्थितीत असल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 24844 ला दिनांक 15 मार्च 2007 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, "मराठवाड्यात गोदावरीय नदीच्या महापुरातील पूरग्रस्त शेतकरी आत्महत्येच्या मन:स्थितीत असल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 24844ला दिनांक 15 मार्च 2007 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून अतिशय महत्वाचा आणि मराठवाड्याच्या अस्मितेचा प्रश्न उपस्थित करण्याची आपण मला संधी दिली त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. गेल्या ऑगस्ट महिन्यामध्ये म्हणजे 4 ते 11 ऑगस्ट पर्यन्त मराठवाड्यामध्ये एक सरकार-निर्मित पूर आला. नाशिक येथे पाऊस पडला आणि नाशिकला आलेल्या पुराचे नियंत्रण आणि नियोजन योग्य पध्दतीने केले गेले नाही. नाशिकचे पाणी नाथसागरामध्ये येण्यासाठी 48 तास लागतात .....

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MHM/ 17:55

श्री.श्रीकांत जोशी..........

आणि नाथसागर किंवा पैठणचे पाणी गंगाखेडला जायला 72 तास लागतात. पाच दिवस शासनाच्या हातात होते. असे असताना मराठवाड्यात एक थेंब पाऊस पडला नसताना नाशिक परिसरात पडलेल्या पावसाच्या पुराचे नियंत्रण न केल्यामुळे, साठवण क्षमतेचे नियंत्रण न केल्यामुळे नाशिकमध्ये 80 टक्के धरणे भरुन ठेवावयाची असताना 98 टक्के भरली. 7 धरणे जायकवाडीच्या क्षेत्रामध्ये आहेत. त्यामध्ये पालखेड, गंगापूर वगैरे धरणांचा समावेश आहे. 98 टक्के धरणे भरली. जसजसा जोरात पाऊस आला आणि सगळ्या धरणांचे एकाच वेळी दरवाजे उघडले गेले. जायकवाडी धरण 85 टक्केपर्यंत भरले असते तरी चालले असते. ते धरण 95 टक्के भरले. त्याचा परिणाम असा झाला की, गोदाकाठच्या 400 गावांमध्ये वरुन पाऊस नसताना खाली नदीतून पाणी आले. तेथील हजारो लोक वाहून गेले, घरे वाहून गेली, जनावरे वाहून गेली, शेती वाहून गेली. शेतामध्ये वाळूचे ढिग आले. मी आपल्याकडे कागदपत्रे दिली आहेत. लोकांना हेच समजत नव्हते की, पाऊस नाही आणि गावात प्रचंड पाणी कसे वाढत आहे? जवळजवळ 15 ते 20 लाख लोकांना आठ दिवस विस्थापित व्हावे लागले. 7-8 दिवस जिथे मोकळी जमीन आहे तिथे जाऊन लोकांना राहावे लागले. अगणित नुकसान झाले. ते नुकसान मोजण्यासाठी पंचनामे नीट केले नाहीत. नुकसानभरपाई देण्याच्या दृष्टीने शासनाने म्हणावा तसा प्रयत्न केला नाही. याचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी हॅलिकॉप्टरद्वारे हवाई पाहणी केली. पालकमंत्र्यांनी बैठक घेण्यामध्ये म्हणावे तितके गांभीर्य दाखविले नाही. 31 ऑगस्टला सन्माननीय श्री.गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वाखाली गोदा परिक्रमाचे आयोजन करण्यासाठी आम्ही 400 पैकी 187 गावांना भेटी दिल्या. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण तेथे एका कार्यक्रमाला आले होते. त्यांना त्या गावांमध्ये जायला रस्ता नव्हता. ज्या पध्दतीने लोक रहात होते ते बघितल्यानंतर काळजाचा थरकाप उडावा अशी परिस्थिती होती. गावात गेलो, तेथे वृध्द महिलेने रस्त्यात गाड्याचा ताफा अडविला आणि एका मिनिटात मी कशी राहते ते बघायला चला म्हणून विनंती केली. तिची परिस्थिती बघायला गेल्यानंतर रस्त्यामध्ये दोन बांबू आणि त्यावर निळे प्लॅस्टिक टाकून ती रहात होती असे दिसून आले. तिने सांगितले की, माझी तरुण मुलगी गर्भवती आहे. याठिकाणी आम्ही रोज सापांच्या सान्निध्यात रहात आहोत. तिथे साप सळसळ करीत होते. असे असताना महिला पुरुष तेथे रहात होते. या संदर्भात माझा पहिला मुद्दा असा आहे की, नाशिककरांच्या पाण्याच्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MHM/ 17:55

श्री.श्रीकांत जोशी..........

हव्यासापोटी पाटबंधारे धरणांचे पाणी साठविण्याचे निकष ठरलेले असताना ऑगस्ट महिन्यात धरणामध्ये 85 टक्क्याऐवजी अधिक पाणी साठविले गेले हा सरकारचा पहिला दोष आहे. एकाच वेळी सर्व धरणातून पाणी सोडण्याचा निर्णय घेतला हा दुसरा दोष आहे. किमान तहसीलदार, नायब तहसीलदार किंवा वर्ग.2 चा अधिकारी नेमून महसूल विभागाने त्या त्या गावात यंत्रणा पोहोचविणे आवश्यक होते. स्वयंसेवी संस्था पोहोचल्या, सर्व पक्षांचे सामाजिक कार्यकर्ते पोहोचले. भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस पक्ष पोहोचले. पण प्रशासन पोहोचले नाही. आपदग्रस्तांना मदत मिळाली नाही. अन्नधान्य मिळाले नाही. 8-8 दिवस उपाशी राहावे लागले. वेळ असेल तर या परिस्थितीचे चित्रण केलेली सी.डी., फोटो, 25 हजार लोकांची निवेदने आजही भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात उपलब्ध आहे ते प्रत्यक्ष पाहता येईल. एक-एक जणानी दिलेले निवेदन आणि आम्ही 16 दिवसात काढलेल्या 200 व्हिडिओ कॅसेट पाहिल्यानंतर प्रत्यक्ष परिस्थिती काय होती हे लक्षात येईल. तहसीलदार यांनी तलाठी व ग्रामसेवक यांना पाठविले. त्यांनी भ्रष्टाचार केला. पंचनामा केला नाही. छोट्या छोट्या रंजक गोष्टींचे सुंदर चित्रीकरण झालेले आहे. मराठवाड्यात चप्पू नावाचा एक प्रकार असतो. फायबरचा वापर करुन तो तयार केला जातो. वाहून जाणाऱ्या हजारो लोकांना कोळ्यांच्या मुलांनी वाचविले. स्वत:चे जीव धोक्यात घालून 6-6 माणसांना अडकलेल्या गावातून सुरक्षित ठिकाणी नेले. ज्यांना कुठेही जाता येणे शक्य नाही अशा 50-60 वर्षांच्या वृध्द गृहस्थांना चप्पूवर ठेवून सुखरुप ठिकाणी नेले. अनेक चप्पू वाहून गेले. त्या कोळ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या चप्पूबाबत मदत केली नाही. ते म्हणतात, आम्ही लोकांना वाचविले ही आमची चूक झाली. आतपर्यंत 80 टक्के गावांमध्ये कोळी लोकांना मदत मिळाली नाही.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

10-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 3I-1

SGJ/ MHM/ KGS/ प्रथम श्री. भोगले.. 18:00

श्री. श्रीकांत जोशी .....

ही माझ्या जिल्हापरषिदेच्या निवडणूकीची वस्तुस्थिती आहे. या ठिकाणी ज्या पध्दतीने पंचनामे करण्यात आलेले आहेत त्यालाच माझा विरोध आहे. या ठिकाणी जे पंचनामे झालेले आहेत त्यामध्ये सरकार सपशेल अपयशी ठरले आहे. या ठिकाणी तहसिलदारांच्या माध्यमातून जे पंचनामे झालेले आहेत त्यामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार आणि अकार्यक्षमता झालेली आहे. या ठिकाणी पूर नियंत्रण मंत्री महोदय उपस्थित नाही. या ठिकाणच्या पूरग्रस्तांना आपण कशा प्रकारे मदत करणार आहात त्याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी देण्याची आवश्यकता आहे. एखाद्या गावात पाणी शिरल्यानंतर त्या ठिकाणच्या लोकांना 24 तासात राहत देण्याची जबाबदारी शासनाची आहे. परंतु या ठिकाणच्या लोकांना रॉकेल, टेंट, अन्न पुरवण्याची व्यवस्था करण्यात आली नाही. आपला जो डिझास्टर मॅनेजमेंट आहे तो फक्त पुस्तकात आहे की काय असे आता आम्हाला वाटू लागले आहे. प्रत्येक कलेक्टरला आपण डिझास्टर मॅनेजमेंटच्या अन्तर्गत किती निधी दिलेला आहे ? अशी परिस्थिती उद्‌भवली तर कलेक्टर पुरग्रस्तांना कशा प्रकारे मदत करु शकेल, टेंट उपलब्ध करुन देऊ शकेल, त्यासाठी जो काही निधी लागणार आहे, असा निधी आपण कलेक्टरांना किती दिलेला आहे? खरे म्हणजे अशा परिस्थितीत पुरग्रस्तांच्या पाठीशी राज्यशासनाने उभे राहिले पाहिजे परंतु अशा परिस्थितीत राज्यशासन पूरग्रस्तांच्या पाठीशी उभे आहे, असे कोठेच दिसून येत नाही. हे शासन वेलफेअर स्टेट आहे की, फनफेअर स्टेट आहे हे समजत नाही. हे शासन हौसेखातर , मौजेखातर चालले आहे की काय, असे वाटू लागले आहे. सभापती महोदय, अंतरवेली, उमापूर या गावातील ऊसाच्या शेतात पुराचे पाणी घुसल्यामुळे संपूर्ण शेतात वाळूच वाळू झालेली आहे. संपूर्ण 5 कि.मी. च्या क्षेत्रातील ऊसाच्या शेतात वाळू घुसल्यामुळे शेतक-यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झ ाालेले आहे. ऊसाच्या शेतात वाळू घुसल्यामुळे येथील शेतक-यांना आपण कशा प्रकारे नुकसान भरपाई देणार आहात? ज्यावेळेस नैसर्गिक आपत्ती येते त्यावेळेस शासन नुकसान भरपाई देत असते परंतु या ठिकाणी जे नुकसान झालेले आहे ते मानव निर्मित झाल्यामुळे या ठिकाणच्या शेतक-यांना नुकसान भरपाई मिळण्याची आवश्यकता आहे. गोदावरी नदी ही मराठवाडयाची लाईफलाईन आहे. पाण्याच्या संदर्भात शासनाने व्यवस्थित नियोजन केले तर परकॅपिटा इन्कम वाढू शकेल. जालना, बीड, परभणी, नांदेड, उस्मानाबाद आणि लातूर या सहा जिल्हयाचे पर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी .....

कॅपिटा इन्कम फार कमी आहे. या ठिकाणच्या शेतीला पाणी नाही परंतु पुराचे पाणी येथील लोकांच्या घरात शिरुन मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. माजलगाव येथे पाण्याची वहन क्षेमता फार कमी आहे. जायकवाडी धरणाचे पाणी आंध्र प्रदेशामध्ये वाहून गेलेले आहे. माजलगावचे धरण 63 टक्के भरु शकले आहे. शासनाला लाज वाटावी अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. सभापती महोदय, नैसर्गिक साधनसंपत्तीमध्ये सगळयात महागडी साधनसंपत्ती कोठली असेल तर ती पाणी आहे. पाणी हे जीवन आहे. पाण्याच्या संदर्भात योग्य नियोजन केले तर हा प्रश्न कायमस्वरुपी निघू शकेल. परवा नांदेड येथे भुकंपाचे धक्के बसले त्यासंदर्भात आपल्या डिझास्टर मॅनेजमेंटनी कोणती उपाययोजना केली होती त्याची सुध्दा या ठिकाणी माहिती देण्याची आवश्यकता आहे. येथील 400 गावांच्या पुनवर्सनाच्या संदर्भात 17 सप्टेंबर रोजी माननीय मुख्यमंत्र्यांनी एक बैठक घेतली होती. या गावामध्ये नेहमी पाणी शिरत असल्यामुळे येथील लोकांचे मोठया प्रमाणात नुकसान होत असते. त्यामुळे अजून किती दिवस लोकांच्या घरात पाणी गेल्यावर शासनाला जाग येणार आहे, याचीही माहिती या ठिकाणी देण्याची आवश्यकता आहे. नदीच्या क्षेत्रात असलेली दोनचारशे गावांचे जर चांगल्या प्रकारे पुनर्वसन केले, या ठिकाणी चांगले रस्ते केले तर या ठिकाणी नेहमी निर्माण होणारी समस्या शासनासमोर राहणार नाही. या ठिकाणच्या नदीमधून मोठया प्रमाणात पाण्याचे डिसचार्ज होत असल्यामुळे त्या ठिकाणच्या लोकांचे पुनर्वसन करण्याची शासनाची ही नैतिक जबाबदारी आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी.........

परंतु हा मराठवाड्यातील भाग असल्यामुळे पुनर्वसन केले नाही तरी चालेल. हा भाग मागासलेला आहे, तो तसाच राहू द्यावा अशाप्रकारची भूमिका शासनाने घेऊ नये.

सभापती महोदय, मराठवाड्यात गोदावरी नदीबरोबर त्याठिकाणी हजारो वर्षापूर्वीची सुंदर सुंदर मंदिरे आहेत. काही मंदिरे हेमाडपंथी आहेत तर काही मंदिरे शिवकालीन आहेत. काही मंदिरांमध्ये सुंदर सुंदर शिलालेख आहेत. ही सर्व मंदिरे आपल्या संस्कृतिक परंपरेचा ठेवा आहे. परंतु या मंदिरांच्या डागडुजीसाठी शासनाने एक पैसा देखील खर्च केलेला नाही. मंदिरांच्या दुरुस्तीची शासनाला ॲलर्जी आहे का, हे समजत नाही. मराठवाड्यातमध्ये पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेली मंदिरे अतिशय विलोभनीय आणि नयनरम्य आहेत. रामाने बांधलेले मंदिर सुध्दा याठिकाणी आहे. अशी ही पुरातन काळातील मंदिरे आपण जपली पाहिजेत, त्यांचे संवर्धन केले पाहिजे. मी तहसिलदारांना विचारले की, तुम्ही रस्त्यांची दुरुस्ती करता त्याप्रमाणे पुरातन मंदिरांना भेगा पडलेल्या आहेत त्याची दुरुस्ती का करीत नाही ? मला त्यांचेकडून नीट उत्तर मिळाले नाही. मराठवाड्यात जशी हिंदू धर्माची पुरातन मंदिरे आहेत तशीच इतर धर्माची मंदिरे सुध्दा आहेत. ही सर्व पुरातन मंदिरे आहेत. त्यांचे आपण जतन केले पाहिजे. तो आपला सांस्कृतिक ठेवा आहे,तो आपण जपला पाहिजे. तेव्हा माननीय मंत्रिमहोदयांनी याकडे सुध्दा लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, गोदाकाठच्या पैठण भागातील शेतकऱ्यांनी त्यांना एक पैशाचीही मदत मिळाली नाही म्हणून दिनांक 1 जानेवारी रोजी आत्महत्येची नोटीस दिलेली आहे. त्याबाबतही विचार होण्याची आवश्यकता आहे. मी परभणी भागाचा दौरा केला त्यावेळी मला जवळपास 3 हजार शेतकरी भेटले.त्यांनी मला सांगितले की, आम्हाला एक कोणत्याही प्रकारची मदत मिळालेली नाही. तेव्हा किती दिवसांमध्ये शेतीचे पुनर्पंचनामे करणार आहात ? जिल्हानिहाय बैठक घेऊन गोदाकाठच्या सरपंचाना प्रश्न विचारणार काय ? चुकारपणा केलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार काय ? पूरग्रस्तांचे पुनर्वसन करणार काय ? पुरातन मंदिराचे जतन करण्यासाठी कोणती



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी.........

पावले उचलणार आहात ? तसेच त्या-त्या जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींच्या बैठका घेणार आहात काय ? या सर्व प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्रिमहोदयानी त्यांच्या उत्तरात द्यावीत. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण पूर्ण करतो.

--------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे ( महसूल व पुनर्वसन मंत्री ) : सभापती महोदय, मागील वर्षी आलेल्या महापुरामुळे मराठवाडा आणि गोदाकाठी असलेल्या गावांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. या चर्चेच्या निमित्ताने त्यांनी महापुरामुळे झालेल्या नुकसानीचा थोडक्यात आढावा मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, मागील दोन वर्षे संपूर्ण महाराष्ट्र महापुराच्या संकटात होता. या संकटातून मार्ग काढण्याचा देखील आपण प्रयत्न केलेला आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी गोदाकाठच्या संपूर्ण जिल्ह्याची माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे.त्यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच हा सरकारी पूर आहे असे सांगितले. मराठवाड्यातील कोणत्याही जिल्ह्यामध्ये चांगला पाऊस नसताना त्यावर्षी महापुराचे भीषण संकट आले ही वस्तुस्थिती आहे. जायकवाडीच्या कार्यक्षेत्रामध्ये नाशिक भागातून पावसाचे पाणी आले होते. मागील वर्षी त्या दोन-तीन दिवसांत किती इंच पाऊस झ ाला याची आकडेवारी आता माझ्याजवळ उपलब्ध नाही.

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे...

परंतु "ना भुतो ना भविष्यती" एवढया मोठयाप्रमाणात 3-4 दिवस सातत्याने पाऊस झालेला आहे. त्यावेळी एवढा पाऊस होईल अशी कोणालाही कल्पना नव्हती. पावसाची कल्पना नसल्यामुळेच हे संकट त्याठिकाणी उद्भवलेले आहे. या पुरामुळे कोटयावधी रुपयांचे नुकसान झालेले आहे, ही वस्तुस्थिती आहे. आज याठिकाणी चर्चेच्या निमित्ताने गोदावरी नदीच्या महापुरामुळे पुरग्रस्तांचे फार मोठे नुकसान झाले, याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी आत्ताच माहिती दिली. यासंदर्भात मी सांगेन की, गोदावरी नदीला आलेल्या पुरामुळे प्रामुख्याने औरंगाबाद, जालना, परभणी, नांदेड आणि बीड हे पाच जिल्हे बाधित झालेले आहेत. गोदावरी नदीच्या भागामध्ये हे पाच जिल्हे येत असल्यामुळे खऱ्याअर्थाने ते जिल्हे बाधित झालेले आहेत. अर्थात हिंगोली हा जिल्हाही मराठवाडयामध्येच येतो. वरील 5 जिल्हयातील बाधित गावांची संख्या 323 असून इतर नदीच्या पुरामुळे बाधित झालेली गावे 163 होती. एकूण जिल्हयांतील बाधित व्यक्ती 3,58,656 एवढया झाल्या. तसेच, 163 बाधित गावातील 48,338 व्यक्ती महापुरामुळे बाधित झाल्या. अशाप्रकारे एकूण 486 गावे बाधित होऊन त्यामध्ये 4,07,094 व्यक्ती बाधित झाल्या होत्या. या बाधित व्यक्तीच्यासाठी आपण जवळपास 282 संक्रमण शिबीरे केलेली होती व त्या संक्रमण शिबीरामध्ये 2,06,018 व्यक्ती होत्या. त्यामध्ये निराधार कुटुंबे 78,421 होती व त्यामध्ये निराधार झालेल्या व्यक्तींची संख्या 2,98,584 एवढी होती. यासंदर्भात जी मदत देण्यात आली, त्याबाबतही सन्माननीय सदस्यांनी माहिती दिली. याबाबतीत मी सभागृहाला सांगू इच्छितो की, शासनाने सानुग्रह अनुदान म्हणून 78,421 लाभार्थ्यांना जवळपास 2,857,08 लाख रुपये वाटलेले आहेत. शेतक-यांच्या पिकांसाठी म्हणून जवळपास 6,643.48 लाख रुपये वाटण्यात आले. यासंदर्भात आपण जवळपास 3,06,366 शेतक-यांना मदत दिलेली आहे. घराच्या दुरुस्तीसाठी मदत म्हणून 2,05,471 शेतक-यांना जवळपास 856.74 लाख रुपयांची करण्यात आलेली आहे. तसेच, 17,836 घरांसाठी आपण 2,123.87 लाख रुपयांची मदत केलेली आहे. अशाप्रकारे मदत करीत असताना निश्चितपणे 100 टक्के मदत पुरग्रस्तांना मिळाल्याचा दावा मी करणार नाही. परंतु अशाप्रकारे मदत देण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे. कितीही मदत केलीतरी ती अपुरीच असते, हे मी पुनर्वसन राज्यमंत्री म्हणून अनुभवलेले आहे. शेवटी मदत ही 100 टक्के नसतेच.

..2......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

10-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 3K-2

डॉ.राजेंद्र शिंगणे.....

दिलासा देण्यासाठी म्हणून ही तात्पुरती मदत शासनाच्या मार्फत मदत देण्यात येत असते. सभापती महोदय, त्यावेळी मी स्वत: परभणी व हिंगोली जिल्हयाचा दौरा केलेला आहे. परंतु याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, कुठलाही लोकप्रतिनिधी त्याठिकाणी आला नाही. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, मी स्वत: या दोन जिल्हयामध्ये जाऊन पाहणी केलेली आहे. त्याठिकाणी अनेक तालुक्यांमध्ये पूर असतानाही मी त्याठिकाणी गेलेलो आहे. त्यामुळे निश्चितपणे अशाप्रकारची मदत देत असताना काही त्रुटी राहिल्या असतील, हया गोष्टी मी मान्य करतो. सन्माननीय सदस्यांनी या अर्धा-तास चर्चेवरील भाषण सुरु होण्यापूर्वी कागदपत्रे दिली होती. अगोदरपासूनच प्रत्येक जिल्हयांमध्ये आपत्कालीन व्यवस्था जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून केलेली होती. आपत्कालीन व्यवस्था समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असून, मुख्य कार्यकारी अधिकारी सदस्य आहेत व जिल्हा पोलीस अधीक्षकही सदस्य आहेत. तसेच, इतर महत्वाच्या विभागांचे प्रमुखही आपतकालीन व्यवस्था समितीचे सदस्य आहेत.

नंतर कु.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे .....

सभापती महोदय, 2005 मध्ये आलेला पूर आणि 2006 मध्ये आलेला पूर यांची आपण तुलना केली तर आपणास असे आढळून येईल की, सन 2005 मध्ये आलेला जो पूर होता त्याच्या पेक्षाही सन 2006 मध्ये आलेला पूर जास्त प्रभावी होता व या पुरामुळे होणारे नुकसानही प्रचंड होते. अशा प्रकारे पूराचे अस्मानी संकट महाराष्ट्रावर कोसळले होते. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे भाजप, काँग्रेस , राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना अशा सर्व पक्षाच्या कार्यकर्त्यांनी हिरीरीने पूरग्रस्तांना मदत करण्याच्या कार्यात भाग घेतला होता. एवढेच नव्हे तर अनेक ठिकाणी स्वयंसेवी संस्था ज्या होत्या त्यांनी देखील पूरग्रस्तांना खूप मदत केली होती. तसेच एकदा केलेली मदत या संस्थांनी शासनाकडून परत मागितली नाही. आम्ही एवढी मदत केलेली आहे ती आम्हाला परत करा अशी मागणी कोणत्याही स्वयंसेवी संस्थेने केलेली नाही. अशाप्रकारे अत्यंत परोपकाराची भावना या संस्थांनी दाखविली. शासनाने पूरग्रस्थांना सानुग्रह अनुदान वाटले. रॉकेलचे वाटप केले, धान्याचे वाटप केले अशा प्रकारे सर्व प्रकारचीी मदत शासनाने पूरग्रस्तांना केली होती. परंतु हे वाटप करीत असताना सन्माननीय सदस्यांच्या काही तक्रारीसुध्दा येथे आलेल्या आहेत. माझ्या जिल्हयात आपण पाहिले तर काही इमारतीत राहणारे, दुसऱ्या मजल्यावर राहणारे असे जे लोक आहेत, ज्यांच्या घरामध्ये पुराचे पाणी आलेही नव्हते अशा लोकांनी देखील तहसिल कार्यालयाच्या समोर रांग लावून शासनाचें अनुदान मिळवल्याचे आमच्या दृष्टीस पडले. ग्रामीण भागामध्ये सुध्दा एका कुटुंबात 5 व्यक्तींची मर्यादा ठेवून 5 हजार रुपयांचे वाटप प्रत्येक आपद्ग्रस्त कुटंबासाठी करण्यात आले होते. काही लोकांनी त्यांच्या कुटुंबात 3 माणसे असल्यास 5 माणसे असल्याचे दाखवून जास्तीचे 2 हजार रुपये शासनाकडून उकळले, ही गोष्ट देखील मी मान्य करतो. शासनाने पूरग्रस्तांना रॉकेल, धान्य वाटले , अनुदान दिले तरी देखील काही तक्रारी येथे आलेल्या आहेत. या संदर्भात ज्या काही तक्रारी असतील त्यांची निश्चितपणे चौकशी केली जाईल.

सभापती महोदय या पुरामुळे सार्वजनिक मालमत्तेचे म्हणजेच रस्त्यांचे, पुलांचे, शासकीय इमारतींचे, दवाखान्यांचे, शाळांचे व मंदिरांचे आतोनात नुकसान झाले. सर्व पूरग्रस्त जिल्हयांना शासनाने 5 कोटी रुपयांचे अनुदान, झालेले नुकसान भरुन काढण्यासाठी व दुरुस्ती करण्यासाठी दिलेले होते.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ .राजेंद्र शिंगणे....

सार्वजनिक मालमत्तेचे जे नुकसान झाले त्याची दुरुस्ती करण्यासाठी ही मदत शासनाकडून देण्यात आली होती. ज्या शाळेची भिंत पडली होती ती दुरुस्त करता यावी ,मुलांना शाळेत बसण्याची सोय व्हावी ,आरोग्य केंद्रे दुरुस्त केले जावे ज्यामुळे आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करुन देता येतील या साठी हे अनुदान शासनाकडून देण्यात आले होते. परंतु शासनाने मंदीरे बांधण्यासाठी मदत केली नाही अशा प्रकारची तक्रार येथे सनमाननीय सदस्यांनी केली . मंदीर असो, मस्जित असो, किंवा दर्गा असो या सर्वांची देखील दुरुस्ती झाली पाहिजे यामध्ये आमच्या मनात कोणतेही दुमत नाही. परंतु प्राथमिक सोयी सुविधा, शाळा, पुल, दवाखाने इत्यादी सार्वजनिक मालमत्ता व सर्वसामान्य नागरिकांच्या संदर्भात येथे दुरुस्ती करणे जास्त आवश्यक आहे. मंदिर, मस्जिद, दर्गे मराठवाडयात आहेत, पश्चिम महाराष्ट्रात आहेत, ज्या ज्या ठिकाणी ते क्षतीग्रस्त झालेले आहेत त्या सर्वांची वेगळया पध्दतीने दुरुस्ती करण्यास शासनाकडून निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे.या संदर्भात निश्चितपणे काय तरतूद करता येईल याविषयी शासन विचार करणार आहे. या पुरामुळे नुकसान झालेल्या पूरग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय त्या ठिकाणी घेतलेला आहे. साधारण अडीचशे ते पावणेतीनशे गावांचे पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. या कार्यासाठी टाटा कन्सल्टन्सी या कंपनीची नेमणूक करण्यात आलेली आहे. केवळ दहा हजार रुपये भरुन आपद्ग्रस्तांना घरे देण्याची योजना माननीय मुख्यमुत्र्यांच्या पुढाकाराने आखली होती. या योजनेनुसार 10 हजार रुपये आपद्ग्रस्तांना भरावे लागणार असून उर्वरित चाळीस हजार रुपये शासन भरणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. रोझेकर...

डॉ.राजेंद्र शिंगणे...........

पूरासंबंधी कायमस्वरुपी उपाययोजना करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यासंदर्भात काही गावांचा प्रस्तावही प्राप्त झाला आहे. महाराष्ट्रातील ज्या पूरग्रस्त गावांना नेहमीच तडाखा बसतो अशा गावांचे 18 नागरी सुविधांसह पुनर्वसन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मराठवाडयापासून विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र सर्व ठिकाणी महापूर आला होता तेथील आपद्‌ग्रस्तांना 100 टक्के नाही तरी पुरेसा दिलासा देण्याचा प्रयत्न शाासनाने केला आहे. अंशत: पडलेली घरे, पूर्णत: पडलेली घरे, खरडून गेलेल्या जमिनी याबाबत मदत करण्यात आली आहे. खरडून गेलेल्या जमिनींबाबत रोजगार हमी योजनेमधून हेक्टरी 25 हजार रुपयांपर्यन्त मदत करुन जमीन पूर्ववत करुन घेण्याचे आदेश सर्व जिल्हाधिका-यांना देण्यात आले आहेत. दुर्देवाने अशा प्रकारचे काम कुठल्याही जिल्हयात सुरु झालेले नाही, याचीही माहिती मी घेतली आहे. यासंदर्भात ताबडतोबीने सर्व जिल्हाधिका-यांना आदेश देण्यात येतील. येत्या पावसाळयाच्या आत मागच्या महापूरामुळे जी शेतजमीन नादुरुस्त झाली आहे ती दुरुस्त करुन देण्याचे आदेश प्रत्येक जिल्हाधिका-यांना देण्यात येतील. अशा सर्व प्रकारे मदत करण्याचा प्रयत्न शासनाच्या माध्यमातून झाला आहे. तरी देखील सन्माननीय सदस्यांच्या काही तक्रारी असतील तर त्यांनी त्या माझ्याकडे द्याव्यात, त्या तक्रारींची चौकशी करुन सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न शासनाच्या माध्यमातून केला जाईल.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, गोदावरी नदीला आलेल्या पूरामुळे जे नुकसान झ ाले आहे त्या बीड जिल्हयाची मी साक्षीदार आहे. ज्यावेळी पूर आला होता त्यावेळी गावात पाणी शिरण्यापूर्वी गावातील माणसांना आणि जनावरांना बाहेर काढण्यामध्ये आपण यशस्वी झालो. शासनाकडून जेवढी होईल तेवढी मदत करण्यात आलेली आहे, या माननीय मंत्री महोदयांच्या म्हणण्याशी मी सहमत आहे. गोदावरी परिक्रमा सुरु होण्यापूर्वी आमच्या जिल्हयाच्या पालकमंत्री, डॉ.विमल मुंदडा यांच्या 3/4 परिक्रमा झाल्या. जे काम झाले ते आम्हाला दाखविता येत नाही त्यामुळे कदाचित लक्षात येत नाही. परंतु, आमच्या जिल्हयात येऊन तालुकानिहाय बैठका घेण्यात आल्या. सन्माननीय सहकार मंत्री, डॉ.पतंगराव कदम हे देखील आले होते. सर्व संबंधित आमदार, सरपंच यांना बैठकीसाठी बोलाविले गेले. त्याप्रमाणे पुनर्वसनाचे प्रस्ताव तयार झाले

..2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे..........

आहेत. माझ्या जिल्हयाचा अनुभव असा आहे की, त्या त्या तालुक्यात जाऊन सरपंच, आमदार यांच्या बैठकीमध्ये सूचना मागवून घेऊन पुनर्वसनाचा प्रस्ताव पाठविला आहे. अडचण अशी निर्माण झाली की, परळी-माजलगाव येथे बैठक झाली, सदर बैठकीला त्या भागातील काही सन्माननीय सदस्य अनुपस्थित होते, त्यामुळे त्यांना त्याची माहिती नसेल. मला गोदावरी महामंडळाचे पत्र आले होते. गोदा काठच्या गावांच्या पुनर्वसनाच्या बाबतीत निळया रेषेचे पुर्नसर्वेक्षण होणे आवश्यक आहे, यासंबंधी मी स्वत: जलसंपदा मंत्र्यांना पत्र दिले होते, अशा प्रकारचा फेरप्रस्ताव तयार करण्यात आला आहे, अशा प्रकारचे गोदावरी महामंडळाचे पत्र मला एक महिन्यापूर्वी प्राप्त झाले आहे. हा प्रस्ताव शासनाला मिळाला आहे किंवा नाही याची मला माहिती नाही. पुनर्वसनाचे प्रस्ताव आहेत पण पावसाळा जवळ आलेला असल्यामुळे दोन महिन्यात आपण पुनर्वसन करु शकणार नाही. कुणाचा किती कडबा वाया गेला, जनावरे नंतरच्या काळात कशी जगत आहेत, जमिनी 25 हजार रुपयात दुरुस्त होऊ शकणार नाहीत, या सर्व बारीक बारीक पण महत्वाच्या बाबी आहेत. या सर्व बाबींचे कोऑर्डीनेशन करायचे असेल तर लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन जलसंपदा मंत्री, पुनर्वसन मंत्री, संबंधित सरपंच आणि अधिकारी यांची फॉलोअपसाठी बैठक आयोजित करणे आवश्यक आहे. एकदाच नव्हे तर नियमित अशा प्रकारच्या बैठका व्हाव्यात, अशा प्रकारची माझी विनंती आहे.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मी विचारलेल्या दोन प्रश्नांची उत्तरे मला मिळाली नाहीत. डिझॅस्टर मॅनेजमेंट फंड जिल्हाधिका-यांकडे ठेवला पाहिजे, असे कायद्यात लिहिले आहे. अशा प्रकारचा निधी जिल्हाधिका-यांकडे ठेवण्यात आला आहे का, असल्यास त्या निधीचा वापर त्यांनी केला का ? आता आपण पुनर्वसनाच्या बाबतीत धडक कार्यवाही करण्याचे ठरविले आहे. ज्यावेळी मोठया प्रमाणावर पाऊस झाला त्यावेळी पूर नियंत्रणाच्या बाबतीत सरकार काही करु शकलेले नाही.

यानंतर कुमारी जयश्री..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी.......
याबाबत माझे असे म्हणणे आहे की, गोदावरी नदीच्या पाण्याच्या नियंत्रणाच्या बाबतीत आता टेक्नॉलॉजी इतकी पुढे गेलेली आहे की, ढगामधील पाऊस तर मोजता येतोच पण पडलेला पाऊसही मोजता येतो. पाऊस पडल्यानंतर एकूण पाच दिवस शासनाकडे असतात म्हणजे तब्बल 120 तास असतात. पाऊस पडला तर तो नदीच्या पात्रातच जाईल अशी अल्ट्रामॉडर्न किंवा अत्याधुनिक पूरनियंत्रण यंत्रणा शासन उभारणार का ? उभारल्यास ती किती काळात पूर्ण होईल ?

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, संकटसमयी धावून जाण्याची महाराष्ट्राची परंपरा आहे. पुरग्रस्तांना आरोग्याच्या सेवा उपलब्ध करुन देणे,अन्न,निवारा वगैरे उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था, अन्नधान्याचा पुरवठा करणे, शाळांच्या खोल्या दुरुस्त करणे अशा प्रकारची अतिशय चांगली कामे महाराष्ट्र शासनाने केलेली आहेत. यासाठी मी माननीय मंत्रिमहोदयांना धन्यवाद देतो. काही नद्यांनी पात्र बदलल्यामुळे त्यालगतच्या जमिनी त्या नद्यांच्या पात्रांबरोबर खोदल्या गेल्या व त्यामुळे त्या जमिनींचे पंचनामे होऊ शकत नाहीत, तेथील तहसिलदार पंचनामे कसे करावयाचे ? असा प्रश्न विचारतात यावर माझे असे म्हणणे आहे की, जे एकूण क्षेत्रफळ त्या शेतक-याचे असेल त्यापैकी जेवढी जमीन शिल्लक आहे तेवढी आहे आणि जेवढी पुरामुळे वाहून गेली ती गेली असे गृहित धरुन जर शासनाने पंचनामे केले तर जी दोन दोन परस जमीन पुरामूळे नदीच्या पात्रामध्ये वाहून गेलेली आहे त्याचे पैसे शेतक-याला अद्यापही मिळालेले नाहीत. नदीकाठच्या जमिनीकरता शासनाने काही आर्थिक तरतूद केलेली नाही यामुळे येथील सिंचनाचे काम थांबलेले आहे व येथील शेतक-यांच्या जमिनींचे पंचनामे लवकरात लवकर होऊन त्यांच्याकरिता शासनाने आवश्यक ती आर्थिक तरतूद केली पाहिजे, यामध्ये कृपया शासनाने लक्ष द्यावे.

श्री.पाशा पटेल : महापूरामध्ये बसक्या पुलांमुळे अनेक गावांचा संपर्क तुटला होता. काही शेतक-यांचे माशांचे जाळे,गाढव,घोडे ही सर्व शेती जोड व्यवसायांची साधने देखील वाहून गेली या सर्वांना आपण मदत दिली परंतु तेथील बसक्या पूलांची उंची जर वाढविण्यात आली तर महापूरामध्ये देखील ब-याच गावांचा संपर्क राहू शकतो, यावर शासनाने गांभीर्याने विचार करावा.

. . . 3 N 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, हमारे शासन ने जिस प्रकार से इस महापूर के संकट का सामना किया, वह अभिनंदनीय है. इसकी तुलना हम अमेरिका में आए हुर्रीकेन से कर सकते हैं. हमारे प्रदेश में लाखों लोगों को परेशानी हुई, लेकिन हमारे शासन ने उनकी हर प्रकार से मदद की. माननीय मंत्री महोदय ने मदद के बारे में लिस्ट यहां पर पढ़कर बताई है. लेकिन एक मुद्दा मैं शासन के ध्यान में लाना चाहती हूँ कि पंचनामा अथॉरिटी ने जहां 80 प्रतिशत नुकसान बताया वहां पर शासन की तरफ से उनको कम्पेनसेशन भी दिया गया, लेकिन इन्श्योरेंस कंपनी ने किसानों के को पैसा नहीं दिया, उन्होंने केवल हायब्रिड क्रॉप का पैसा दिया, लेकिन बाकी फसलों का पैसा नहीं दिया है. इस तरफ शासन को ध्यान देना चाहिए. मेरा दूसरा मुद्दा यह है कि गोदावरी काठ के गांवों का बॅकवाटर के संदर्भ में सर्वे करना आवश्यक है और परभणी जिले में जो क्षेत्र बाधित हुआ था, उसका विचार नहीं किया गया है, इसलिए सर्वे करते समय शासन को परभणी के बाधित क्षेत्र का भी विचार करना चाहिए. मेरा तीसरा मुद्दा यह है कि शासन ने जमीन दुरुस्ती के लिए प्रति हैक्टेयर 25 हजार रुपए की रकम निश्चित की है, यह बहुत कम है, इसलिए इसको कम से कम 50 हजार रुपए करना चाहिए.

. . . नंतर बोरले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी सांगितल्याप्रमाणे राज्यातील नद्यांच्या पात्रातील निळया पट्टयांचा सर्व्हे करण्याचे आदेश जलसंपदा विभागाने दिलेले आहेत आणि त्यानुसार कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. डिझॅस्टर मॅनेजमेंटच्या संदर्भात सर्व जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आलेली आहे. त्या समितीला मागच्या काळात फंड किती देण्यात आला होता, याची आकडेवारी माझ्याकडे आता उपलब्ध नाही. परंतु अधिकचा फंड देऊन त्यांना सक्षम करण्याचा प्रयत्न राहणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.धोंडीराम राठोड यांनी सांगितल्याप्रमाणे नदीच्या पात्रातील ज्यांच्या जमिनींचे नुकसान झ ालेले आहे त्या शेतक-यांना नुकसानभरपाई देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच, इतर सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांचा निश्चितपणे सकारात्मक विचार करण्याचा प्रयत्न केला जाईल. देशातील वेगवेगळया राज्यांवर ज्यावेळी संकट आले त्यावेळी महाराष्ट्र शासनाने त्या राज्यांना मदत करण्यासंदर्भात नेहमीच पुढाकर घेतलेला आहे. ओरिसा, गुजरात, पॉंडेचरी, अंदमान-निकोबार या राज्यांवर ज्यावेळी संकट आले त्यावेळी महाराष्ट्र शासनाने या राज्यांना कोटयावधी रुपयांची मदत दिलेली आहे. परंतु मागच्या वर्षी महाराष्ट्र राज्यावर संकट आले त्यावेळी शेजारच्या गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी जी मदत जाहीर केली होती ती मदत अद्याप मिळालेली नाही. फक्त झारखंड राज्याकडून 5 कोटी रुपयांची मदत मिळालेली आहे. मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी 5-10 कोटी रुपयांची मदत देण्याची घोषणा केली होती, ती महाराष्ट्र शासनाला मिळालेली नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, ज्या राज्यांनी मदत जाहीर केली होती त्या राज्यांनी महाराष्ट्र शासनाला पैसे दिलेले आहेत, अशी आमची माहिती आहे.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मी जबाबदारीने सांगतो की, झारखंड राज्य सोडले तर इतर राज्यांनी जी मदत देण्याचे जाहीर केले होते त्यांच्याकडून एक रुपया देखील मदत मिळालेली नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, गुजरात सरकारच्या मुख्यमंत्र्यांनी घोषित केलेली रक्कम अद्याप मिळालेली नाही.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, गुजरात आणि छत्तीसगड राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेली मदत पुरग्रस्तांना मिळालेली आहे.

**तालिका सभापती** : अर्धा तास चर्चा संपली आहे.

---------

..3....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मजले (तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर) येथील विद्यासागर सहकारी पाणीपुरवठा संस्थेला अनुदान मिळणेबाबत.

**मु.शी.** : मजले (तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर) येथील विद्यासागर सहकारी पाणीपुरवठा संस्थेला अनुदान मिळणेबाबत या विषयावरील तारांज्ति प्रश्-न ज्रमांज 24869 ला दि-ांज 15 मार्च, 2007 रोजी शास-ना-ने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात प्रा.शरद पाटील, वि.प.स. यां-नी उपस्थित ज्ेलेली अर्धा-तास चर्चा.

प्रा.शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, "मजले (तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर) येथील विद्यासागर सहकारी पाणीपुरवठा संस्थेला अनुदान मिळणेबाबत" या विषयावरील तारांज्ति प्रश्-न ज्रमांज 24869 ला दि-ांज 15 मार्च, 2007 रोजी शास-ना-ने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अ-नुमती-ने -नियम 92 अ-न्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित ज्रीत आहे.

सभापती महोदय, शेतक-यांच्या अत्यंत महत्वाच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी ही अर्धा तास चर्चा उपस्थित केलेली आहे. ही अर्धा तास चर्चा मजले तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथील विद्यासागर सहकारी पाणीपुरवठा संस्थेला अनुदान मिळणेबाबत असली तरी राज्यातील सर्व सहकारी शेती पाणीपुरवठा संस्थांना अनुदान देण्यासंबंधी आहे. शेतक-यांनी एकत्र येऊन बँकाचे कर्ज काढून सहकारी शेती पाणीपुरवठा संस्था स्थापन केल्यास त्यांना प्रकल्प खर्चाच्या 25 टक्के रक्कम अनुदान देण्याची योजना अनेक वर्षांपासून महाराष्ट्र शासनाने सिंचनाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने राबविली आहे. सहकार खात्याने सन 2005-06 या आर्थिक वर्षामध्ये या योजनेसाठी पुरेशी तरतूद केलेली नसल्यामुळे जवळपास दोन कोटी रुपये अनुदान शेतक-यांच्या सहकारी शेती पाणीपुरवठा संस्थांना दिले गेले नाही. सन 2006-07 या आर्थिक वर्षामध्ये राज्यातील अनेक सहकारी शेती पाणीपुरवठा संस्थांनी अनुदानाची मागणी केली आहे. ती रक्कम 7 कोटी रुपये इतकी आहे.

यानंतर श्री.गागरे .........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MHM/ KGS/ पूर्वी श्री.बोरले 18:35

प्रा.शरद पाटील.....

2006-07 या आर्थिक वर्षात या योजनेसाठी शासनाने कोणत्या प्रकारची तरतूद केलेली नाही. 2005-06 पासून 2007-08 या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपर्यत जवळपास 7 कोटीची रक्कम अनुदानापोटी शासनाने या पाणीपुरवठा संस्थांना दिलेली नाही, त्यामुळे बँकेचे कर्ज थकले आहे, कर्जावरील व्याज वाढले आहे, त्यामुळे या संस्था अडचणीत आलेल्या आहेत. सुदैवाने या वर्षी शासनाने पाणीपुरवठा संस्थांना अनुदान मिळण्यासाठी सर्व रकमेची तरतूद केलेली आहे.परंतु माझा या माध्यमातून प्रश्न आहे की, या संस्थांना आपण हे अनुदान केव्हा वितरीत करणार आहात ?

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न आहे की, सहकारी पाणी पुरवठा संस्थांना दोन वर्ष अनुदान न मिळाल्याने या संस्थांच्या व्याजाची रक्कम वाढत आहे, त्यामुळे शासन व्याजाच्या रकमेपोटी अनुदान देणार आहे काय ?

-----------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मजले, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथील विद्यासागर सहकारी पाणीपुरवठा संस्थेला व त्या अनुषंगाने इतर सहकारी पाणीपुरवठा संस्थांना अनुदान मिळणेसाठी प्रा.शरद पाटील यांनी अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. त्यांनी सांगितले आहे की, महाराष्ट्रातील सहकारी पाणीपुरवठा संस्थांना संस्थांना दोन वर्ष अनुदान मिळू शकले नाही, हे सत्य आहे. खात्याने मागणी केली होती, परंतु वित्त विभागाकडून मार्चअखेरपर्यत रक्कम उपलब्ध होऊ शकली नाही, त्यामुळे आम्ही अनुदान देऊ शकलो नाही, हे सत्य आहे. या वर्षी या प्रयोजनाकरिता सात कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. जसजसे पात्र असलेल्या सहकारी पाणीपुरवठा संस्थांचे प्रस्ताव आले असतील त्याप्रमाणे त्यांना मे 2007 पासून अनुदानाची रक्कम देण्यास कोणतीही अडचण येणार नाही. सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांनी पाणीपुरवठा संस्थेला अनुदान उशिरा मिळत असल्याने व्याजापोटीही वाढीव अनुदान देण्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. परंतु याबाबत मी सांगू इच्छितो की, अशा प्रकारे व्याजाची रक्कम यापूर्वी देण्यात आलेली नाही. सभापती महोदय, बऱ्याच सहकारी पाणीपुरवठा संस्थांना अनुदान देण्यात येणार आहे. तसेच उपसा जलसिंचन योजना असलेल्या सहकारी संस्थांचाही सर्व्हे चालू आहे. अशा किती संस्था आहेत ? त्यापैकी किती चालू आहेत ? किती बंद आहेत ? वीज बिलाबाबत कोणत्या अडचणी आहेत ? अशा वेगवेगळया त-हेच्या अडचणींचाही सर्व्हे करण्यात येईल.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाने या सहकारी पाणीपुरवठा संस्था त्यांच्या विभागाकडे वर्ग कराव्यात अशी मागणी केलेली आहे. याबाबतही सर्व्हे चालू आहे, हा सर्व्हे पूर्ण झाल्यानंतर अजून किती अनुदान द्यावयाचे याचे आकडे स्पष्ट होतील. खर्च अधिक प्रमाणात वाढला तरी पात्र संस्थांना निकषाप्रमाणे अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, माननीय सहकार राज्यमंत्री महोदयांनी सांगितले आहे की, सहकारी पाणीपुरवठा संस्था पाटबंधारे विभागाकडे वर्ग करण्याबाबत सर्व्हे चालू आहे. याबाबत माननीय मंत्री महोदय श्री.रामराजे नाईक निंबाळकर यांना विचारु इच्छितो की, जलसंपदा विभागाचा तसा काही प्रस्ताव आहे काय ? असल्यास त्या प्रस्तावाचे स्वरुप काय आहे.

श्री.रामराजे नाईक निंबाळकर : सभापती महोदय, कोल्हापूर जिल्हयातील सहकारी पाणी पुरवठा संस्थेला अनुदान मिळण्यासाठी व त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांनी काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत, याबाबतची माहिती आज माझ्याकडे उपलब्ध नाही. असा प्रस्ताव असेल तर त्याची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, ज्या सहकारी पाणीपुरवठा संस्थांचे अनुदानासाठी प्रस्ताव प्रलंबीत आहेत, त्यांना निकषाप्रमाणे प्रथम अनुदान मिळणार आहे का ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, पात्र असलेल्या सहकारी पाणीपुरवठा संस्थांना शासनाकडून जे देय अनुदान आहे, त्यासाठी 7 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु याकरिता निकषाप्रमाणे जास्त रकमेची आवश्यकता असेल तर त्याप्रमाणे संस्थांना अनुदान देण्यात येईल.

**तालिका सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार दिनांक 11 एप्रिल, 2007 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 38 मिनिटांनी बुधवार, दिनांक 11 एप्रिल, 2007 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही